
CMYK




सोलापूर
# तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित
आसमंतसह

सोलापूर | रविवार, २१ जून २०२६ । युगाब्द ५१२८ । वर्ष ४२ वे अंक २०३ । पाने १२+८ । किंमत रु. ८/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

### विचारपुष्प



राष्ट्रसेवा आणि आध्यात्मिक साधना वेगळ्या नाहीत. या दोन्हींचा समन्वय साधला गेला आहे. त्यामुळेच आपल्या येथे व्यक्ती व समाज, व्यक्ती व राष्ट्र यांत संघर्ष उद्भवला नाही.

**स्व. हो. वे. शेषाद्री**
रा. स्व. संघाचे पूर्व सरकार्यवाह

### विनम्र अभिवादन



**झाशीची राणी लक्ष्मीबाई यांचा तिथीनुसार स्मृतिदिन**

# महाराष्ट्रात आता एकच शिवसेना

## अमित शाह यांचा ठाकरेंवर घणाघात, एकनाथ शिंदेंच्या नेतृत्वावर जनतेला विश्वास, मोदींचा कार्यकाळ सुवर्ण अक्षरात नोंदवला जाईल

**कोल्हापूर, २० जून**

यापूर्वी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना शिवसेना गटाचे नेते म्हटले जायचे, पण आता कोणताही गट नाही संपूर्ण शिवसेना एकनाथ शिंदे यांच्यासोबत आहे. महाराष्ट्रात आता शिंदे यांच्या नेतृत्वातील एकच शिवसेना पक्ष आहे. शिंदे यांच्या नेतृत्वावर जनतेने विश्वास टाकला असून, निवडून आलेल्या नेत्यांचाही शिंदे यांनाच पाठिंबा आहे. त्यामुळे शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेना हाच एकमेव पक्ष महाराष्ट्रात आहे, अशा शब्दांत केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी अप्रत्यक्षपणे उद्धव ठाकरे यांच्यावर घणाघात केला.

कोल्हापूर येथील करवीर निवासिनी अंबाबाई मंदिर विकास आराखड्याच्या १४४५.९७ कोटींच्या कामाची पायाभरणी शनिवारी अमित शाह यांनी केली. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, मंत्री चंद्रकांत पाटील यांची उपस्थिती होती. या सोहळ्यानंतर येथील पोलिस मैदानावर झालेल्या महायुतीच्या जाहीर सभेला संबोधित करताना शाह यांनी उपमुख्यमंत्री शिंदे यांचे कौतुक करताना म्हटले की, याआधी शिंदे गट म्हटले जायचे, मात्र आता गट वगैरे काही राहिले नाही. आता हीच शिवसेना आहे. शिंदे यांच्या नेतृत्त्वात शिवसेना हा एकच पक्ष उरला आहे. १२ वर्षांपूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखात आम्ही कामाला सुरुवात केली आणि आज विविध क्षेत्रामध्ये भारत अग्रेसर बनला आहे.



कोल्हापूर येथे करवीर निवासिनी महालक्ष्मी (अंबाबाई) मंदिर विकासाच्या कामांची पायाभरणी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या हस्ते करण्यात आली, यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि इतर उपस्थित होते

मोदींचा काळ इतिहासात सुवर्ण अक्षरात नोंदवला जाईल. आम्ही देशात सांस्कृतिक पुनरुत्थानाचे काम करीत आहोत. याच भावनेतून अंबाबाई मंदिराच्या विकासाचे काम महाराष्ट्र सरकारने हाती घेतले. बंगालमध्येही आम्ही करून दाखवले. कोल्हापूरच्या भूमीतून मी देशवासीयांना आश्वस्त करतो की, देशातील एक एक घुसखोर शोधून काढल्याशिवाय आम्ही स्वस्थ बसणार नाही.

**देशाला मिळाले कणखर गृहमंत्री : आबिटकर**

देशाला कणखर गृहमंत्री मिळाले. त्यांनी देशांतर्गत सुरक्षा आव्हाने लक्षात घेऊन अनेक क्रांतीकारी निर्णय घेतले. सरदार वल्लभभाई पटेल यांनी संस्थानांचे विलिनीकरण केले. त्याच भूमिकेतील तगडा गृहमंत्री देशाला लाभला आहे, मंत्री प्रकाश आबिटकर म्हणाले. यावेळी भाजपाचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, आशिष शेलार, शिवेंद्रराजे भोसले यांच्यासह खासदार धैर्यशील माने आणि जिल्ह्यातील आमदार उपस्थित होते.

◂ (तभा वृत्तसेवा)

### अंबाबाई मंदिराचा विकास देशाचे स्वप्न : फडणवीस

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, अंबाबाई हे केवळ कोल्हापूरचेच नाही, तर संपूर्ण देशातील जनतेचे श्रद्धास्थान आहे. या मंदिराचा भव्य विकास व्हावा, अशी सर्वांचीच इच्छा होती. कोल्हापूरचे जावई असलेल्या शाह यांचा आम्हाला अंबाबाई मंदिर परिसर विकासासाठी नेहमी आग्रह होता. आज त्यांच्याच हस्ते या कामांचा प्रारंभ झाल्याचा आम्हाला आनंद आहे. राज्याच्या विकासासाठी त्यांनी नेहमीच पाठिंबा दिला आहे. ■

### घुसखोरांच्या बळावर काँग्रेसचे अस्तित्व

ज्या काँग्रेस पक्षाच्या मांडीवर उद्धव ठाकरे बसले आहेत, तो पक्ष घुसखोरांचा 'व्होट बँक' म्हणून वापर करून आपले अस्तित्व टिकवून आहेत. हा देश धर्मशाळा नाही, येथे केवळ याच देशात जन्मलेले लोकच राहतील. मोदींनी देशाचे सर्वाधिक काळ पंतप्रधान म्हणून विक्रम प्रस्थापित केला आहे. या काळात सोमनाथ ते गंगासागर आणि संपूर्ण देशभर भाजपा व रालोआची सत्ता विस्तारण्याचे काम झाले. जेव्हा स्वतंत्र भारताचा इतिहास लिहिला जाईल, तेव्हा ही १२ वर्षे विकास, भारतीय संस्कृतीचे पुनरुज्जीवन, सुरक्षित भारताची निर्मिती यांसारख्या कामगिरींसाठी ओळखली जातील. ■

### राज्यातील बळीराजाला दिलासा

**मुंबई :** खरीप हंगामाच्या पृष्ठभूमीवर राज्यातील ९० लाखांपेक्षा जास्त शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. पीएम किसान योजनेच्या २३ व्या हप्त्याचे शनिवारी वितरण झाले असून, राज्यातील ९०.८५ लाख शेतकऱ्यांच्या बँक खात्यात १,८१७ कोटी रुपयांची रक्कम जमा झाली. ■

# होर्मुझ जलमार्गाचा आनंद औटघटकेचा

## इराणने केला बंद, लेबनॉनवरील हल्ल्यामुळे निर्णय अमेरिकेसोबतचा शांतता करार धोक्यात



**दुबई, २० जून**

लेबनॉनमधील इस्त्रायली हल्ल्यांमुळे शांतता कराराचे उल्लंघन झाल्याचा आरोप करीत इराणने शनिवारी सायंकाळी पुन्हा होर्मुझ जलमार्ग बंद करण्याची घोषणा केली. इराणच्या आक्रमक भूमिकेमुळे अमेरिकेसोबत अलिकडेच झालेला शांतता करार धोक्यात आला आहे.

अमेरिका आणि इराण युद्धावर तोडगा काढण्यासाठी करारावर दोन्ही देशांकडून नुकतेच शिक्कामोर्तब केले. शांतता करारावर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि इराणचे अध्यक्ष मसूद पेझेश्कियान यांनी स्वाक्षऱ्या केल्या. त्यामुळे युद्ध अधिकृतरीत्या संपल्याची घोषणा ट्रम्प यांनी दोन दिवसांपूर्वीच केली. करारात लेबनॉनमधील संघर्षविरामाचाही समावेश असल्याचे इराणने म्हटले आहे. मात्र, दोन दिवसांपासून इस्त्रायलकडून दक्षिण लेबनॉनमध्ये सुरू असलेल्या हल्ल्यावर आक्षेप घेत इराणने शनिवारी होर्मुझ जलमार्ग जहाजांच्या वाहतुकीसाठी बंद करण्याची घोषणा केली. संघर्ष संपवण्यासाठीच्या सामंजस्य कराराचे अमेरिकेने केलेले उल्लंघन, दक्षिण लेबनॉनमधून सैन्य मागे घेण्यास आलेले अपयश आणि इस्त्रायलकडून शस्त्रसंधीचे सतत होणारे उल्लंघन ही कारणे देत होर्मुझमधून होणारी जलवाहतूक बंद करत असल्याचे इराणच्या इस्लामिक रिव्हाल्युशनरी गार्ड कॉर्प्सने (आयआरजीसी) निवेदनात म्हटले आहे.

**शांततेच्या प्रयत्नात इस्त्रायलचा खोडा**

इराणच्या केंद्रीय लष्करी कमांडने म्हटले की, दक्षिण लेबनॉनवर इस्त्रायलने केलेल्या हल्ल्यांमुळे होर्मुझची सामुद्रधुनी बंद केली आहे. लेबनॉनवरील हल्ले अमेरिकेसोबत झालेल्या कराराचे उल्लंघन आहे. शत्रूने वचनबद्धतेचे उल्लंघन केल्यामुळे प्रत्युत्तर देण्यात आले. इस्त्रायलने मध्यपूर्वेत शांतता प्रस्थापित करण्यासाठी सुरू असलेल्या प्रयत्नात बाधा आणली आहे. लेबनॉनवरील हल्ले थांबविल्याशिवाय होर्मुझ जलमार्ग खुला केला जाणार नाही.

◂ (वृत्तसंस्था)

### पवनराजे निंबाळकर हत्याकांड प्रकरण

# डॉ.पद्मसिंह पाटलांसह सर्व आरोपींची निर्दोष मुक्तता

## सीबीआय विशेष न्यायालयाचा निकाल

~~तभा वृत्तसेवा,~~
**धाराशिव, दि. २० जून-**

महाराष्ट्राच्या राजकीय वतुर्ळात दोन दशकांपासून चर्चेत असलेल्या बहुचर्चित पवनराजे निंबाळकर दुहेरी हत्याकांड प्रकरणाचा अखेर निकाल लागला असून सीबीआय विशेष न्यायालयाने माजी गृहमंत्री डॉ.पद्मसिंह पाटील यांच्यासह सर्व आठ आरोपींची निर्दोष मुक्तता केली आहे. विशेष सीबीआय न्यायालयाचे न्यायमूर्ती एस.आर. नावंदर यांनी हा महत्त्वपूर्ण निकाल दिला. दरम्यान, न्यायालयाने तपास यंत्रणांच्या कामकाजावर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

माफीच्या साक्षीदार पारसमल जैन यांच्या जबाबांमध्ये वारंवार विसंगती, बदल आणि तफावत आढळून आल्याने त्यांची साक्ष विश्वासार्ह मानता येत नाही. त्यामुळे सरकारी पक्षाचा खटला कमकुवत ठरल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले. आरोपींचे मोबाईल फोन जप्त करण्यात आले नाहीत, कॉल डिटेल रेकॉर्ड गोळा करण्यात आले नाहीत, आरोपी परस्पर संपर्कात होते का याबाबत कोणताही ठोस पुरावा सादर करण्यात आला नसल्याचे न्यायालयाने नमूद केले. घटनास्थळ, वाहनाचा रंग, आरोपींच्या हालचाली, पैशांच्या व्यवहारांबाबतही साक्षीदारांच्या जबाबांमध्ये मोठी तफावत आढळून आली. पवनराजे निंबाळकर आणि डॉ.पद्मसिंह पाटील यांच्यात राजकीय म तभेद आणि वैमनस्य होते, हे पुराव्यांवरुन दिसून येते. पवनराजे निंबाळकर यांनी आपल्या जीवाला धोका असल्याची तक्रारही प्रशासनाकडे केली होती. मात्र केवळ राजकीय वैमनस्य असल्याने एखाद्या व्यक्तीला दोषी ठरवता येत नाही. २० वर्षांनंतर या प्रकरणाचा निकाल देणे ही दुर्दैवी बाब आहे. एका लोकनेत्याची भरदिवसा गोळ्या झाडून हत्या झाली. मात्र तपासातील त्रुटींमुळे दोष निश्चित करणे शक्य झाले नाही. त्यामुळे संशयाचा फायदा देत सर्व आरोपींना मुक्त करण्यात येत असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले. या प्रकरणात डॉ. पद्मसिंह पाटील, सतीश मंदाडे, मोहन शुक्ला, शशिकांत कुलकर्णी, कैलास यादव, दिनेश तिवारी, पिंटू सिंग आणि छोटे पांडे यांची निर्दोष मुक्तता करण्यात आली आहे. ३ जून २००६ रोजी मुंबईहून पुण्याकडे जात असताना नवी मुंबईतील कळंबोलीजवळ मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर पवनराजे निंबाळकर यांच्या वाहनावर अज्ञात हल्लेखोरांनी गोळीबार केला होता. या हल्ल्यात पवनराजे निंबाळकर आणि त्यांचे चालक समद काझी यांचा मृत्यू झाला होता. त्यानंतर या प्रकरणाचा तपास कळंबोली पोलीस, नवी मुंबई गुन्हे शाखा आणि अखेर सीबीआयकडे सोपविण्यात आला होता.



### उच्च न्यायालयात मागणार दाद : खा. ओमराजे निंबाळकर

पवनराजे यांची हत्या झाली, ही वस्तुस्थिती आहे. न्यायालयाने राजकीय वैमनस्य असल्याचेही मान्य केले आहे. मग पवनराजे यांची हत्या नेमकी कोणी केली? असा सवाल उपस्थित करत उच्च न्यायालयात दाद मागणार आहे, असेही खासदार ओमराजे निंबाळकर यांनी स्पष्ट केले.

### पोलिस यंत्रणेवर दबाव

तब्बल २० वर्षांनंतर निर्णय येत असेल तर यापेक्षा न्यायव्यवस्थेचे मोठे दुर्दैव असू शकत नाही. सुरुवातीच्या पोलिस यंत्रणेवर दबाव असल्यामुळेच आम्ही उच्च न्यायालयात जाऊन तपास सीबीआयकडे सोपविण्याची मागणी केली होती. सीबीआयने तपास केला, मात्र त्यामध्येही मोठा कालावधी गेला, असे खासदार ओमराजे निंबाळकर म्हणाले.

### कैलास मानसरोवर यात्रेची पहिली तुकडी रवाना

**नवी दिल्ली, २० जून**

सिक्कीममधील नाथू-ला खिंडीतून कैलाश मानसरोवर यात्रेसाठी भाविकांची पहिली तुकडी शनिवारी रवाना झाली. यात ५० भाविकांचा समावेश आहे. भारत आणि चीन यांच्या समन्वयाने आयोजित केलेल्या या यात्रेसाठी व्यापक सुरक्षा, वैद्यकीय तयारी करण्यात आली आहे. भाविकांसाठी सर्वात पवित्र धार्मिक यात्रांपैकी एक असलेली ही यात्रा, चीनच्या तिबेटमधील पवित्र कैलास पर्वतापर्यंत असेल.

◂ (वृत्तसंस्था)






PATANJALI® पतंजलि®



आंतरराष्ट्रीय योग दिवस
योग आवाहन

मुळात, आपल्या सर्व भारतीयांचे पूर्वज योगी होते. काळाच्या ओघात, आता आपल्याला विविध पंथ, जाती, वर्ग आणि समुदाय म्हणून दिसत असले तरीही, आपल्या पूर्वजांप्रति कृतज्ञता बाळगा आणि कृतघ्नतेच्या पापापासून वाचा. सामूहिकरित्या योग करा, १०-२०-५०-१०० लोकांना सामूहिकरित्या योगाभ्यास करण्यास प्रोत्साहित करा आणि समाज माध्यमांवर फोटो, रील्स व इतर फोटो शेअर करा. प्रत्येक गाव, शहर, गल्ली आणि परिसरात छोटे योग कार्यक्रम आयोजित करा.

योग, आयुर्वेद आणि स्वदेशीच्या माध्यमातून आत्मनिर्भर भारतासाठी प्रतिज्ञा घ्या आणि इतरांनाही ती घेण्यास प्रवृत्त करा.

विरोध – अनेक आसुरी शक्ती योग, आयुर्वेद, स्वदेशी आणि सनातन संस्कृतीला कटकारस्थानाने विरोध करून नष्ट करण्याच्या कामात गुंतल्या आहेत. राष्ट्रवादी खऱ्या सनातनी आत्म्यांनी या देवसुर संग्राम, धर्मयुद्धात पतंजली आणि पूज्य स्वामी रामदेवजींना पूर्ण ताकदीने १००% पाठिंबा दिला पाहिजे. यतो धर्मःततो जयः, सत्यमेव जयते

लूट – तुम्ही ऑक्सफॅम इंटरनॅशनलसह कोणत्याही एआय टूलचा वापर करून शोधल्यास, तुमच्या लक्षात येईल की केवळ गेल्या २००–२५० वर्षांतच परदेशी कंपन्यांनी देशाला १०० ट्रिलियन रुपयांपेक्षा जास्त लुटले आहे. महान भारताला बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या आर्थिक गुलामगिरीत, मॅकॉलेच्या शिक्षण प्रणालीच्या गुलामगिरीत आणि वैचारिक व सांस्कृतिक गुलामगिरीत ढकलले गेले आहे, ज्यामुळे देश अधोगतीच्या शिखरावर पोहोचला आहे. चला, आपण सर्वजण ५००–१००० वर्षांपूर्वीच्या सुवर्णयुगाच्या गौरवशाली स्मृतीसह एक महान, विकसित भारत घडवण्यासाठी अविचल आणि तीव्र प्रयत्न करण्याचा संकल्प करूया, जेणेकरून आपण भारताच्या शत्रू शक्तींचा पराभव करून आपल्या पूर्वजांच्या, ऋषीमुनींच्या, संतांच्या आणि हुतात्म्यांच्या स्वप्नातील भारताची उभारणी करू शकू.

पतंजलीचे योगदान – पूजनीय योगऋषी स्वामी रामदेवजी, पूजनीय आचार्य श्री बाळकृष्णजी आणि पतंजली यांच्या प्रयत्नांमुळे योग–आयुर्वेद, स्वदेशी आणि सनातन संस्कृतीचा सर्वांगीण गौरव आज संपूर्ण जगात पोहोचला आहे. हरिद्वारपासून देश आणि जगापर्यंत, पतंजलीने या महान सेवेत लाखो–कोटी रुपयांचे दान केले आहे. सुमारे १० हजार संशोधन नियमावलींचे पालन करून आंतरराष्ट्रीय नियतकालिकांमध्ये ५०० हून अधिक शोधनिबंध प्रकाशित झाले आहेत. आज, पतंजली गुरुकुलम, आचार्यकुलम, पतंजली विद्यापीठ, भारतीय शिक्षा बोर्ड (BSB), पतंजली करिअर अकादमी, पतंजली सिव्हिल सर्व्हिसेस अकादमी (PCSA), पतंजली वेलनेस, योगग्राम, निरामयम, पतंजली रिसर्च फाउंडेशन, गोशाळा यांसारख्या पतंजलीच्या देशव्यापी संस्थांमधील कोट्यवधी कार्यकर्त्यांच्या निःस्वार्थ सेवेमुळे आणि तपश्चर्येमुळे एक कालातीत ऐतिहासिक सेवा सुरू आहे. शेकडो संन्याशांची तपश्चर्या, लाखो कर्मयोगी बंधू–भगिनींची निःस्वार्थ सेवा आणि तुम्हा कोट्यवधी देशवासियांचे आशीर्वाद हाच आमचा एकमेव आधार आहे आणि आमचा हाच संकल्प आहे की, आमच्या अखेरच्या श्वासापर्यंत आम्ही भारतमातेच्या आणि मानवतेच्या सेवेसाठी आमचे सर्वस्व समर्पित करत राहू.

पतंजलीमध्ये सामील व्हा आणि आमच्या सेवांचा लाभ घ्या. योगत्व, रामत्व, कृष्णत्व आणि शिवत्व यांच्या गुणांना आपल्या स्वभावात आणि आचरणात अंगीकारा. कारण सनातन धर्म हा केवळ उपदेश नसून, तो आपल्या आचरणाचा विषय आहे.

दररोज आस्था चॅनल, इंडिया टीव्ही किंवा यूट्यूब इत्यादींशी जूळुन योगाभ्यास करा.
आस्था LIVE Everyday 5:00 am to 7:30 am and 8:00 pm | संस्कार Everyday 9:00 am | INDIA TV Everyday 8:00 am | YouTube Swami Ramdev | Acharya Bal Krishna

पतंजलीची आरोग्यदायी उत्पादने खरेदी करण्यासाठी आणि संशोधन व पुराव्यावर आधारित औषधोपचाराने रोगांचे निर्मूलन करण्यासाठी, गुगलवर 'माझ्या जवळचे पतंजली स्टोअर' (Patanjali Store Near Me) शोधा. पतंजलीची सर्व स्वदेशी उत्पादने, जसे की गाईचे तूप, दंत कांती, हनी, केश कांती, सरबत, ज्यूस इत्यादी देशभरातील सर्व प्रमुख दुकानांमध्ये उपलब्ध आहेत. जिथे ते उपलब्ध नाहीत, तिथे दुकानदाराला पतंजलीची उत्पादने विक्रीसाठी ठेवण्याची विनंती करा.

पतंजलीच्या सर्व प्रमुख संस्थांच्या वेबसाइटला भेट देऊन अधिक माहिती मिळवा.
पतंजली वेलनेसमध्ये या आणि आरोग्याचे फायदे मिळवा. नोंदणीसाठी संपर्क साधा- 8954-666-111
भारतीय शिक्षण मंडळ आणि पतंजली सिव्हील सर्विसेस अकादमीसाठी, संपर्क साधा- 8954-555-999

# शरीर, मन आणि आत्म्याच्या सुसंवादाचा महामंत्र



निरोगी शरीर आणि शांत मन हीच आजच्या काळातील खरी संपत्ती आहे. यंदाच्या आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त आम्ही घेऊन आलो आहोत एक विशेष पान, जिथे योगसाधनेचे महत्त्व सांगणारी काही प्रमुख आसने, ती करण्याची अचूक पद्धत आणि त्याचे फायदे सविस्तर मांडले आहेत. यासोबतच, योगामुळे जीवनात सकारात्मक बदल अनुभवलेल्या लोकांच्या प्रातिनिधिक प्रतिक्रिया खास तुमच्यासाठी. चला, आजच योग अंगीकारूया आणि सुदृढ आरोग्याकडे पाऊल टाकूया!



## भुजंगासन



या आसनात पाठीच्या कण्याची स्थिती नागासारखी (भुजंग) होते. म्हणून या आसनाला भुजंगासन असे म्हणतात. भुजंगासनामध्ये पाठीच्या आणि पोटाच्या भागातील स्नायू चांगल्या प्रकारे ताणले जातात. दररोजच्या हालचालींमध्ये आपण पुढे जास्ती वाकत असतो. मागे फारसं वाकत नाही. या आसनामध्ये पाठीचा कणा मागे वाकलेला राहिल्यामुळे पाठीच्या कण्यावर उत्तम प्रकारचा दाब येतो. त्याच वेळी पोटाचे स्नायू ताणले जातात आणि पचन संस्था, पचन संस्थेचे अवयव यांच्यावर चांगला परिणाम होतो. पाठीच्या कण्यावर मागे वाकलेल्या स्थितीत दाब आल्यामुळे पाठीचा कणा आणि मणक्यांना जोडले गेलेले स्नायू यांचे आकुंचन आणि प्रसरण होऊन पाठीचा कणा लवचिक बनतो.

## धनुरासन



हे आसन करताना शरीर धनुष्याप्रमाणे दिसते. यामुळे या आसनाचे नाव धनुरासन असे आहे. धनुष्याची दोरी ताणल्यावर धनुष्य पूर्णपणे ताणले जाते. या आसनातही शरीर असेच ताणले जाते. धनुरासनात पाठीतल्या सगळ्याच मणक्यांना ताण मिळतो.या आसनात संपूर्ण शरीराचे वजन पोटाच्या स्नायुंवर येते. फक्त पोटाचा भाग तेवढा जमिनीवर टेकलेला असतो. तसेच ओटीपोटाचे स्नायूही व्यवस्थित ताणले जातात. पाचक रस निर्माण करणाऱ्या ग्रंथी, यकृत, स्वादुपिंड, यांवर दाब पडून त्यांची कार्यक्षमता वाढते. पोटाचे विकार असतील तर तज्ज्ञांचे मार्गदर्शन घेऊनच करावे.

## अर्ध मत्स्येंद्रासन



या आसनात संपूर्ण शरीराला पीळ बसतोच. मात्र पोट, आतड्यांना सर्वाधिक पीळ मिळतो. त्यामुळे पचन, विशेषतः उत्सर्जन क्रिया सुधारते. सध्याच्या काळात फास्ट फूड, जंक फूड खाण्याचे प्रमाण खूपच वाढले आहे. त्यामुळे पोट साफ न होण्याची तक्रार शालेय विद्यार्थ्यांमध्ये वाढली आहे. या आसनाने ही तक्रार दूर होते. मधुमेह होऊ नये, झालेला असेल तर तो नियंत्रणात रहावा, म्हणून हे आसन विशेषत्वाने केले जाते.

## पवन मुक्तासन



या आसनामुळे पोटावर उत्तम प्रकारे दाब येतो. या दाबामुळे आतड्यातील वायु गुदद्वारावाटे बाहेर पडतो. त्यामुळे आपले पचन सुधारते. शौचाला वेळच्यावेळी आणि साफ होते.पोटाचीशस्त्रक्रिया, हर्निया. पचनाचे विकार, मूळव्याध असे त्रास असतील तर तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा. त्रास असणाऱ्यांनी सल्ल्याशिवाय या आसनाचा अभ्यास करू नये.


## कपालभाती



कपालभाती ही फुफ्फुसांची अतिशय उच्च प्रकारची शुध्दीक्रिया आहे. या क्रियेमुळे फुफ्फुसांमधिल अशुद्ध वायू, विषद्रव्ये बाहेर पडतात. ही क्रिया करताना जोरात आणि झटक्यात हवा नाकाने बाहेर सोडायची आहे. श्वास घेणे हे मुद्दाम करायचे नाही. तो आपोआप घेतला जातो.









## भस्त्रिका



भस्त्रिका प्राणायामात जलद श्वसन हाच मुलभूत पाया आहे. दोन्ही हात कोपरात वाकवून शरीराच्या बाजूला उभे ठेवावेत. मुठी बाहेरच्या बाजूला ठेवाव्यात. दोन्ही हातांचे अंगठे आत आणि चारही बोटं वरुन अशी अलगद मुठ मिटलेली ठेवावी. काहीसा जोरात, पूर्ण श्वास भरुन घेत हात कोपरात सरळ करत आकाशाच्या दिशेने न्यावे. मुठी उघडून पाचही बोटं सरळ आकाशाच्या दिशेने ठेवावीत. लगेच जोरात श्वास सोडत हात खाली मुळ स्थितीत आणावेत. 'श्वास घेत हात वर आणि श्वास सोडत हात खाली' अशी क्रिया एकदा झाली म्हणजे एक आवर्तन झालं. अशी सलग दहा आवर्तनं करावी. आवर्तनं पूर्ण झाल्यावर डोळे तसेच शांतपणे मिटलेले ठेवून आपल्या श्वासाकडे तटस्थपणे पहात रहावे. भस्त्रिकेतील श्वसनामधे आपली जाणिव, गळा, घसा, छाती, श्वासपटल, पोट इथपर्यंत जाते. त्यामुळे या भागांची हालचाल सुधारते. हे श्वसन म्हणजे एक प्रकारची हायपर व्हेन्टिलेशनची क्रिया आहे. जलद श्वसन पूर्ण झाले कि काही सेकंद श्वास आपोआप रोखला जातो.




## अनुलोम-विलोम



उजव्या हाताच्या अंगठ्याने डावी नाकपुडी बंद करावी. डाव्या नाकपुडीने अगदी सावकाश आणि दिर्घ श्वास घ्यावा. दोन्ही नाकपुड्या दोन सेकंद बंद ठेवून थांबावे. आता उजव्या नाकपुडीने अगदी सावकाश आणि दिर्घ श्वास सोडावा. इथे अनुलोम-विलोम या प्राणायामाचे अर्धे आवर्तन पूर्ण होते. आता उरलेले अर्धे आवर्तन बरोबर याचप्रकारे, पण उलट दिशेने करावे. म्हणजे उजव्या हाताच्या शेवटच्या दोन बोटांनी (करंगळी आणि तिच्या शेजारचे बोट) डावी नाकपुडी बंद करावी. उजव्या नाकपुडीने अगदी सावकाश आणि दिर्घ श्वास घ्यावा. दोन्ही नाकपुड्या दोन सेकंद बंद ठेवून थांबावे. आता डाव्या नाकपुडीने अगदी सावकाश आणि दिर्घ श्वास सोडावा. इथे एक आवर्तन पूर्ण झाले. अशी एकूण पाच आवर्तनं करावी.

अनुलोम विलोम प्राणायामामुळे मन स्थिर आणि खंबीर स्थितीत राहते. बुद्धी आणि भावना या दोन्ही एका पातळीमध्ये समत्व स्थितीत रहातात.आपल्या शरीरामध्ये 72000 नाड्या आहेत. त्या नाड्यांची शुद्धी होऊन त्यातून प्राणशक्तीचे अतिशय चांगल्या प्रकारे व्हायला मदत होते.

## वृक्षासन



वृक्ष म्हणजे झाड. या आसनात आपले शरीर झाडासारखे सरळ उभे दिसते. आडवा पाय फांदीप्रमाणे दिसतो. म्हणून या आसनाला वृक्षासन असे म्हणतात.

## नौकासन



ही काहीशी पसरट, करंजीच्या आकाराची असते. या आसनात शरीराचा आकार होडी किंवा नावेप्रमाणे दिसतो. म्हणून याला नौकासन असे म्हणतात. हे आसन करताना हात, खांदे, मांड्या व पाय वर उचलले गेल्यामुळे या अवयवांवर चांगला ताण येतो. आसन टिकवल्यामुळे हा ताण आपल्या आतल्या अवयवांपर्यंत पोचतो. त्यांची कार्यक्षमता वाढते. पाठीच्या स्नायूंची शक्ती सुधारते. पचन उत्तम रहाते. या आसनात शरीराचे सगळे वजन पोटावर येते.

## चक्रासन



या आसनात शरीराचा आकार चक्राप्रमाणे गोलाकार होतो. म्हणून याला चक्रासन असे म्हणतात.शरीर लवचिक होण्यासाठी या आसनाचा खूप उपयोग होतो. विशेषतः, पाठीच्या कण्याची ताकद वाढते. तो लवचिक होतो.

## पश्चिमोत्तानासन



या आसनात शरीराची मागची म्हणजे पश्चिम बाजू अतिशय चांगल्या प्रकारे ताणली जाते. यासाठी या आसनाचे नाव पश्चिमोत्तानासन असे आहे.या आसनामुळे पायाच्या टाचेपासून मानेपर्यंत, शरीराच्या मागच्या बाजूचे सगळे स्नायू आणि नाड्या चांगल्या प्रकारांनी ताणल्या जातात. त्यामुळे त्यांची शुद्धी होऊन कार्यक्षमता वाढते. त्याबरोबरच शरीराची पुढची बाजू, विशेषतः पचनसंस्था श्वसनसंस्था, अंतस्त्रावी ग्रंथी यांच्यावर चांगला दाब येतो.

## वीरासन



तलवारीचा वार करणाऱ्या योध्यासारखी स्थिती या आसनात दिसते. म्हणून या आसनाला वीरासन असे म्हणतात.या आसनामध्ये सर्व शरीराला चांगल्या प्रकारे ताण मिळतो. पाय, कंबर, पाठीचा कणा व मान उलट दिशेने वाकवल्याने त्या भागातील अशुध्दी निघून जाते. रक्तपुरवठा सुधारतो. पाठीचा कणा मागे वाकवला गेल्यामुळे त्याची लवचिकता वाढते. पोटाचे स्नायू ताणले गेल्याने तिथला मेद कमी होतो.

## त्रिकोणासन



या आसनात शरीराचा आकार त्रिकोणासारखा दिसतो. म्हणून या आसनाला त्रिकोणासन असे म्हटले जाते. या आसनात शरीराचा भार हा वाकवलेल्या पायाच्या पोटऱ्या, मांड्या, खाली टेकवलेल्या हाताचे स्नायू यांवर येतो. हे स्नायू मजबूत होतात. सरळ ठेवलेल्या पायाच्या टाचेपासून हाताच्या टोकापर्यंत शरीर एकाच दिशेने ताणले जाते. त्या स्नायूंची कार्यक्षमता वाढते.



**अति दक्षता विभागात गंभीर रुग्णांचा उपचार करताना मनावर प्रचंड ताण असतो. दररोज सातत्याने प्राणायाम केल्यामुळे मन शांत, एकाग्र, तणावरहित होतं.**

**- डॉ प्रसाद राजहंस,**
अति दक्षता विभाग प्रमुख, दीनानाथ मंगेशकर



**ध्यान म्हणजे अतिशय अवघड गोष्ट असेल असं वाटलं पण त्याउलट सातत्याने नुसतं डोळे मिटून शांत बसायला लागलं तरी ध्यान चांगलं जमतं हा माझ्यासाठी अतिशय सुखद अनुभव होता. निरोगी राहण्यासाठी तरुणांनी जिममध्ये जाऊन शरीर बलदंड करणं पुरेसं नाही . आरोग्यासाठी मनाची, शरीराची लवचिकता आणि शिथिलता गरजेची आहे. त्यासाठी योगसाधना करावी.**

**-डॉ माधवी मेहेंदळे,** नेत्रशल्यचिकित्सक,
प्रकाश आय हॉस्पिटल,पुणे.

## ओंकार, भ्रामरी

नियमितपणे ओमकार आणि भ्रामरीचा उच्चार करणं आवश्यक आहे. ओमकार का म्हणायचा? ओमकाराच्या उच्चारामुळे मनामध्ये एक शांत स्थिती निर्माण होते. मनाची चंचलता कमी होते.दिवसभर काम करताना बरेच मानसिक ताण निर्माण होतात. ओमकार आणि भ्रामरीमुळे हे मानसिक ताण कमी होतात. आणि मनाची अशी अवस्था निर्माण होते, की मानसिक ताण निर्माणच होणार नाहीत.नियमितपणे ओमकार म्हटल्यामुळे मनाच्या वेगवेगळ्या शक्ती वाढीला लागतात. कुठल्याही गोष्टीवर मन एकाग्र करणं, स्मरणशक्ती, आकलनशक्ती, निर्णयशक्ती वाढतात हे मानसशास्त्रीय चाचण्यांच्या आधारे लक्षात आलेलं आहे.

**आम्ही दोघे योगसराव करतो. हा अनुभव खूप छान आहे. सरावानंतर खूप हलके, सकारात्मक आणि उत्साही वाटते. ट्रेकिंग, नॅशनल पार्क्समधे फिरताना स्टॅमिना आणि लवचिकतेमध्ये सकारात्मक फरक जाणवतो आहे. प्रशिक्षकांचा शांत आवाज, स्पष्ट सूचना यामुळे संपूर्ण सत्र सहज आणि आनंददायी वाटते. तणाव कमी होण्यास, मन शांत राहण्यास आणि एकाग्रता वाढण्यास मदत होत आहे. त्यामुळे योग हा आमच्या दैनंदिन जीवनाचा एक महत्त्वाचा आणि आवडता भाग बनला आहे. भारताने जगाला दिलेली ही जीवनपध्दती आहे याचा आम्हाला खूप अभिमान वाटतो.**

**- पूजा आणि प्रणव गोंधळेकर**
कन्सल्टंट्स ,वॉलनट क्रीक , कॅलिफोर्निया.



**बारावीच्या वर्षात सरांच्या मार्गदर्शनाखाली नियमितपणे योगाभ्यास केल्याचा खूप उपयोग झाला. योगासनांमुळे मान पाठ न दुखता बराच वेळ बसून अभ्यास शक्य झाला. CET, JEE परीक्षा देताना मन खूप शांत, एकाग्र ठेवायला प्राणायाम, ध्यानाची फार मदत झाली.**

**- अमेय श्रीराम देशपांडे**
(अमेयला यंदा JEE मधे 1058 'ऑल इंडिया रँक' मिळाली)



**मी ५ वर्षे मनोज पटवर्धन सरांकडे योगाभ्यास केला. माझ्या मानेच्या स्नायूंच्या स्थैर्यात लक्षणीय सुधारणा झाली. चक्कर येण्याचा त्रासही कमी झाला. सायकॉलॉजिस्ट म्हणून काम करताना दररोज अनेकांच्या भावना, ताणतणाव आणि मानसिक संघर्ष जाणून घ्यावे लागतात. भावनिक ताणाच्या परिस्थितीत ध्यानधारणा,स्वतःला अधिक सक्षमपणे सांभाळण्यास खूप मदत होते.**

**- डॉ. मृदुला आपटे,**
संचालक, विदुला सायकॉलॉजी कन्सल्टन्सी



# एका तपाच्या प्रवासानंतर योग 'जीवनशैली' बनायला हवी



**डॉ. अनुराधा ओक**

**पुणे :** यंदाचा आंतरराष्ट्रीय योग दिन हा जागतिक स्तरावर १२ वा योग दिन असून, या उपक्रमाने आता यशस्वीरीत्या एक तप पूर्ण केले आहे. या १२ वर्षांच्या कालावधीत योगशास्त्राची पाळेमुळे संपूर्ण समाजमन आणि जागतिक स्तरावर घट्ट रुजली असून, ती आजच्या काळातील आरोग्याच्या समस्यांवर उत्तम उपाय ठरत आहे. त्यामुळे आता इतक्या मोठ्या प्रवासानंतर योग ही जीवनशैली बनायला हवी तसा संकल्प करायला हवा .

योग हे केवळ शारीरिक व्यायामाचे साधन नसून ती एक जगण्याची सुंदर कला आहे. जात, धर्म, पंथ किंवा लिंग अशा कोणत्याही सीमांमध्ये योगशास्त्र बांधलेले नाही. अत्यंत धर्मनिरपेक्ष असलेले हे शास्त्र वेदांच्या काळापासून ते आजतागायत अविरतपणे आचरणात आणले जात आहे.

सध्याच्या धावपळीच्या युगात मानवी स्वास्थ्य अत्यंत ऐरणीवर आले आहे. अशा वेळी योग हे प्रत्येकासाठी वरदान ठरू शकते. एखाद्या अनुभवी गुरूच्या मार्गदर्शनाखाली योग्य प्रशिक्षण घेऊन जर योगासने, प्राणायाम (जसे की अनुलोम-विलोम, नाडीशोधन) आणि ध्यान यांचा आपल्या दैनंदिन दिनचर्येत समावेश केला, तर त्याचे शारीरिक आणि मानसिक फायदे तात्काळ जाणवू लागतात. हे तीनही अत्यंत सोपे मार्ग योगशास्त्रामध्ये सविस्तरपणे सांगण्यात आले आहेत.


भारताची योग परंपरा अत्यंत समृद्ध आणि महान आहे. पतंजलींचे योगसूत्र, स्वात्माराम यांचे हठयोग प्रदीपिका, बी. के. एस. आय्यंगार यांची आय्यंगार योग पद्धती, डॉ. करंदीकर यांची संजीवन योग पद्धती अशा अनेक महान योगगुरूंनी आणि त्यांच्या विविध पद्धतींनी जगाला अमूल्य देणगी दिली आहे. या सर्व योगगुरूंनी आपली तपश्चर्या आणि ज्ञान स्वतःपुरते मर्यादित न ठेवता ते जगाला निरपेक्ष भावनेने बहाल केले. म्हणूनच आज जागतिक स्तरावर भारत या योग परंपरेचे नेतृत्व करत आहे, ही सर्व भारतीयांसाठी अत्यंत अभिमानास्पद बाब आहे. जागतिक पातळीवर तब्बल १७८ देशांनी योग दिनाला मान्यता दिली असून, आज तो एका आनंदोत्सवासारखा साजरा केला जात आहे.

विविध वयोगटातील स्त्री-पुरुष, अपंग, व्याधीग्रस्त आणि विशेषतः महिलांसोबत काम करताना मला असे आढळले की, लोकांना सोप्या गोष्टी मिळाल्या की ते त्या आनंदाने करतात. परावलंबित्व वाढले की लोकांचा कल कमी होतो. परंतु योग हे असे शास्त्र आहे जे तुम्ही स्वतःचे स्वतः करू शकता. ज्या लोकांनी अजूनही योगाचा स्वीकार केलेला नाही, त्यांनी आरोग्यासाठी इकडे-तिकडे न भटकता या खात्रीशीर योगमार्गाचा स्वीकार करावा. पाश्चात्त्य देशांनी योगाचे महत्त्व ओळखले असून आता आपणही 'मेड इन इंडिया' असलेल्या या ५००० वर्षे जुन्या वारशाचा अभिमानाने स्वीकार केला पाहिजे. आगामी योग दिनाचे औचित्य साधून केवळ एक दिवस किंवा तासभराचा कार्यक्रम न करता, योग ही आपली रोजची जीवनशैली बनवण्याचा संकल्प प्रत्येकाने करावा.

**डॉ. अनुराधा प्रसाद ओक,**
संचालिका, आत्मजा हेल्थ अवरनेस ऑर्गनायझेशन

### निरोगी वृद्धत्वासाठी हा यंदाचा विषय...

यंदाच्या १२ व्या आंतरराष्ट्रीय योग दिनाची संकल्पना ही प्रामुख्याने निरोगी वृद्धत्वासाठी योग या विषयावर केंद्रित आहे. सध्या जागतिक स्तरावर वाढते वय आणि वृद्धत्वातील आरोग्य हे एक मोठे आव्हान बनले आहे. या पार्श्वभूमीवर वृद्धत्वाचा काळ सुखी, समाधानी आणि निरोगी जाण्यासाठी योग हा एक अत्यंत महत्त्वाचा आधारस्तंभ ठरू शकतो. वाढत्या वयानुसार येणारे आजार आणि शारीरिक मर्यादांवर मात करण्यासाठी योगाचा मोठा उपयोग होतो.



# ऑपरेशन समन्वय अंतर्गत मुळेगाव तांडा येथे धडक कारवाई; ८ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२० जून-**

अवैध हातभट्टी निर्मिती आणि विक्रीचे समूळ उच्चाटन करण्यासाठी जिल्हाधिकारी एस.कार्तिकेयन यांच्या निर्देशानुसार हाती घेण्यात आलेल्या ऑपरेशन समन्वय अंतर्गत मुळेगाव तांडा येथे धडक कारवाई करत एकूण ८ लाख २५ हजार ८५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. तसेच ४ अवैध वीज कनेक्शन तोडण्यात आले. लाकूड कापण्याचे मशीनही जप्त करण्यात आले आहेत. या कारवाईत ४,२५० लीटर रसायन जप्त करण्यात आले असून याप्रकरणी ३ गुन्हे नोंदवण्यात आले आहेत. ३ जणांवर प्रत्यक्ष कारवाई करून १,६७,८५० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केले. अवैध सॉ मील आणि




हातभट्ट्या चालवण्यासाठी केवळ आकडे टाकून अनधिकृतपणे वीज वापरली जात होती. यावर महावितरण विभागाने कारवाई करत ४ अनधिकृत वीजजोडण्या तोडल्या. ४०० मीटर वायर जप्त करून ८००० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

हातभट्ट्यांसाठी मोठ्या प्रमाणावर साठवून ठेवलेले लाकूड आणि त्याच्या कटाईसाठी वापरण्यात येणाऱ्या अनधिकृत सॉ मील (आरा यंत्रावर) वनविभागाने थेट जप्ती आणली. यामध्ये २ आरा यंत्रे, ३ ग्राइंडर यंत्रे, ६ चेन सॉ आणि १ विद्युत मोटर, २ वजन काटे आणि सुमारे १६० घनमीटर लाकूडसाठा जप्त केला. या सर्व साहित्याची अंदाजे किंमत ६ लाख ५० पन्नास हजारांचा आहे. राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या अधीक्षक भाग्यश्री जाधव आणि उपअधीक्षक सौरभ अदाटे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. या मोहिमेत राज्य उत्पादन शुल्क विभागाचे निरीक्षक यांच्यासह वनविभाग, महावितरण, ग्रामीण पोलीस स्टेशन, महसूल विभागाचे तलाठी आरिफ हुडीवाले आणि मुळेगावच्या पोलीस पाटील अश्विनी राठोड यांनी एकत्रित सहभाग घेतला.

# दोन बॉम्बस्फोटांनी हादरला पाकिस्तान

## १८ नागरिकांचा मृत्यू, २३ जखमी, खैबर पख्तुनख्वा प्रांतात सुरक्षा दलाचा ताफा लक्ष्य, शोधमोहीम युद्धपातळीवर सुरू





**क्वेटा, २० जून**

पाकिस्तानच्या खैबर पख्तुनख्वा प्रांतातील बन्नू येथे शनिवारी सकाळी सुरक्षा दलाच्या ताफ्याला लक्ष्य करीत दहशतवाद्यांनी दोन बॉम्बस्फोट घडविले. रिमोट कंट्रोलच्या मदतीने एकापाठोपाठ झालेल्या स्फोटात १८ नागरिकांचा मृत्यू झाला, तर २३ जखमी आहे. या हल्ल्यानंतर दहशतवाद्यांना पकडण्यासाठी व्यापक शोधमोहीम सुरू करण्यात आली. हल्ल्याची जबाबदारी अद्याप कोणत्याही संघटनेने स्वीकारलेली नाही.

बन्नू जिल्ह्यातून सुरक्षा दलाचा ताफा एका मोहिमेवर निघाला असता वझीर उपविभागांतर्गत असलेल्या मार्का बेरा या आदिवासी आणि डोंगराळ भागातील फांग मुसा खेल परिसरात एक किमी अंतरावर रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या दोन वाहनांत स्फोटके पेरण्यात आली होती. सुरक्षा दलाचा ताफा जवळ येताच रिमोट कंट्रोलने दोन्ही वाहने उडवण्यात आले. बॉम्बस्फोटाची वेळ चुकल्याने सुरक्षा दलाच्या वाहनाला नुकसान झाले नाही, मात्र वर्दळीच्या ठिकाणी स्फोट झाल्याने यात १८ नागरिकांचा बळी गेला, तर २३ लोक जखमी असून, त्यांना तातडीने स्थानिक रुग्णालयात दाखल करण्यात आल्याची माहिती बन्नूचे जिल्हा पोलिस अधिकारी (डीपीओ) यासिर आफ्रिदी यांनी वृत्तसंस्थेला दिली. बॉम्बस्फोट तहरिक-ए-तालिबान पाकिस्तान (टीटीपी) या दहशतवादी संघटनेने घडविल्याचा संशय असून, मात्र याला दुजोरा मिळाला नाही. सुरक्षा दलाने परिसराचा घेराव करून शोधमोहीम सुरू केली आहे.

**बचाव, शोधकार्य सुरू**

घटनेनंतर तत्काळ, रेस्क्यू ११२२ च्या पथकांनी सूत्रे हाती घेतली आणि मृतदेह व जखमींना डोमेल ग्रामीण आरोग्य केंद्र आणि खलिफा गुल नवाज शिक्षण रुग्णालयात दाखल केले. अधिकाऱ्यांना भीती आहे की, या परिसरात आणखी स्फोटक उपकरणे (आयईडी) लपवून ठेवलेली असू शकतात आणि त्यासाठी कसून शोधमोहीम सुरू आहे. ◂ (वृत्तसंस्था)

### हल्लेखोरांना सोडणार नाही : झरदारी

पाकिस्तानचे राष्ट्रपती आसिफ अली झरदारी यांनी आयईडी हल्ल्याचा तीव्र शब्दांत निषेध केला असून, निष्पाप नागरिकांच्या मृत्यूवर तीव्र दुःख व्यक्त केले आहे. त्यांनी 'एक्स'वरील पोस्टमध्ये म्हटले की, हल्ल्यासाठी जबाबदार असलेल्या कोणालाही सोडले जाणार नाही. निष्पाप नागरिकांचा जीव घेणाऱ्यांना कठोर शिक्षा केली जाईल आणि हल्ल्याचा सूड घेतल्याशिवाय शांत बसणार नाही. गेल्या महिन्यात चकमकीत २५ दहशतवादी ठार झाले.

### रिमोट कंट्रोलने उडवले वाहन

फांग मुसा खेल परिसरात दोन वाहनांना रिमोट कंट्रोल स्फोटांनी लक्ष्य करण्यात आले. यावेळी प्रवाशांना घेऊन जाणारे एक खाजगी वाहन डोमेलच्या दिशेने जात असताना हल्ला झाला. या शक्तिशाली स्फोटामुळे वाहन पूर्णपणे उद्ध्वस्त झाले. घटनास्थळापासून सुमारे एक किलोमीटर अंतरावर दुसरा स्फोट झाला. दुसरे वाहनही उद्ध्वस्त झाले. योजना आखून आणि सुरक्षा दलाच्या ताफ्याला लक्ष्य करून स्फोट घडवण्यात आल्याचे प्राथमित तपासात उघड झाल्याचे आफ्रिदी यांनी सांगितले.

# खलिस्तानी दहशतवाद्यांना विमानतळावरून अटक

## पंजाबमध्ये रेल्वे उडविण्याचा आखला कट

**नवी दिल्ली, २० जून**

मलेशियातून हद्दपार करण्यात आलेल्या दोन खलिस्तानी दहशतवाद्यांना दिल्ली विमानतळावरून पंजाब पोलिसांनी अटक केली. त्यांच्यावर रेल्वे उडवण्याचा कट आणि 'डेडिकेटेड फ्रेट कॉरिडॉर'ला लक्ष्य करण्यासाठी भारतातील खलिस्तानी समर्थकांना निधी पुरवल्याचा आरोप आहे.

दोन्ही खलिस्तानी दहशतवाद्यांना मलेशियातून हद्दपार केल्यानंतर त्यांना विमानाने भारतात पाठवण्यात आले. मलेशियाचे सुरक्षा पथक दहशतवाद्यांना घेऊन दिल्लीच्या इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावर येताच त्यांना पंजाब पोलिसांनी अटक केली. गुरविंदरसिंग आणि मनजीसिंग अशी आरोपींची नावे आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, ते मलेशियातून खलिस्तानी दहशतवादी संघटनांसाठी काम करत होते. पंजाबमधील रेल्वे पायाभूत सुविधा आणि डेडिकेटेड फ्रेट कॉरिडॉरवर हल्ला करण्याचा कट रचल्याचा आरोप त्यांच्यावर आहे. २३ जानेवारी रोजी फतेहगड साहिबच्या सिरहिंद येथील रेल्वे रुळांवर आणि २७ एप्रिल रोजी पतियाळाच्या शंभू परिसरात झालेल्या आयईडी हल्ल्यात या दहशतवाद्यांचा सहभाग होता. यापूर्वी याप्रकरणात पोलिसांनी या गटाशी संबंधित चार आरोपींना अटक केली. त्यांच्याकडून आरपीजी लाँचर, आयईडी, आरडीएक्स, हँड ग्रेनेड आणि आधुनिक पिस्तूल यासह घातक शस्त्रांचा साठा जप्त केला.



**परदेशातून पाठवायचे निधी**

पोलिसांच्या म्हणण्यानुसार, हे दोन्ही आरोपी पंजाबमधील केझेडएफ समर्थकांना मोठ्या प्रमाणात पैसे हस्तांतरित करण्यासाठी परदेशी बँक खात्यांचा वापर करीत होते. हे संपूर्ण नेटवर्क पंजाबमध्ये मोठे दहशतवादी हल्ले घडवून तेथील शांतता भंग करण्याची योजना आखत होते.

दोन्ही आरोपींना पतियाळा न्यायालयासमोर हजर करण्यात आले, जिथे त्यांना पुढील चौकशीसाठी पोलिस कोठडी सुनावण्यात आली. संपूर्ण नेटवर्कचा शोध घेण्यासाठी आणि त्यात सामील असलेल्या इतर व्यक्तींना ओळखण्यासाठी सुरक्षा यंत्रणा कार्यरत आहेत. ◂ (वृत्तसंस्था)

## चित्रपट वार्ता

### 'डोरेमोन'-'दृश्यम'मध्ये होणार टक्कर

मुंबई : मागील दोन दशकांपासून टीव्ही स्क्रीवर मुलांना आणि मोठ्यांना देखील खिळवून ठेणारा 'डोरेमोन' आता मोठ्या पडद्यावर पदार्पण करीत आहे. 'डोरेमोन द मुव्ही : न्यू नोबिता अँण्ड द कॅसल ऑफ द अंडरसी डेव्हिल' हा चित्रपट २ ऑक्टोबर रोजी भारतात सर्व चित्रपटगृहात प्रदर्शित होणार आहे. याच दिवशी बॉलिवूड सुपरस्टार अजय देवगणचा 'दृश्यम-३' देखील प्रदर्शित होणार आहे. गांधी जयंतीनिमित्त चाहत्यांना एका बाजूला डोरेमोन तर, दुसऱ्या बाजूला विजय साळगावकर पाहता येणार आहे. हा अत्यंत विचित्र असा क्लॅश बॉक्स ऑफिसवर होणार आहे. खोल समुद्रामधील मैत्री आणि भन्नाट सफर डोरेमोनचा हा नवा चित्रपट मैत्री, साहस आणि अनोळखी जगाचा शोध असा थरारक पटकथेवर आधारित असणार आहे.




### 'ईठा' चित्रपटाचा टिझर प्रदर्शित

**मुंबई** : दिग्दर्शक लक्ष्मण उतेकर महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वारशातील एक महत्त्वपूर्ण कथा रूपेरी पडद्यावर घेऊन येत आहेत. ते तमाशासम्राज्ञी विठाबाई भाऊ मांग नारायणगावकर यांच्या जीवनावर आधारित 'ईठा' हा चित्रपट प्रेक्षकांसमोर आणणार आहेत. या चित्रपटात श्रद्धा कपूर मुख्य भूमिकेत असून, तिच्यासोबत रणदीप हुड्डा देखील महत्त्वाच्या भूमिकेत दिसणार आहे. चित्रपटाचा पहिला टीझर निवडक चित्रपटगृहांत दाखवण्यात आला. टीझरमधील श्रद्धाचा पहिला लूक सध्या समाज माध्यमावर व्हायरल होतो आहे. 'ईठा' हा चित्रपट २८ ऑगस्ट रोजी जगभरातील चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे. सध्या त्याचा टीझर केवळ थिएटरमध्ये दाखवण्यात येत असून, लवकरच तो अधिकृतपणे डिजिटल माध्यमांवरही प्रदर्शित केला जाण्याची शक्यता आहे.




### आमिर खान गौरी स्प्रॅटसोबत करणार नोंदणी विवाह

**मुंबई** : आमिर खान वयाच्या ६१ व्या वर्षी गर्लफ्रेंड गौरी स्प्रॅटसोबत तिसरे लग्न करणार आहेत. हे लग्न ५ जुलै रोजी होणार आहे. लग्नासाठी आमिर खान चित्रपटांमधून ब्रेक घेणार आहे. हे घरी होणारे एक अत्यंत साधे नोंदणीकृत लग्न असेल ज्यात फक्त दोन्ही कुटुंबातील सदस्य आणि काही जवळचे मित्र उपस्थित असतील. आम्ही दोघेही हा सोहळा खूप साधा आणि खाजगी ठेवू इच्छितो, असे लग्नाबद्दल बोलताना आमिर खानने सांगितले. मागील महिन्यात त्यांच्या लग्नाच्या बातम्या चर्चेत होत्या. आमिरने एका मुलाखतीत लग्नाच्या बातम्यांवर शिक्कामोर्तब केले होते. मी सध्या अमेरिकेत आहे. लग्नाची बातमी खरी आहे. आमचे लग्न ५ जुलै रोजी होईल, असे तो म्हणाला होता.



# ट्रम्प यांनी केले 'एअर फोर्स वन'च्या नवीन विमानाचे अनावरण

**वॉशिंग्टन, २० जून**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी नव्याने सुसज्ज केलेल्या 'एअर फोर्स वन' जेटचे अनावरण केले. हे विमान यापूर्वी कतारच्या मालकीचे होते आणि पुढील महिन्याच्या सुरुवातीला राष्ट्राध्यक्षांच्या प्रवासासाठी वापरले जाण्यापूर्वी त्याची 'कमिशनिंग फ्लाईट्स' सुरू होणार आहेत.

बोईंग ७४७-८आय या आलिशान जेटवर लाल, पांढरा आणि गडद निळे रंगकाम करण्यात आले आहे. याआधीच्या विमानाचा रंग फिकट निळा होता. ज्याने जॉर्ज एच. डब्ल्यू. बुश यांच्या काळापासून जवळपास ४० वर्षे राष्ट्राध्यक्षांची ने-आण केली होती. विमानाचा मागील भाग (टेल) अमेरिकेच्या लहरीदार राष्ट्रीय ध्वजाच्या डिझाईनने सजवण्यात आला आहे. सर्वांत मोठा फरक आकाराचा आहे. हे विमान आकाराने जवळपास दुप्पट मोठे आहे, असे ट्रम्प यांनी येथील 'जॉइंट बेस' येथे आयोजित एका संक्षिप्त समारंभात सांगितले. हे तळ राष्ट्राध्यक्षांच्या विमानांचे मुख्य ठिकाण आहे. आम्हाला तो फिकट निळा रंग आवडायचा, पण आता बदल करण्याची वेळ आली होती. मला अमेरिकन ध्वजाचा रंग आवडतो, असे ट्रम्प म्हणाले. हे विमान लवकरच 'कमिशनिंग फ्लाईट्स' सुरू करेल, असे अमेरिकन हवाई दलाने सांगितले. राष्ट्राध्यक्षांच्या प्रवासासाठी वापरण्यापूर्वीची ही त्याची 'अंतिम परीक्षा' असेल. बोईंगच्या 'एअर फोर्स वन' बदलण्याच्या कार्यक्रमातील विलंब आणि अमेरिकेच्या जुन्या होत चाललेल्या राष्ट्राध्यक्षीय ताफ्याची विदेशी सरकारांच्या नवीन विमानांशी होणारी वाढती तुलना यामुळे ते त्रस्त झाले होते. म्हणूनच त्यांनी कतारच्या अमिरांकडे हे विमान मिळवण्याबाबत विचारणा केली. गुरुवारी फ्रान्समधील जी-७ शिखर परिषदेवरून ट्रम्प यांचा झालेला परतीचा प्रवास हा जुन्या 'एअर फोर्स वन' विमानातील शेवटचा नियोजित प्रवास होता.

**विमानात करणार सुरक्षाविषयक बदल**

या विमानातील सुरक्षाविषयक बदलांसाठी ४०० दशलक्ष अमेरिकन डॉलर्सपेक्षा कमी खर्च येईल, असे वायुदलाने यापूर्वीच स्पष्ट केले होते. 'ब्रिज' विमानाची ही उपलब्धता जुन्या 'व्हीसी-२५ए' ताफ्यावरील ताण कमी करण्यासाठी अत्यंत महत्त्वाची आहे; कारण या जुन्या विमानांच्या देखभालीसाठी लागणारा वेळ वाढत चालला आहे. यामुळे बोईंगचे 'व्हीसी-२५बी' हे नवीन विमान दीर्घकालीन सेवेत दाखल होईपर्यंत हवाई प्रवासाची सेवा अखंडपणे सुरू राहण्यास मदत होईल. ◂ (वृत्तसंस्था)

# 'गरुडास्त्र' मोर्टार प्रणालीची यशस्वी चाचणी

## भारतीय लष्कराला नवे बळ : शत्रूचे बंकर होणार उद्ध्वस्त

**महू, २० जून**

भारताच्या संरक्षण क्षेत्रातील आत्मनिर्भर भारत आणि 'मेक इन इंडिया' मोहिमेला मोठे यश मिळाले आहे. पुणेस्थित 'नाइबे लिमिटेड' या संरक्षण तंत्रज्ञान कंपनीने मध्य प्रदेशातील महू येथे भारतीय लष्करी अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत अत्याधुनिक 'गरुडास्त्र' १२० मिमी व्हेईकल-माउंटेड मोर्टार प्रणालीची यशस्वी यशस्वी चाचणी घेतली.

गरुडास्त्र केवळ ३० सेकंदांच्या आत फायरिंग पोझिशनमध्ये येते. अवघ्या १५ सेकंदात दोन गोळे डागून, शत्रूच्या रडारला चकवा देण्यासाठी अवघ्या १५ सेकंदात आपले स्थान बदलू शकते. अवघ्या दोन जवानांच्या मदतीने ही प्रणाली ६० सेकंदात (एका मिनिटात) तब्बल १२ गोळे डागू शकते. ७ ते १० किलोमीटर अंतरावरील शत्रूच्या लक्ष्याचा वेध घेण्यासाठी यामध्ये जीपीएस आणि लेझर मार्गदर्शित अत्याधुनिक तंत्रज्ञान वापरण्यात आले आहे. गरुडास्त्रमधून १७ किलो वजनाचा शक्तिशाली दारुगोळा डागला जातो, जो २० सेंमी जाडीचे काँक्रीटचे मजबूत बंकर एका झटक्यात उद्ध्वस्त करू शकतो. ◂ (वृत्तसंस्था)



# ढाक्यात हिंदूंचा हुंकार, श्रीरामाचा जयजयकार

## कट्टरवाद्यांविरोधात एकवटले अल्पसंख्यक ● बांगलादेशच्या प्रत्येक जिल्ह्यात राममंदिर उभारण्याचा संकल्प

**ढाका, २० जून**

बांगलादेशच्या उत्तर गाईबांधा जिल्ह्यातील पलाशबारी येथे भगवान श्रीरामाच्या सर्वांत उंच (८१ फूट) मूर्तीच्या निर्मितीला कट्टरपंथी इस्लामी संघटनांकडून विरोध केला जात असताना, श्रीरामाच्या चित्राची विटंबना करण्यात आल्याची घटना घडली. यानंतर देशभरात हिंदू नागरिकांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली. या घटनेनंतर राजधानी ढाकामध्ये सलग दुसऱ्या दिवशी शनिवारी हिंदू संघटनेकडून आंदोलन करण्यात आले. भगवान श्रीरामाच्या मूर्तीच्या बांधकामात अडथळा आणल्यास बांगलादेशातील सर्व ६४ जिल्ह्यांमध्ये राममंदिर उभारू असा संकल्प हिंदूंनी केला.

'नॅशनल कमिटी फॉर पूजा सेलिब्रेशन्स'ने शनिवारी देशभरात आंदोलनाची घोषणा केली. याचाच भाग म्हणून राजधानी ढाका येथे तीव्र आंदोलने सुरू झाली आहेत. सध्या या मूर्तीचे काम थांबवण्यात आले असून, या विटंबनेमागे असलेल्या दोषींना तत्काळ अटक करण्यात यावी, या मागणीसाठी हजारो हिंदू आंदोलनात सहभागी झाले. या आंदोलनामुळे मुस्लिम बहुसंख्य असलेल्या बांगलादेशातील अल्पसंख्याकांच्या हक्कांच्या चिंतेचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. 'श्री श्री राधा गोविंद मंदिर समिती'ने आरोप केला की, श्रीरामाच्या भव्य मूर्तीचे काम रोखण्यासाठी इस्लामी संघटनांकडून सातत्याने धमक्या दिल्या जात आहे. या घटनेप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असला, तरी अद्याप कोणालाही अटक करण्यात आलेली नाही.

'श्री श्री राधा गोविंद मंदिर समिती'चे अध्यक्ष हरिदास चंद्र दास यांनी सांगितले की, इस्लामी कट्टरपंथीयांनी आमचे दैवत असलेल्या श्रीरामाचा अवमान केला आता आम्ही मागे हटणार नाही. बांगलादेशातील सर्व ६४ जिल्ह्यांमध्ये एकापाठोपाठ एक राममंदिर उभारले जाईल. मूर्तीचे जवळपास ८० टक्के काम पूर्ण झाले आहे, मात्र विरोधामुळे बांधकाम थांबवण्यात आले आहे. मागण्या पूर्ण होत नाहीत तोपर्यंत आंदोलन सुरूच राहील. ◂ (वृत्तसंस्था)





# पोलिस ठाण्यावर हल्ला प्रकरणात जहांगीरच्या पत्नीला अटक

## हल्लेखोरांचे केले होते नेतृत्व

**कोलकाता, २० जून**

तृणमूल काँग्रेस नेता जहांगीर खानला पोलिस कोठडीतून सोडवण्याच्या हिंसक प्रयत्नाचा सूत्रधार आणि फालता पोलिस ठाण्यावरील हल्ल्याचे नेतृत्व केल्याच्या आरोपाखाली त्याच्या पत्नीला शनिवारी अटक करण्यात आली. या घटनेपासून फरार असलेल्या रेजिना बीबीला जुल्पिया परिसरातून ताब्यात घेण्यात आले.



अनेक गुन्हेगारी प्रकरणांमध्ये तृणमूल काँग्रेसचा नेता जहांगीर खानला नेपाळ सीमेजवळ अटक करण्यात आली होती. त्याच्या सुटकेसाठी कथितरीत्या आयोजित केलेल्या आंदोलनाचे नियोजन आणि समर्थकांना संघटित करण्यात रेजिनाने महत्त्वाची भूमिका बजावली होती. त्या लोकांना संघटित करण्यामागे आणि पोलिस ठाण्यावरील हल्ल्यामागील प्रमुख सूत्रधारांपैकी एक होत्या. त्याच्यावर शस्त्र कायदा आणि स्फोटक कायद्याच्या तरतुदींसह अनेक गंभीर आरोप आहेत.

**आंदोलकांचा पोलिस ठाण्याच्या आवारात घुसण्याचा प्रयत्न**

एका वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्याने सांगितले की, हिंसाचाराच्या एक दिवस आधी रेजिनाच्या नेतृत्वाखाली एक बैठक झाली होती. त्यात पोलिस ठाण्यापासून सुमारे ३ किमी अंतरावर समर्थकांना एकत्र करून संघटितपणे पोलिस ठाण्याकडे मोर्चा काढण्याची योजना आखण्यात आली होती. मोर्चादरम्यान, आंदोलकांनी पोलिसांच्या वाहनांची तोडफोड केली आणि पोलिस ठाण्याच्या आवारात घुसण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे परिस्थिती हिंसक झाली. जमावाला पांगवण्यासाठी पोलिसांना लाठीचार्ज करावा लागला. ◂ (वृत्तसंस्था)

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## रोखठोक

# जायचे ते खुशाल गेले...; पुढे काय?

**दिनेश गुणे**

काही म्हणी किंवा वाक्प्रचार ही जीवनशैलीची अनुभवसिद्ध उदाहरणे असतात. शुक्रवारी महाराष्ट्राच्या राजकारणातील एक प्रसंग ज्यांनी पाहिला आणि ऐकला, त्यांना या वाक्प्रचाराच्या पुनरावृत्तीचा प्रत्यय निश्चितच आला असेल. १९ जून १९६६ या दिवशी, महाराष्ट्रातील मराठी माणसाच्या न्याय्य हक्कांसाठी शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी स्थापन केलेल्या शिवसेनेच्या हीरक महोत्सवी वर्धापनदिनाचे दोन सोहळे शुक्रवारी, १९ जून २०२६ या दिवशी मुंबईत स्वतंत्रपणे साजरे झाले आणि बाळासाहेबांच्या हयातीतील शिवसेनेच्या इतिहासातील काही प्रसंगांची पुनरावृत्ती झाल्याचा प्रत्यय अनेकांस आला. मराठीत 'खुंटा हलवून बळकट करणे' असा एक वाक्प्रचार आहे. आपल्या अस्तित्वाचे अढळपद अधोरेखित करण्यासाठी किंवा आपल्या अस्तित्वाचे महत्त्व ओळखण्यासाठी काही वेळा जी कृती केली जाते, त्यासाठी हा वाक्प्रचार वापरला जातो. शिवसेनेच्या इतिहासात शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी काही वेळा याच कृतीचा वापर केला, पण त्या प्रत्येक वेळी त्यांच्या अस्तित्वाचे अढळपद अधिक ठळकपणे अधोरेखित झाले होते. शुक्रवारी मुंबईच्या षण्मुखानद सभागृहात शिवसेनेच्या उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाने आयोजित केलेल्या वर्धापन दिन कार्यक्रमात उद्धव ठाकरे यांनी बाळासाहेबांच्या त्याच कृतीची पुनरावृत्ती केली, पण त्यामध्ये आपल्या अस्तित्वाचे अढळपद अधोरेखित करण्याचा प्रयत्न कोठेच दिसला नाही. उलट, आपल्या अस्तित्वाचे महत्त्व जाणून घेण्याचा तो प्रयत्न असावा असेच अनेकांस वाटले असेल. बाळासाहेब ठाकरे यांनीही काही प्रसगांमुळे व्यथित होऊन शिवसेनाप्रमुखपद सोडण्याचा निर्णय जाहीर केला होता. उद्धव ठाकरे यांनी तसे केले नाही, पण पद सोडण्याची तयारी दाखवून खुंटा हलवून बळकट आहे किंवा नाही याची चाचपणी मात्र निश्चितच केली.

शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे ते शिवसेना उबाठा गटप्रमुख उद्धव ठाकरे अशा वाटचालीतील या पुनरावृत्तीचा इतिहास जाणून घेण्यासाठी सुमारे पाच दशके मागे जावे लागेल. नोव्हेंबर १९७८ मध्ये झालेल्या मुंबई महापालिका निवडणुकीत शिवसेनेच्या ११७ उमेदवारांपैकी केवळ २१ उमेदवार विजयी झाले. शिवसेनेच्या बालेकिल्ल्यातच झालेल्या या दारुण पराभवामुळे बाळासाहेब व्यथित झाले आणि शिवाजी पार्क मैदानावरील लाखोंच्या जाहीर सभेत त्यांनी शिवसेनाप्रमुखपदाचा राजीनामा देण्याची घोषणा केली. 'आमुचा रामराम घ्यावा', अशा मथळ्याचा अग्रलेख 'मार्मिक' साप्ताहिकात लिहून आपल्या निर्णयामागील भूमिकाही त्यांनी स्पष्ट केली. तेव्हा 'मार्मिक'मधील प्रत्येक शब्दाकडे महाराष्ट्रात गांभीर्याने पाहिले जायचे. कारण त्यामध्ये प्रसिद्ध होणारे शब्द आणि प्रत्येक व्यंगचित्र केवळ विनोदी किंवा टोमणे नव्हते. बाळासाहेबांच्या विचारातून आणि कुंचल्यातून उतरलेल्या शब्दांनी आणि व्यंगचित्रांनी राजकारणाला चिमटे आणि बोचरे बोचकारे काढले. राजकारणातील व्यंगावर नेमके बोट ठेवत शब्दांचे आणि रेषांचे आसूड ओढले आणि समाजाला जागे करण्यासाठी प्रसंगी शब्दांचे फटकारेही मारले. त्यामुळे बाळासाहेबांनी स्वतःच शिवसेनाप्रमुखपद सोडण्याचा निर्णय जाहीर केल्यानंतर शिवसेनेत अक्षरशः हाहाकार माजला. मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत शिवसेनचा भगवा महापालिकेवर फडकला नाही तर आपण शिवसेना प्रमुखपदावरून दूर होऊ, असे त्यांनी त्याआधीच्या दसरा मेळाव्यात जाहीर केले होते. आयुष्यात आपण शब्दांची कदर करत असल्यामुळे ती प्रतिज्ञा करताना आपला विवेक शाबूत ठेवला होता, त्यामुळे निवडणुकीतील २१ जागांवरील विजय हा हुरळून जाण्यासारखा नसल्याने शब्दाला जागून आपण राजीनाम्याचा निर्णय घेतला, असे बाळासाहेबांनी स्पष्ट केले आणि शिवसैनिकांना भावनावेग अनावर झाला. त्या निर्णयानंतर शिवाजी पार्कवरील त्या सभेत एखादी वावटळ उठावी त्या त्वेषाने असंख्य श्रोते उभे राहिले. अनेक जण व्यासपीठाच्या दिशेने धावले आणि अनेकांनी व्यासपीठाला वेढा घालून गगनभेदी घोषणा देत बाळासाहेबांच्या निर्णयास विरोध सुरू केला. अनेकांना तर रडू अनावर झाले आणि 'आपला निर्णय आपल्या हातात नाही', याची जाणीव बाळासाहेबांना झाली. 'राजीनाम्याचा निर्णय जाहीर केल्यानंतर केवळ शाब्दिक कसरती करून तो फिरविण्याचा नादानपणा मला करायचा नव्हता, म्हणून अट्टहासाने शब्दाला जागून शिवतीर्थावर मराठी माणसाच्या चरणी आम्ही आमचा राजीनामा सादर केला, पण आपला निर्णय घेणेदेखील आपल्याला शक्य राहिलेले नाही असे लक्षात आल्याने लोकांच्या भावनेची कदर करून राजीनामा मागे घेतला', असे बाळासाहेबांनी त्या लेखात नमूद केले होते.

शिवसेनेच्या इतिहासातील प्रमुखपदाचा त्याग करण्याचा हा प्रसंग केवळ खुंटी हलवून बळकट करण्याचा किंवा आपल्या अढळपदाचा अबाधितपणा अनुभवण्याचा प्रयोग नव्हता, हे तेव्हा बाळासाहेबांच्या लाखो अनुयायांनीच सिद्ध करून दाखविले होते. बाळासाहेबांच्या नेतृत्वावरील शिवसैनिकांची अढळ श्रद्धा या प्रसंगाने अधोरेखित झाली आणि त्यांचे नेतृत्व तेजाळले. असे आणखीही काही प्रसंग बाळासाहेबांच्या नेतृत्वकाळात घडले. १९९२ मध्ये छगन भुजबळ यांनी शिवसेनेचा त्याग केला. शिवसेनेच्या इतिहासातील बंडखोरीचा हा सर्वांत मोठा, पहिला प्रसंग ठरला. त्याआधी हेमचंद्र गुप्ते यांनी पक्ष सोडला होता, पण ती फूट ठरली नव्हती. छगन भुजबळ यांच्या पक्षत्यागामुळे दुखावलेल्या बाळासाहेबांनी जुलै १९९२ मध्ये शिवसेनाप्रमुखपद सोडण्याची घोषणा केली. महाराष्ट्रात सर्वत्र शिवसैनिक रस्त्यावर उतरले. बाळासाहेबांना त्या निर्णयापासून परावृत्त करण्यासाठी ठिकठिकाणी आंदोलने झालीत आणि 'बाळासाहेबांशिवाय शिवसेना नाहीच' अशी ठाम भूमिका कार्यकर्त्यांनी घेतल्यावर पुन्हा बाळासाहेबांनी आपला निर्णय मागे घेतला. बाळासाहेबांचे नेतृत्व आणि पक्षावरील पकड निर्विवादपणे मजबूत झाली आणि नेतृत्वावरील भावनिक निष्ठा हा पुढे शिवसेनेचा मुख्य आधार ठरला. पक्षाच्या दृष्टीने ही एक जमेची बाजू असली, तरी अशाच प्रसंगांतून, नेतृत्वाभोवतीची व्यक्तिपूजनाची संस्कृतीदेखील विकसित झाली आणि नवे नेतृत्व विकसित होण्याच्या शक्यतादेखील संपुष्टात आल्या, हेदेखील याच इतिहासाने दाखवून दिले. पुढे नेतृत्वाच्या मुद्यावरूनच शिवसेनेत उफाळलेल्या वादामुळे व्यथित झालेल्या बाळासाहेबांना नेतृत्वाचे हस्तांतरण करण्याचा निर्णय घ्यावा लागला. हा शिवसेनेचा अत्यंत संवेदनशील काळ ठरला, पण त्यातून संघटनेत उत्तराधिकाराची प्रक्रिया सुरू झाली आणि उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वास अधिकृत रूप प्राप्त झाले. बाळासाहेबांनी राजीनामा किंवा पदत्याग हा शब्द अनेकदा संघटनात्मक शस्त्र म्हणून वापरल्याचे दिसते. परंतु तो केवळ सत्तेचा खेळ नव्हता, तर कार्यकर्त्यांच्या निष्ठेची चाचणी आणि पक्षसंघटन भावनिक धाग्याने बांधून पुन्हा एकत्र आणण्याचा व संघटना बळकट ठरण्याचे साधन ठरला होता. शिवसेनाप्रमुखपद सोडण्याचा निर्णय त्यांनी जेव्हा जेव्हा जाहीर केला किंवा बोलून दाखविला, त्या प्रत्येक वेळी त्यांचे नेतृत्व निर्विवाद ठरले आणि 'शिवसेना म्हणजे बाळासाहेब आणि बाळासाहेब म्हणजे शिवसेना' ही भावना अधिक बळकट होत गेली.

या प्रथेची पुनरावृत्ती पुढे अनेकदा उद्धव ठाकरे यांच्या कार्यकाळातही झालेली दिसते. माझे नेतृत्व मान्य नसेल तर सांगा, मी दूर होतो, असे सांगत उद्धव ठाकरे यांनी यापूर्वीही अनेकदा याच भावनिक शस्त्राचा वापर केला होता, पण त्यामागचे कारण वेगळे होते. उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वावर प्रश्नचिन्हे उमटवूनच पुढे पहिल्या फळीतील काही नेत्यांनी शिवसेना सोडली होती. उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वावर विश्वास नाही, हे अनेक नेत्यांनी जाहीरपणे बोलूनही दाखविले होते. जेव्हा जेव्हा शिवसेनेत अशी फूट पडली, तेव्हा तेव्हा उद्धव ठाकरे यांनी बाळासाहेबांच्या प्रयोगाची पुनरावृत्ती करण्याचा प्रयत्न केला होता, पण बाळासाहेबांसारखा प्रचंड भावनिक पाठिंबा त्यांच्या वाट्याला आलाच नाही. अनेकांनी नेतृत्वावर प्रश्नचिन्हे उमटवायची आणि मूठभरांनी निष्ठेचे प्रदर्शन करत पाठिंबा व्यक्त करायचा असेच अशा प्रसंगांतून दिसत राहिले. थोडक्यात, बाळासाहेबांच्या या शैलीचा पक्षावरील प्रभाव संपुष्टात आल्यानंतरही उद्धव ठाकरे पुन्हा पुन्हा त्याचा वापर करण्याचा प्रयत्न करत राहिले. बाळासाहेबांच्या या शैलीमुळे खरे तर, पक्षाची वैचारिक व संघटनात्मक ताकद नेतृत्वाच्या व्यक्तिमत्त्वावरच अवलंबून राहिली होती. त्यामुळे बाळासाहेबांच्या पश्चात उत्तराधिकाराचे आणि नेतृत्वाचे प्रश्न तीव्र स्वरूपात समोर येत राहिले. राज ठाकरे यांचा पक्षत्याग, त्यानंतरचे वेगवेगळे बंडखोरीचे प्रसंग आणि अखेरीस एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील बंडामुळे उद्धव ठाकरेंच्या नेतृत्वशैलीच्या भविष्यावरच उमटलेले प्रश्नचिन्ह या सर्वांची बीजे काही प्रमाणात संघटनेच्या नेतृत्वकेंद्रित रचनेत शोधता येतात. पदत्यागाचे इशारे म्हणजे आपल्या नेतृत्वाचा अढळपणा अबाधित राखण्याचे प्रयत्न असा एक वेगळाच अर्थ त्यामागे दडल्याची भावना निर्माण होऊ लागली.

बाळासाहेबांच्या पदत्यागाच्या घोषणांनी अल्पकालीन संघटनात्मक एकजूट वाढविली, पण कदाचित त्यामुळेच संघटनेतील संस्थात्मक नेतृत्वनिर्मितीच्या प्रक्रियेला मर्यादा आल्या असाव्यात. त्यामुळे, ही शैली दीर्घ कालाकरिता प्रभावी राहिलेली नाही. उद्धव ठाकरे यांनी शिवसेनेच्या वर्धापनदिन कार्यक्रमात त्याचा वापर केला, तेव्हा त्यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त करणाऱ्या निष्ठावंतांनी त्यास विरोध जरूर केला, पण साठ वर्षांच्या वाटचालीपैकी गेल्या २३ वर्षांत शिवसेनेबाहेर जाणाऱ्यांच्या प्रवाहाचा जोरदार वेग रोखण्याऐवजी धरणाचे दरवाजे उघडून प्रवाहास बाहेरची वाट करून देण्याचेच धोरण अधिक प्रभावीपणे राबविले गेले. २००३ मध्ये शिवसेनेच्या महाबळेश्वर शिबिरात संघटनेमध्ये कार्यकारी प्रमुखपद निर्माण करण्यात आले आणि लगोलग उद्धव ठाकरे यांची या पदावर एकमताने निवड करण्यात आली. त्याआधीच्या वर्षात उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेने राज्यात सत्ताधाऱ्यांविरोधात 'चालते व्हा' आंदोलन गाजविले होते. २००५ मध्ये उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेने कामाला जोरदार सुरुवात केली आणि त्याच वर्षी नारायण राणे यांनाच 'पक्षातून चालते व्हा' असा आदेश देण्यात आला. उद्धव ठाकरेंच्या नेतृत्वावर जोरदार टीका करत राणे शिवसेनेतून बाहेर पडले आणि संघटनेच्या गळतीला सुरुवात झाली. २००६ मध्ये राज ठाकरे यांनीही उद्धव ठाकरे यांना लक्ष्य करत शिवसेनेला सोडचिठ्ठी देऊन नवा पक्ष स्थापन करण्याची घोषणा केली. त्यानंतर जेव्हा जेव्हा पक्षात फूट पडली, बाळासाहबांचे निष्ठावंत कार्यकर्तेदेखील पक्षाला सोडचिठ्ठी देऊन उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वावर टीका करू लागले, तेव्हा तेव्हा, 'जाणाऱ्यांनी खुशाल जावे' असाच पवित्रा उद्धव ठाकरे यांनी घेतल्याचे दिसते. शिवसेनेसमोरील संकटाचा सामना करण्यासाठी आपण पहाडासारखे एकटेच उभे राहू, हा उद्धव ठाकरेंचा फुकाचा आत्मविश्वास हेच त्याचे कारण असावे.

महाराष्ट्राने शिवसेनेला मनापासून साथ दिली होती. स्वबळावर राज्याची सत्ता मिळाली नाही, तरी मंत्रालयावर भगवा फडकावण्याच्या बाळासाहेबांच्या स्वप्नास १९९५ मध्ये महाराष्ट्रातील जनतेने साथ दिली होती. शिवसेना आणि भाजप ही नैसर्गिक युती आहे आणि ती काही निश्चित विचारांशी बांधील आहे, हे युतीचे सूत्र जनतेनेही मान्य केले होते. त्यामुळेच, युती म्हणून लढविलेल्या सर्व निवडणुकांतील शिवसेना आणि भाजपचे यश महाराष्ट्राच्या राजकारणावर प्रभाव टाकून राहिले होते. अगोदरच उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वावर आक्षेप असलेल्या नेत्यांनी पक्षाला सोडचिठ्ठी देण्याचा सपाटा लावल्याने कमकुवत होत गेलेला शिवसेनेचा तंबू, २०१९ मधील निवडणुकीनंतर बदललेल्या राजकारणामुळे अधिकच डळमळीत झाला होता. काँग्रेस-राष्ट्रवादीसोबत सत्ता स्थापन करण्याच्या उद्धव ठाकरे यांच्या निर्णयास वैधानिकदृष्ट्या नाकारता येत नसले, तरी महाविकास आघाडीसोबत जाण्याच्या राजकारणावर नैतिकदृष्ट्या काही प्रश्नचिन्हे उमटलीच होती. ठाकरे यांच्या या निर्णयामुळेच शिवसेनेतील बाळासाहेबांच्या निष्ठावंतांच्या जाणिवा दुखावल्याचे वारंवार स्पष्टदेखील होत गेले आहे. आज महाराष्ट्रात जनतेने दिलेला कौल पाहता, बाळासाहेबांच्या शिवसेनेवरील ठाकरे परिवाराचे वर्चस्व जवळपास संपुष्टात आल्यासारखी स्थिती दिसते. शुक्रवारी दोन वेगवेगळ्या कार्यक्रमांत शिवसेनेचा वर्धापनदिन मुंबईत साजरा झाला, तेव्हा एका बाजूला पक्षाचा जुना दमदार आवाज उमटत होता, तर दुसरीकडे मात्र, उद्विग्न आणि अपयशाची खंत उमटताना दिसत होती. आता ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील पक्ष हा केवळ एका गटापुरता मूठभर उरला आहे. तो पुन्हा उभा करण्याचे आव्हान सोपे नाही. बाळासाहेबांचा करिष्मा असेपर्यंतच शिवसेनेवर उद्धव ठाकरे यांचे वर्चस्व राहील आणि तोपर्यंतच त्यांचे नेतृत्व अबाधित राहील, त्यानंतर मात्र काळासोबत त्यांचा प्रभाव कमी होत जाईल, असे भाकीत सुमारे दोन दशकांपूर्वी, ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक दत्ताजी ताम्हणे यांनी वर्तविले होते. बाळासाहेबांचा प्रभाव असलेला मोठा वर्ग आता ठाकरेंच्या गटापासून दुरावला आहे. बाळासाहेबांनी आपल्या झंझावाती प्रचारशैलीने आणि आक्रमक विचारांनी त्यांच्या काळातील तरुणांची मने जिंकली होती. ती पिढी आता जुनी झाली. आताच्या तरुणांवर बाळासाहेबांसारखा प्रभाव टाकणारे नेतृत्व ठाकरे गटाकडे नाही, हे वास्तव आहे. कालपरवा केवळ आभासी मंचावर स्थापन झालेल्या झुरळ जनता पार्टीने देशातील तरुणाईला आकर्षित करून राजकारणास त्यांची दखल घेणे भाग पाडले होते. ठाकरे गटाच्या नेत्यांसमोर तेदेखील एक मोठे आव्हान आहे. केवळ 'जायचे त्यांनी खुशाल जावे' ही ठाकरेंच्या राजकारणाची नीती असताना, दुसरीकडे मात्र, अन्य राजकीय पक्षांत दाखल होणाऱ्यांसाठी पायघड्या घातल्या जात आहेत. बेरजेला महत्त्व असलेल्या जमान्यात वजाबाकीचे राजकारण कितपत यशस्वी होईल यावर ठाकरे यांच्या नेतृत्वाचा कस लागणार आहे. कारण त्यांच्या पक्षाचे दरवाजे उघडे असले, तरी त्यातून बाहेर पडण्याचीच मुभा दिली गेली आहे. ■

dineshgune@gmail.com

## रविवारची पत्रे

### नियमित योगसाधना करावी

भारतीय प्राचीन संस्कृतीत योग, योगासने, योगसाधना यांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. प्राचीन काळापासून भारतातल्या साधुसंत, ऋषिमुनींनी योगाचे महत्त्व, त्याचे फायदे आणि त्याची गरज पटवून दिली आहे. तन आणि मन यांचा एकत्रित व्यायाम म्हणजे योग. आजच्या काळातील धकाधकीच्या जीवनात योगाच्या माध्यमातून आपण आपले शरीर तंदुरुस्त ठेवू शकतो; शिवाय मनावरही चांगले संस्कार करू शकतो. भारतातील योगाची संस्कृती जागतिक पातळीवर स्वीकारली गेली आहे. जगभरातील देशांनी योग केवळ स्वीकारला नाही, तर त्याचा प्रचार आणि प्रसारही केला आहे. कोरोनारूपी महामारीच्या काळात तर योगदिनाला विशेष महत्त्व प्राप्त झाले होते. कोरोनासारख्या महामारीचा मुकाबला करायचा असेल तर आपल्या शरीरातील रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यावर भर दिला पाहिजे. नियमित व्यायाम आणि योगासन यांनी आपली रोगप्रतिकारक शक्ती वाढू शकते. योग कसा करावा, कोणती योगासने मनाला आणि शरीराला सक्षम ठेवू शकतात यावर अभ्यासकांनी मते मांडली आहेत. त्याप्रमाणे दररोज योगसाधना करणे गरजेचे आहे. आज योगदिनानिमित्त एक दिवस योग करून त्याचे फोटो सोशल मीडियावर टाकून या दिनाचा इव्हेंट न करता सर्वांनी योगाचा अंगीकार करून नियमित सराव करावा. जगाने योगाला राजमान्यता दिली आहे. आपणही नियमित सराव ठेवून योगसाधना केली तरच आजच्या योगदिनाचे सार्थक झाले असे म्हणावे लागेल.



**श्याम ठाणेदार**/९९२२५४६२९५

* * *

### श्री देवनाथ मठ; एक दिवसीय भक्ती-सफर

आजच्या धकाधकीच्या प्रवासात मनाला शांती देणारे क्षण दुर्मिळ होत चालले आहेत. अशातच माझे स्नेही अंजनगाव सुर्जी निवासी (हल्ली मुक्कामी पुणे) यांचा मला फोन आला... ''मी अंजनगावला आलो असून येथे अधिकमासानिमित्त श्रीमद्‌भागवत कथा ज्ञानयज्ञ सप्ताहाचे आयोजन केले आहे; तू उद्या येतोस का?'' मित्राच्या या आपुलकीच्या आग्रहाला मी क्षणाचाही विलंब न लावता लगेच होकार दिला आणि एका दिवसाची आध्यात्मिक सफर आणि अद्‌भुत कथाश्रवणाचा योग जुळून आला. अमरावतीवरून अंजनगाव सुर्जीसाठीचे अंतर ८३ किलोमीटरचे आहे. अंजनगाव आणि सुर्जी ही दोन गावे मिळून आता 'अंजनगाव सुर्जी' हे एकच नाव रूढ झाले आहे. हे एक अत्यंत सधन गाव म्हणून गणले जाते. येथील बारमाही बागायती शेती, केळी आणि संत्र्यांचे मळे गावाची समृद्धी अधोरेखित करतात. जवळच शहानूर नदीवर मोठे धरण आहे.



गावाच्या समृद्धीला जोड आहे ती येथील थोर संतांच्या आध्यात्मिक वारशाची. पैठणचे सुप्रसिद्ध सत्पुरुष आणि थोर संत श्री एकनाथ महाराज यांच्या शिष्य परंपरेतील महान संत श्री देवनाथ महाराज यांचा जन्म अंजनगाव येथेच झाला होता. त्यांनी इ. स. १७५४ मध्ये येथे 'श्री देवनाथ मठाची' स्थापना केली. याच पवित्र परंपरेतील १८ वे महापुरुष श्री मनोहरनाथ महाराज यांच्यानंतर सध्या आचार्य स्वामी श्री जितेंद्रनाथ महाराज हे या पीठाची गादी सांभाळत असून त्यांच्याच मार्गदर्शनाखाली हा सोहळा सुरू आहे.

बसस्थानकावरून आम्ही थेट मठात गेलो. मठाचा परिसर अत्यंत विस्तीर्ण, शांत आणि मनाला प्रसन्न करणारा रमणीय शहानूर (शरनीरा) नदीच्या तीरावर आहे. या ठिकाणी भगवान श्री हनुमंत गर्भात असताना काही काळ अंजनी मातांनी येथील शरनीरा नदीकाठजवळील मंदिर परिसरातील पिंपळाच्या वृक्षाजवळ तपस्या केली होती, अशी आख्यायिका आहे. येथील मंदिरातील श्री माधव मंजिरी यांची अत्यंत नयनमनोहारी मूर्ती मनाला भुरळ पाडतात. बाहेरगावाहून येणाऱ्या शेकडो भक्तांसाठी मठात महाप्रसादाची उत्तम व्यवस्था केली जाते. आम्हीही या पवित्र प्रसादाचा आस्थेने लाभ घेतला. विदर्भातील उन्हाळ्याचे दिवस असल्याने कथेची वेळ सायंकाळची ठेवण्यात आली होती. या ज्ञानयज्ञात आचार्य स्वामी श्री जितेंद्रनाथ महाराज यांनी श्रीमद्‌भागवत महापुराणाच्या ७ व्या स्कंधातील ८ व्या अध्यायावर आधारित नरसिंह अवताराची कथा निरूपण केली. भगवान विष्णूंचा चौथा अवतार असलेला नरसिंह अवतार, बालभक्त प्रल्हादाची अढळ भक्ती आणि हिरण्यकश्यपूचा वध... हा संपूर्ण प्रसंग महाराजांनी आपल्या रसाळ आणि सुश्राव्य वाणीतून, संगीतमय पद्धतीने इतका जिवंत केला की, श्रोते मंत्रमुग्ध झाले होते. महाराजांच्या मुखातून ती अमृतवाणी ऐकताना 'ही कथा अशीच सुरू राहावी, कधी संपूच नये' असा भाव प्रत्येक भक्ताच्या मनात दाटून आला होता.

कथा समाप्तीनंतर जितेंद्रनाथ महाराजांचे दर्शन घेऊन आणि मनात एक अनोखी ऊर्जा घेऊन आम्ही मठाबाहेर पडलो. मित्राच्या एका फोनमुळे लाभलेली ही 'एक दिवसीय भक्ती-सफर' आणि इतिहास प्रसिद्ध मठाची भेट माझ्या स्मरणात कायमची कोरली गेली आहे.

**अविनाश देशपांडे**/पुणे

* * *

### समाजाची यशाची व्याख्या आणि तणावग्रस्त तरुणाई

''महागडा फोन, मोठा पगार, आलिशान घर, चारचाकी गाडी आणि प्रतिष्ठित नोकरी'' हीच आजच्या समाजाने यशाची व्याख्या ठरवून दिली आहे. लहानपणापासूनच मुलांच्या मनावर या यशाचे चित्र कोरले जाते. परिणामी स्वतःची आवड, क्षमता आणि स्वप्ने यांना दुय्यम स्थान मिळते. स्पर्धा परीक्षांचे वाढते महत्त्व, पालकांच्या अपेक्षा, समाजाची तुलना आणि आर्थिक सुरक्षिततेची चिंता यामुळे आजची तरुणाई प्रचंड तणावाखाली जगत आहे. यशाच्या मागे धावताना अनेक तरुण स्वतःलाच हरवून बसत आहेत.

आजचे युग स्पर्धेचे युग म्हणून ओळखले जाते. शिक्षण, नोकरी, करीयर आणि आर्थिक प्रगतीसाठी प्रत्येक क्षेत्रात तीव्र स्पर्धा निर्माण झाली आहे. अनेक विद्यार्थ्यांचे जीवन कोचिंग क्लास, टेस्ट सीरिज आणि अभ्यास यांच्याभोवती फिरत आहे. जेईई, नीट, यूपीएससी यांसारख्या परीक्षांसाठी वर्षानुवर्षे मेहनत घेतली जाते. या परीक्षांमध्ये यश मिळविण्यासाठी लाखो युवक-युवती दिवस-रात्र मेहनत घेत असतात. मात्र प्रत्येकाला यश मिळतेच असे नाही. काही विद्यार्थ्यांना आर्थिक अडचणी, कौटुंबिक जबाबदाऱ्या, वेळेचा अभाव, सामाजिक दबाव किंवा इतर अनेक कारणांमुळे आपल्या स्वप्नांचा त्याग करावा लागतो. अशा परिस्थितीत समाजाने ठरवून दिलेल्या यशाच्या व्याख्येमुळे तरुणाईवर मानसिक तणावाचे मोठे ओझे निर्माण होत आहे. या प्रक्रियेत त्यांचे छंद, खेळ, कला आणि आनंदाचे क्षण हरवून जातात. पालकांच्या आणि समाजाच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी विद्यार्थी सतत धडपडत असतात. प्रत्येक परीक्षेत यश मिळविण्याची सक्ती, गुणांची तुलना आणि अपयशाची भीती यामुळे अनेक तरुण मानसिक तणाव, नैराश्य आणि आत्मविश्वासाच्या कमतरतेला सामोरे जातात.

आज एखाद्या व्यक्तीचे मूल्य तिच्या उत्पन्नावर किंवा पदावर ठरवले जाते. मात्र पैसा मिळाला म्हणजे आनंद मिळेलच असे नाही. आर्थिक यश असूनही अनेक जण मानसिक समाधान, कौटुंबिक आनंद आणि अंतर्मनाची शांतता गमावून बसतात. ज्या व्यक्तीला चित्रकला, साहित्य, संगीत, क्रीडा किंवा समाजसेवा यांसारख्या क्षेत्रांत करीअर करण्याची इच्छा असते अशा अनेक तरुणांना 'यात भविष्य नाही' असे सांगितले जाते. परिणामी ते स्वतःच्या आवडीचा त्याग करून दुसऱ्यांच्या स्वप्नांचे ओझे वाहू लागतात. समाज यशस्वी व्यक्तींचा गौरव करतो, पण अपयशी व्यक्तींच्या संघर्षाकडे दुर्लक्ष करतो. त्यामुळे अपयश आले की अनेक तरुण स्वतःला कमी लेखू लागतात. प्रत्यक्षात अपयश ही शिकण्याची आणि अधिक सक्षम होण्याची संधी असते.

यशाची खरी व्याख्या प्रत्येक व्यक्तीसाठी वेगळी असते. केवळ पैसा, पद आणि प्रतिष्ठा यालाच यश मानणे योग्य नाही. ज्या क्षेत्रात व्यक्तीला आनंद, समाधान आणि आत्मिक शांतता मिळते, तेच त्यांच्यासाठी खरे यश असते. त्यामुळे पालक, शिक्षक आणि समाजाने तरुणांच्या आवडीनिवडी समजून घेऊन त्यांना योग्य दिशा देणे आवश्यक आहे. प्रत्येकाला स्वतःचे स्वप्न जगण्याचा अधिकार आहे. कारण आयुष्य केवळ यशस्वी होण्यासाठी नसते, तर समाधानी आणि आनंदी होण्यासाठीही असते. समाजाने यशाची व्याख्या बदलण्याची वेळ आता आली आहे. प्रत्येक व्यक्तीचे यश हे त्याच्या समाधानात, आनंदात आणि स्वप्नपूर्तीत दडलेले असते. पैसा आणि प्रतिष्ठा महत्त्वाची असली तरी मानसिक शांतता, आत्मसंतोष आणि जीवनातील आनंद याहून मोठे यश दुसरे नाही. तरुणांना त्यांच्या क्षमतेनुसार आणि आवडीनुसार वाटचाल करण्याचे स्वातंत्र्य मिळाले, तरच खऱ्या अर्थाने सक्षम,आनंदी आणि सुदृढ समाजाची निर्मिती होईल.

**उर्वशी मनीष संघवी**/मूर्तिजापूर, जि. अकोला

* * *

### फूटपाथवर चालणे हा मूलभूत अधिकार



वरील मथळ्याची बातमी प्रसिद्ध झाली आहे. पण पुण्यात अनेक ठिकाणी फूटपाथच नाहीत. जेथे फूटपाथ आहेत तेथे ते मोकळे नाहीत. फेरीवाल्यांच्या अतिक्रमणाने व्यापून टाकलेत. माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार महानगरपालिकेने फूटपाथ मोकळे करून पादचाऱ्यांना सुविधा उपलब्ध करून दिली पाहिजे. ज्या ठिकाणी फूटपाथच नाहीत तेथे नवीन फूटपाथ तयार केले पाहिजेत. काही ठिकाणी फूटपाथ दुरुस्त करण्याची आवश्यकता आहे. महानगरपालिकेच्या वतीने प्रत्येक प्रभागात याविषयी सर्वेक्षण करून 'फूटपाथ - नागरिकांचा मूलभूत अधिकार' हे अभियान सुरू केले पाहिजे. यामुळे विशेष करून ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग नागरिक, महिला, शालेय विद्यार्थ्यांना सुविधा उपलब्ध होईल. माननीय महापौर, नगरसेवक, लोकप्रतिनिधींनी याबाबत पाठपुरावा करावा, ही विनंती.

**मोहन रानडे**/पुणे. ९८२३३७५३००

* * *

### कॉक्रोच पिल्लू कोणाचे?

मागील काही दिवसांपासून कॉक्रोच नावाचा एक किडा खूप वळवळ करताना दिसत आहे. हा किडा अचानक कसा आणि कुठून जन्माला आला आणि त्याच्यामागे कोण आहेत, हे कुणाचे कटकारस्थान आहे, याचा शोध तपास संस्थांनी लावलाच पाहिजे. काही दिवस मागे जाऊन पाहिले असता एक गोष्ट मात्र स्पष्टपणे दिसून येते. जेव्हा पश्चिम बंगालच्या निवडणुकीचा निकाल आला आणि ममता बॅनर्जी यांचा दारुण पराभव झाला आणि काँग्रेसचे तर नामोनिशाणसुद्धा राहिले नाही. त्यानंतरच्या घडामोडींकडे सूक्ष्मपणे बघितले असता काही गोष्टी सहजपणे दिसून येतात. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी देशवासीयांना पेट्रोल, डिझेलचा वापर काटकसरीने करण्याचे आवाहन केले. त्यानंतर मोदीविरोधकांचे ओरडणे सुरू झाले. सोशल मीडियावर मोदींवर टीकास्त्र सोडले जाऊ लागले. नंतर नरेंद्र मोदी पाच देशांच्या दौऱ्यावर गेले असताना त्यांच्यावर टीका करणे सुरू झाले.


या दौऱ्यात सगळ्याच देशांमध्ये मोदींचे ज्या प्रकारे स्वागत आणि सन्मान करण्यात आला, त्यामुळे तर मोदीविरोधकांची भयंकर जळफळाट झाला. ज्यावेळी मोदी दौऱ्यावर होते, त्याच वेळेस राहुल गांधी सुद्धा कुठल्यातरी विदेश दौऱ्यावर गेले होते. ते कोणत्या देशात गेले आणि कशासाठी गेले हे कुणालाच माहीत नाही. तिथून परतल्यानंतर राहुल गांधी यांनी जेन झीला भडकवणे सुरू केले आणि एक वर्षातच मोदी सरकार कोसळणार असल्याचे वक्तव्य करणे सुरू केले. त्यानंतर काही दिवसातंच अचानक कॉक्रोचचा जन्म झाला. या किड्याच्या जन्मामागे राहुल गांधी यांचा तो विदेश दौरा तर कारणीभूत नव्हता ना अशी शंका घेण्यास वाव आहे. म्हणून आता तपास संस्थांनी खोलात जाऊन या प्रकरणाचा तपास करायला हवा आणि हा कॉक्रोच कुणाचे पिल्लू आहे आणि त्याच्यामागे कोणते कटकारस्थान शिजलेले आहे त्याचा भंडाफोड करायलाच हवा. ■

**संजीव हेडाऊ**/९३७०१६९५८२

# ज्ञानस्त्रोताचे जाणे...

## स्मरण

पाणी, सिंचन, शिक्षण, शिक्षक, पदवीधर, मूलभूत सुविधा, शेतकरी, कृषी या विषयांवर वाचन, मनन, चिंतन व संशोधन करून लोकहिताची मांडणी करणारा प्रा. बी. टी. अर्थात भाऊराव तुळशीराम देशमुख यांच्या रूपाने लाभलेला ज्ञानस्रोत काळाच्या पडद्याआड गेला आहे. बी. टी. म्हणजे चालते बोलते विद्यापीठ होते. उपरोक्त सर्व विषयांची विश्वासार्ह माहिती त्यांना मुखोद्‌गत असायची किंवा लिखित स्वरूपात तर त्यांच्याकडे असायचीच! उर्वरित महाराष्ट्रापेक्षा विदर्भातला सर्वच क्षेत्रातला विकासाचा अनुशेष किती मोठा आहे, हे त्यांनीच पहिल्यांदा आकडेवारीसह लक्षात आणून दिले. राज्यातल्या विकासाचा प्रादेशिक असमतोल दूर करण्यासाठी राज्यघटनेने राज्यपालांना दिलेले विशेष अधिकार त्यांनी वापरले पाहिजे आणि सरकारला त्यासाठी बाध्य केले पाहिजे, यासाठी ते कायम आग्रही होते. या अत्यंत महत्त्वाच्या प्रश्नावर त्यांनी विदर्भातील नितीन गडकरी, देवेंद्र फडणवीस यासारख्या अभ्यासू नेत्यांना एकत्र आणण्याचा कायम प्रयत्न केला. त्यांच्या प्रयत्नांना यशही आले. नितीनजी आणि देवेंद्रजींनी अनुशेषाचा मुद्दा त्यांच्याकडून समजून घेत सभागृहात वेळोवेळी आवाज बुलंद केला. राज्यातील मागासलेल्या भागाला वंचित ठेवून प्रगत भागात निधी खेचून नेणाऱ्यांवर त्यांनी नेहमीच प्रहार केला. त्यांची मांडणी इतकी वस्तुनिष्ठ असायची की, सत्ताधाऱ्यांना काय बोलावे हेच कळायचे नाही. बी. टीं.चे विधिमंडळातील तारांकित प्रश्न व लक्षवेधी संबंधित मंत्र्यांची एक प्रकारे परीक्षाच असायची. अनेक मंत्र्यांना त्यांनी निरुत्तर केल्याची खूप उदाहरणे आहेत.



अमरावती शहराजवळच्या नांदगाव पेठ औद्योगिक वसाहतीत तेव्हाच्या कोळशावर आधारित सोफिया आणि आताच्या रतन इंडिया औष्णिक विद्युत प्रकल्पासह विदर्भातल्या अन्य तीन अशाच प्रकल्पां विरोधातला बी. टीं.नी उभारलेला लढा जवळून पाहता आला. हे औष्णिक प्रकल्प सिंचन, शेती, पिण्याचे पाणी आणि आरोग्यासाठी कसे धोकादायक आहे, हे त्यांनी लेखी स्वरूपात शासन, प्रशासन व नागरिकांपर्यंत पोहोचविले होते. विरोधाची ही चळवळ भक्कम करण्यासाठी तेव्हा विदर्भ सिंचन अनुशेष निर्मूलन समितीच्या 'हेल्पलाईन'ची स्थापना करण्यात आली होती. या हेल्पलाईनच्या माध्यमातून बी. टी. आणि पद्मश्री प्रभाकरराव वैद्य व त्यांच्या असंख्य सहकाऱ्यांनी हा लढा खूप तीव्र केला होता. संवैधानिक मार्गाने आंदोलनाचे वेगवेगळे टप्पे आखले होते. त्यानुसार सगळी आंदोलने झाली. त्याची दखल शासनाला घ्यावी लागली. सोफिया वगळता विदर्भातले अन्य तीन औष्णिक प्रकल्प शासनाने रद्द केले. सोफिया हद्दपार होऊ शकला नाही, याची खंत त्यांना शेवटपर्यंत होती. पण, या लढ्याच्या माध्यमातून सिंचनासह अन्य क्षेत्रातला विदर्भातल्या अनुशेषाचा मुद्दा तळागळापर्यंत पोहोचला. परिणामी शासनाने अनुशेष कमी करण्याचा प्रयत्न केला. भाजपाच्या गेल्या दहा वर्षातल्या सत्ताकाळात तो वेगाने कमी होत आहे.

पेशाने शिक्षक राहिलेले बी. टी. देशमुख दूरदृष्टीचे नेते होते. अमरावती शहराला पिण्याच्या पाण्याची आणि अनेक गावांना पिण्यासह सिंचनाला पाणी मिळावे म्हणून त्यांनी वर्धा नदीवर मोर्शी जवळ अप्पर वर्धा धरण उभारण्यासाठी स्थानिकांचा विरोध झुगारून प्रामाणिक प्रयत्न केले. त्यांच्या प्रयत्नानेच हे धरण तयार झाले. अनेक गावांची तृष्णातृप्ती झाली व हजारो हेक्टर जमीन सिंचनाखाली आली. हा भाग आता समृद्ध आहे. अमरावती जवळच्या पेढी नदीवरील धरणाला सुद्धा विरोध होता. बी. टी भविष्यातली तरतूद म्हणून या धरणासाठी कायम आग्रही राहिले. अखेर ते धरण आता अंतिम टप्प्यात आले आहे. शिक्षण आणि शिक्षक हा तर त्यांचा मूळ विषय होता. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोलाच्या स्थापनेत त्यांचा मोलाचा वाटा होता. नागपूर युनिव्हर्सिटी टीचर्स असोसिएशनचे (नुटा) ते संस्थापक अध्यक्ष होते. या संघटनेच्या माध्यमातून त्यांनी सरकारला अनेक शैक्षणिक सुधारणा करण्यास बाध्य करून शिक्षकांच्या अनेक समस्या सोडविल्या. ते स्वतः संपादक असलेल्या नुटा बुलेटिनच्या माध्यमातून असंख्य विषय त्यांनी मांडले. शासनाने त्याची वेळोवेळी दखल सुद्धा घेतली.

प्रशासकीय कामकाजातल्या किंवा शासन आदेशातल्या त्रुटी शोधून त्या संबंधितांसाठी कशा अडचणीच्या ठरत आहेत, हे त्यांनी वेळोवेळी चव्हाट्यावर आणले. त्या त्रुटी दूर करण्यास त्यांनी शासनाला बाध्य केले आणि ज्या झाल्या नाहीत त्यासाठी आमदारकीचा राजीनामा देण्याची ताकदही त्यांनी दाखविली होती. त्यांचा विधिमंडळाचा ३० वर्षांचा कार्यकाळ सुवर्ण अक्षरात नोंदविला गेला आहे. त्यांची अभ्यासपूर्ण भाषणे आजही उपयुक्त आहेत. बी.टीं.नी आपले कार्य कागदावर नोंदवून यासाठी ठेवले की, ते पुढील पिढीसाठी उपयोगी पडेल. संसदपटू कसा असावा याचे मूर्तिमंत उदाहरण बी. टी. आहेत. नवीन आमदार व खासदारांनी आदर्श म्हणून बी.टीं.ची कार्यपद्धती अभ्यासली पाहिजे. आयुष्यभर शिस्त पाळून व्रतस्थ जीवन जगणाऱ्या बी. टी. देशमुख यांच्यासारखी माणसे पुन्हा उदयास येणे अवघड आहे. केलेल्या अनमोल कार्यासाठी ते कायम स्मरणात राहतील. ज्ञानस्रोत बी. टीं.ना भावपूर्ण श्रद्धांजली! ■

**गिरीश शेरेकर**/९४२०७२१२२५



# महाराष्ट्र लोकभवन येथे सोलापूर विद्यापीठाकडून सांस्कृतिक कलेचे सादरीकरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० जून-**

महाराष्ट्र लोकभवन येथे पश्चिम बंगाल राज्य स्थापना दिन शनिवारी (दि. २०) सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून साजरा करण्यात आला. यावेळी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या मराठी भाषिक विद्यार्थ्यांनी बंगाली गीत व नृत्याच्या माध्यमातून उत्कृष्ट सांस्कृतिक सादरीकरण केले.सादरीकरणाबद्दल राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी विद्यापीठाला व विद्यार्थ्यांना कौतुकाची थाप दिली.

केंद्र शासनाच्या एक भारत श्रेष्ठ भारत उपक्रमांतर्गत पश्चिम बंगालचा राज्य स्थापना दिन साजरा करण्यात आला. राज्यपाल वर्मा यांनी यावेळी पश्चिम बंगालच्या नागरिकांना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाला विद्यापीठाचे कुलगुरु प्रा. प्रकाश महानवर, राज्यपालांचे सहसचिव एस. राममूर्ती, सांस्कृतिक समन्वयक डॉ. केदारनाथ काळवणे, लोकभवनचे अधिकारी व कर्मचारी आदी उपस्थित होते.

प्रारंभी पश्चिम बंगालचे राज्यपाल आर. एन. रवी यांचा व्हिडीओ संदेश दाखविण्यात आला. महाराष्ट्र व पश्चिम बंगाल परस्परांपासून दोन हजार किमी दूर असले तरीही दोन्ही राज्यांमधील लोकांची अस्मिता समान असल्याचे यावेळी राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी सांगितले. दोन्ही राज्यांनी गौरांग महाप्रभु, संत तुकाराम, अहिल्यादेवी होळकर, स्वामी विवेकानंद, लोकमान्य टिळक यांसारख्या महान प्रभृती दिल्या. बंगालप्रमाणेच महाराष्ट्र देखील साहित्य व संस्कृती प्रेमी राज्य आहे. बंगालच्या सुपुत्रांनी देशाला वंदे मातरम व जन गण मन ही दोन्ही राष्ट्रीय गीते दिल्याचे राज्यपालांनी सांगितले.

यावेळी सोलापूर येथील विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी दुर्गा पूजेचे गीत 'हे लो गिरी सून लो खोबोर' सह पश्चिम बंगालच्या अजरामर व्यक्तिमत्वांची गाथा सांगणारे एकपात्री सादरीकरण, लोकनृत्य तसेच कथक नृत्य सादर केले. तसेच पश्चिम बंगालची सांस्कृतिक परंपरा दाखविणारा संगीत व नृत्याचा कार्यक्रम सादर केला.

# श्री स्वामीनारायण गुरुकुल येथे आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० जून-**

कुंभारी येथील श्री स्वामीनारायण गुरुकुल इंटरनॅशनल स्कूल येथे आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा करण्यात आला. कार्यक्रमास योग प्रशिक्षक म्हणून ब्रह्मा पाटील, काशिनाथ पाटील व समर्थ कुंभार यांनी विद्यार्थ्यांना योगाचे महत्त्व पटवून दिले व प्रात्यक्षिक करून दाखवले.

सूर्यनमस्कार, वृक्षासन, उष्ट्रांगाशन, भुजंगासन, चक्रासन, ताडासन, त्रिकोणासन आदी आसने करण्यात आली. याप्रसंगी मुख्याध्यापक सुधीर धुळम यांनी विद्यार्थ्यांना योगाचे महत्त्व पटवून दिले. क्रीडा शिक्षक राजेश येमूल यांनी विद्यार्थ्यांना दैनंदिन जीवनातील योगाचे महत्व पटवून दिले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अमोल बनसोडे केले. कार्यक्रमासाठी संस्थेचे प्रमुखाचार्य विश्व मंगलदास स्वामी व नयनप्रियदास स्वामी यांचे आशीर्वाद लाभले. कार्यक्रमासाठी क्रीडाशिक्षक राजेश येमुल व तुकाराम शेंडगे यांनी परिश्रम घेतले. शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले. आभारप्रदर्शन समन्वयक गणेश मादगुंडी यांनी केले.

# बाबा...! तुम्ही दिलेल्या पंखांनीच मी विश्वविजयाचे आकाश कवेत घेतले

## जागतिक वडील दिन विशेष

**आज जागतिक वडील दिन. जगभरातली मुलं आज आपल्या वडिलांना शुभेच्छा देत असतील, त्यांच्या पाठीवर मायेने हात फिरवत असतील. मी मात्र डोळे मिटून, काळजाच्या एका कोपऱ्यात दडलेला माझ्या बाबांचा तो कणखर आणि आश्वासक आवाज ऐकण्याचा प्रयत्न करतेय. आज बाबा माझ्यासोबत नाहीत, पण माझ्या आयुष्यातील प्रत्येक चौकार, षटकार आणि ऐतिहासिक विश्वचषक विजयाच्या मागे त्यांचीच पुण्याई आणि आशीर्वाद पाठीशी उभे आहेत.**

---

माझ्या आयुष्यात १६ मे २०२५ हा दिवस कधीही न विसरता येणारा, काळजाचे तुकडे करणारा ठरला. त्या दिवशी माझ्या वडिलांचे, माझ्या सर्वात मोठ्या पाठीराख्याचे अचानक निधन झाले. माझ्या डोळ्यांसमोर अंधार दाटून आला होता. ज्या माणसाने मला कधीही माझ्या अंधत्वाचे ओझे वाटू दिले नाही, ज्याने मला नेहमी एका रणरागिणीसारखे जगणे शिकवले, तो माझा हक्काचा आधारस्तंभ मला सोडून गेला होता. माझ्या आयुष्यातील तो सर्वात कठीण काळ होता.

बाबांच्या जाण्याने कोलमडून पडलेले असतानाच, समोर अंध महिला टी-२० विश्वचषक स्पर्धा उभी होती. माझ्यासमोर दोन मार्ग होतेएकतर या दुःखात वाहून जाणे किंवा बाबांनी माझ्यासाठी पाहिलेले स्वप्न पूर्ण करण्यासाठी मैदानात उतरणे. मी दुसरा मार्ग निवडला. कारण मला ठाऊक होते, मी मैदानात रडत बसलेली माझ्या बाबांना कधीच आवडली नसती. मी बॅट हातात घेतली, ती फक्त भारतासाठी नाही, तर माझ्या बाबांच्या अभिमानासाठी! ''मैदानात जेव्हा जेव्हा चेंडू माझ्या दिशेने यायचा, तेव्हा मला भास व्हायचा की बाबा मागून ओरडून सांगत आहेतगंगा, धीर सोडू नकोस, तू जिंकण्यासाठीच जन्माला आली आहेस! प्रत्येक सामन्यात मी माझे सर्वस्व पणाला लावले.

''माझ्या वतीने आणि माझ्या संपूर्ण भारतीय संघाच्या वतीने आम्ही प्रत्येक सामन्यात जीवाची



बाजी लावली. दुःख विसरून देशासाठी खेळताना एक वेगळीच ऊर्जा माझ्यात संचारत होती. आणि अखेर तो सुवर्णक्षण आला... भारताने टी-२० विश्वचषकावर आपले नाव कोरले! आम्ही विश्वविजेते झालो! ज्या क्षणी विश्वचषकाची ती चकचकीत ट्रॉफी माझ्या हातात आली, त्या क्षणी माझे डोळे पाणावले. मी ती ट्रॉफी छातीशी घट्ट धरली आणि मनोमन आकाशाकडे पाहत बाबांना म्हटले''बाबा, बघा... तुमची मुलगी आज जग जिंकून आली आहे! ''तो विजय, तो आनंदोत्सव फक्त माझा नव्हता; तो माझ्या बाबांच्या कष्टांचा, त्यांनी माझ्यावर ठेवलेल्या विश्वासाचा विजय होता. त्यांनी मला जे स्वप्न पाहायला शिकवले, त्याची ही परिपूर्ती होती.

आज वडील दिनानिमित्त मी सर्व मुला-मुलींना एवढंच सांगू इच्छिते की, आपले आई-वडील आपल्या सोबत असेपर्यंत त्यांच्या कष्टाची जाणीव ठेवा. आज माझे बाबा जरी पंचत्वात विलीन झाले असले, तरी भारतीय जर्सीवरील तिरंगा आणि हातातील विश्वचषक मला नेहमी त्यांच्या अस्तित्वाची जाणीव करून देत राहील. बाबा, तुम्ही जिथे कुठे असाल, तिथून तुमच्या या लाडक्या लेकीकडे पाहून नक्कीच तुम्हाला अभिमान वाटत असेल, याची मला खात्री आहे!

**- गंगा संभाजी कदम**
उपकर्णधार, भारतीय अंध महिला क्रिकेट संघ

# हरिभाई देवकरण प्रशालेत गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० जून-**

हरिभाई देवकरण प्रशालेत एसएससी २०२६ मध्ये उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. शाला समिती अध्यक्ष सुरेशबाबु मंकणी यांच्या अध्यक्षतेखाली व मार्गदर्शनाखाली कार्यक्रम संपन्न झाला

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे प्रशालेत प्रथम क्रमांक आलेल्या विद्यार्थिनी कुमारी स्वरा पाटील हिचे पालक श्री व सौ पाटील यांचा सत्कार मुख्याध्यापिका स्मिता कांगुणे यांच्या हस्ते करण्यात आला. प्रास्ताविक पर्यवेक्षक गणेश नेवरे यांनी केले. पर्यवेक्षक औदुंबर सर्वगोड यांनी निकालाचे सांख्यिकी वाचन केले. प्रशालेचा निकाल ९५.८९ टक्के लागला. प्रशालेत पहिले पाच क्रमांक प्राप्त विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र, पेन व पेढे देऊन शुभेच्छा दिल्या. प्रत्येक



तुकडीत प्रथम येण्याला विद्यार्थ्यांना बक्षीस देण्यात आले. तसेच विशेष प्राविण्य श्रेणी मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. या संपूर्ण बक्षीस समारंभाचे वाचन भावना यलगुलवार यांनी केले. स्वरा पाटील, प्रणव धुमाळ, अनुष्का देशमुख या विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. प्रमुख पाहुणे आनंद पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन पर्यवेक्षक मारुती शहाणे तर आभार उपमुख्याध्यापक रविंद्र पानसरे यांनी मानले.


## खरेदीखत, मुळ पावती, इंडेक्स हरविले बाबतची जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः जिल्हा सोलापूर, शहर बार्शी व आसपासचे लोकांना आमचे अशील यांच्यातर्फे त्यांनी माहिती दिलेवरून व या जाहीर नोटीतीने कळविण्यात येते की,

डि. सोलापूर सब डि. व शहर बार्शी पैकी बार्शी शहर म्यु.पल हद्दीतील मिळकत याचा जुना गट नं. ८५६ चा नविन गट नं. ८६२ पैकी प्लॉट नं. १६ पैकी दक्षिण बाजूचा प्लॉट याचे क्षेत्रफळ ४४.५० चौ.मी. आहे. त्याचा मागील खरेदीखते दस्त नं. २७२६/२०१५ ता.२६/०६/२०१५ व ३२३२/२०१६ ता.१८/०७/२०१६ तसेच खरेदी दस्त नं. ४२५२/२०२१ ता. १२/०८/२०२१ हे मिळकती संदर्भाचे दस्त आमचे अशिलाचे राहते घरापासून ते बस स्टॅण्ड अशा प्रवासादरम्यान गहाळ झालेले आहे/हरविलेला आहे.

समीर इस्माईल शेख यांना सदर जागा कर्जाकरिता तारण ठेवण्याकरिता मूळ रजि. खरेदीखते दस्त नं. २७२६/२०१५ ता.२६/०६/२०१५, ४२५२/२०२१ ता. १२/०८/२०२१ व साठेखत दस्त नं. ३२३२/२०१६ ता.१८/०७/२०१६ व साठेखत दस्त नं. तसेच खरेदी दस्त नं. या दस्ताची मूळ प्रत आवश्यक आहे. परंतु सदर खरेदीखत, हरवल्याने यदाकदाचित कोणास मिळाल्यास खालील दिलेल्या पत्त्यावर संपर्क साधून आणून द्यावी अथवा शितल विजय काळे हे, खरेदी दस्तची मूळ प्रत ऐवजी दुय्यम प्रत आधारे कर्ज प्रकरण करतील. यदाकदाचित याबाबत कोणाची काही हरकत अथवा त्या प्लॉटबाबत हक्क, हितसंबंध, लीज, दान, गहाण, टाच, बोजा अशाप्रकारे हक्क, हितसंबंध असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे आत आमचे खाली दिलेल्या पत्त्यावरती प्रत्यक्ष भेटून कागदोपत्री पुराव्यानिशी आपला हक्क शाबीत करावा, अन्यथा मुदतीनंतर आमचे अशील कोणाची कसलीही हरकत नाही असे गृहीत धरून सदर मिळकत बँकेकडे तारण ठेवतील, नंतर कोणाची कसलीही हरकत आल्यास आमचे अशिलाच्या व कर्ज देणाऱ्या वित्तीय संस्थेचे हक्कावर व अधिकारावर ती बंधनकारक राहणार नाही. कोणाचीही फसवणूक होऊ नये याकरिता ही जाहीर नोटीस दिली असे.

ता. १९/०६/२०२६

सही/-
**ॲड. धनंजय महादेव धस**
**रा. भक्त प्रल्हाद, नाईकवाडी प्लॉट, उपळाई रोड**
**मो. नं. ९८९०४७२०९६**
**अशिलातर्फे ॲडव्होकेट**



## मध्य रेल्वे
**सोलापुर मंडळ**
**विद्युतीकरण कार्य**

भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि त्यांच्यासाठी वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता , मध्य रेल्वे, सोलापूर हे खालील कामांसाठी रेल्वे ई-प्रोक्युअरमेंट वेबसाईट www.ireps.gov.in वर नामांकित अनुभवी आणि परवानाधारक विद्युत कंत्राटदारांकडून ऑनलाईन ई-निविदा मागवित आहेतः निविदा क्रमांक : SUR/TD/T/2026/13 R कामाचे नाव : जेथे अनुकूल क्रॉसओवर उपलब्ध आहे अशा सामान्य लूप लाईनमध्ये लूप लाईनच्या परिवर्तना संदर्भातील इलेक्ट्रिकल च्या कामाचा भाग. ठिकाणेः १) सावळगी २) कुलाळी ३) दुधनी ४) बोरोटी ५) मलिकपेठ ६) आंगर ७) वाकाव ८) भाळवणी ९) जिंती रोड १०) भिगवण. (पुन्हा निविदा). अंदाजीत किंमत : १,९१,७३,५५१.९० बोली सुरक्षा/बयाणा रक्कम : ३,८३,५००/-, काम पूर्ण करण्याचा कालावधी : १२ महिने, ऑफरची वैधता : ६० दिवस वेबसाईटवर निविदा बंद होण्याची तारीख आणि वेळः १७.०७.२०२६ रोजी १५.०० वाजता.

**व. वि. वि. अ. (क. वि.)**

धोकादायक आणि स्फोटक वस्तू घेऊन प्रवास करणे हा दंडनीय गुन्हा आहे 34



## जाहीर नोटीस
## मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात

जन्म-मृत्यु प्रकरण अर्ज क्र. १०४/२०२६

१. दिलावरबी दस्तगीर पाटील -- अर्जदार
रा. गणेश हौसींग सोसायटी हनुमान नगर,
ताम्हणे वस्तीचिखली पुणे
(असल्यास, तर्फे वकील आय के शेख)

**विरुद्ध**

२. जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी तथा ग्रामपंचायत --- गैरअर्जदार
अधिकारी ग्रा. प. पिंपळगाव पान

सदर या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यांत येते की, स्वतः अर्जदार, रा. गणेश हौसींग सोसायटी हनुमान नगर ताम्हणे वस्तीचिखली पुणे यांचा मौजे पिंपळगाव पान ता. बार्शी राहत्या घरी या ठिकाणी दिनांक ०९ जुलै १९७१ रोजी जन्म झालेला असून त्यांची जन्म नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी स्वतः अर्जदार यांचा दिनांक ०९ जुलै १९७१ रोजी मौजे पिंपळगाव पान ता. बार्शी राहत्या घरी या ठिकाणी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिद्धीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत समक्ष हजर राहुन द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज ता. ११ जुन २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**(एफ. आर. शेख)**
**तहसिलदार बार्शी**



**Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal, Barshi**
**B.P.Sulakhe Commerce College, Barshi**
**Shivaji Nagar, Barshi Dist Solapur (Maharashtra) 413111**
**E-mail : prinbpscc@rediffmail.com / ssspmbarshi@gmail.com**
**Phone No. (02184) 222531/226262**
**UN-AIDED-UG & PG**
**(Affiliated to Punyashlok Ahilyadevi Holker Solapur University, Solapur)**
**WALK - INTERVIEW**
**for the following CLOCK HOUR BASIS (CHB) Posts of Assistant Professor for the Academic Year 2026-27**

| Sr.No. | Course | Subject | No. of Post | No of Post Reservation |
|---|---|---|---|---|
| Commerce Faculty | | | | Open-03<br>SEBC-01<br>EWS-01<br>OBC-02<br>SC-01<br>ST-01<br>NT-01 |
| 1 | M.Com | Commerce | 02 | |
| 2 | M.Com | Economics | 01 | |
| Computer Sicence Faculty | | | | |
| 3 | B.C.A. | B.C.A. All Subject<br>Computer Science<br>Statistics<br>English<br>Physical Education | 03 (Full-Time)<br>01<br>01<br>01<br>01 | |

1. The above posts are open to all however candidates from any category can apply for the posts.
2. All the above posts are Purely on Temporary Clock Hour Basis for Academic Year 2026-2027 & subject to workload approval of Jt. Director of Education, H.E., Solapur Region, Solapur for Senior College Section.
3. Educational Qualification and other requirements are as prescribed by the UGC Notification dtd. 18th July 2018, Govt. of Maharashtra Resulation no. Misc-2018/C.R.56/18UNI-Idts. 8th March 2019 and University Circular No.PAHSUS/Estt/7th pay/2019/2285/dtd.25th March 2019.
4. Remuneration of the above posts will be as per Govt. Resulation No. संकिर्ण-२०१८/(९८५/१८)मशि-३ dated १४th November २०१८ and University Circular No. सोविसो/शि.मा./परिपत्रक/२०१८-१९/१०९४९/dtd.२४th December २०१८. And candidate should reach for the interview with applications and and essential document on the date of interview. T.A.D.A. will not be paid for the interview.

Walk In interview : Date :25.06.2026 **Time:11.30 a.m.**
**Place : B.P.Sulakhe Commerce College,Barshi.**

**Dr.KARANDE S.B.** I/c, Principal, B.P.Sulakhe Commerce College,
**Mr.P.T.Patil.** General Secretary.
**Dr.B.Y.Yadav.** Chairman. Shri.Shivaji Shiksahn Prasarak,Mandal, Barshi. Dist:Solapur.



## नाम में बदलाव

मेरा पुराना नाम शांताबाई था। मेरा नया नाम शांताबाई दगडू जाधव है। दोनों नाम एक ही व्यक्ति के हैं। पताः वसंत नगर, नलदुर्ग,तहसील तुळजापूर जिला,धाराशिव महाराष्ट्र - ४१३००२

अफि नं.
२६५२५४२४११२६८३००४८३६९१

## नाम में बदलाव

मेरा पुराना नाम वेदांत था। मेरा नया नाम वेदांत मधुकर जाधव है। दोनों नाम एक ही व्यक्ति के हैं। पताः मधुकर दगडू जाधव, सी २०२ ड्रीम्स अवनि, सी. नं. ७० बी/२/१, मंजरी बुद्रुक, मंजरी बुद्रुक, पोस्ट ऑफिसः मंजरी फार्म, जिलाः पुणे, महाराष्ट्र - ४१२३०७

**अफि नं.**
**२६५२५४२४११२६८३००४८३६८२**



## मध्य रेल्वे
**सोलापुर मंडळ**
**अभियांत्रिकी कार्य**

भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने विभागीय रेल्वे व्यवस्थापक (कामे), मध्य रेल्वे, सोलापूर हे खालील कामांसाठी नामांकित संस्था/कंत्राटदारांकडून ई-निविदा मागवित आहेतः १) निविदा सूचना क्र. : 19-2026-Sr.DENS कामाचे नाव : १ रेल्वे हॉस्पिटल, सोलापूर येथे भूमिगत टाकी, पाणी पुरवठा पाईपलाईन, पंप हाऊस आणि सांडपाणी वहन प्रणालीसह एसटीपी (50 KLD) ची तरतूद करणे. २) अंतर्गत येथे भूमिगत टाकी, पाण्याची पाईपलाईन आणि पंप हाऊससह सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प (50 KLD). कामाची अंदाजीत किंमत : २,५४,०२,४४६.८६/- बयाणा रक्कम : ५,०८,१००/- काम पूर्ण करण्याचा कालावधी : १२ महिने, देखभाल कालावधी : ३६ महिने, २) निविदा सूचना क्र.: 20-2026-Sr.DENS कामाचे नाव : यांच्या कार्यक्षेत्रांतर्गत रेल्वे ट्रॅकच्या अलाइनमेंट (दिशारेषा) दुरुस्तीसाठी प्रिझम गेडो ट्रॉली सर्वेक्षण करणे. कामाची अंदाजीत किंमत : १,६१,०३,४२५/-, बयाणा रक्कम : ३,२२,१००/-, काम पूर्ण करण्याचा कालावधी : २४ महिने, देखभाल कालावधी : लागू नाही www.ireps.gov.in या वेबसाईटवर निविदा अपलोड करण्याची अंतिम तारीख आणि वेळः १०.०७.२०२६ रोजी १५.०० वाजेपर्यंत. www.ireps.gov.in वर निविदा उघडण्याची तारीख आणि वेळः १०.०७.२०२६ रोजी १५.३० वाजता. संभाव्य निविदाकारांना सल्ला देण्यात येतो की, या निविदेसंदर्भात जारी केलेले कोणतेही बदल/शुद्धीपत्रक पाहण्यासाठी त्यांनी निविदा बंद होण्याच्या तारखेपूर्वी वेळोवेळी वेबसाईटला भेट द्यावी. वेबसाईटः www.ireps.gov.in

**मं.रे.प्र. (कार्य)**

धोकादायक आणि स्फोटक वस्तू घेऊन प्रवास करणे हा दंडनीय गुन्हा आहे 33



## IDFC FIRST Bank Limited
**(erstwhile Capital First Limited, amalgamated with IDFC Bank Limited and presently known as IDFC First Bank Limited) | CIN : L65110TN2014PLC097792**
**Registered Office: -** KRM Towers, 8th Floor, Harrington Road, Chetpet, Chennai- 600031.
Tel : +91 44 4564 4000 | Fax: +91 44 4564 4022

IDFC FIRST Bank

### वित्तीय मालमत्तेचे सुरक्षा आणि पुनर्बांधणी आणि सुरक्षा व्याज कायदा, २००२ च्या कलम १३ (२) अंतर्गत सूचना

खालील कर्जदार आणि सह-कर्जदारांनी **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झालेली आणि सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाणारी) कडून खाली नमूद केलेली सुरक्षित कर्जे घेतली. खाली नमूद केलेल्या कर्जदार आणि सह-कर्जदारांची कर्जे त्यांच्या संबंधित मालमत्तेच्या गहाणखताने सुरक्षित करण्यात आली आहेत. त्यांनी संबंधित कर्ज करारांच्या अटी आणि शर्तींचे पालन करण्यात अयशस्वी झाल्यामुळे आणि अनियमित झाल्यामुळे, त्यांचे कर्ज आरबीआयच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार एनपीए म्हणून वर्गीकृत करण्यात आले. **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झालेली आणि सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाणारी) यांना देय असलेल्या रकमा खालील तक्त्यात अधिक स्पष्टपणे वर्णन केलेल्या संबंधित सूचनांनुसार नमूद केल्या आहेत आणि त्या रकमेवरील पुढील व्याज देखील लागू असेल आणि त्यांच्या संबंधित तारखांपासून कराराच्या दरानुसार आकारले जाईल.

| अं. क्र. | कर्ज खाते क्र. | कर्जाचा प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) सूचना दिनांक | कलम १३ (२) सूचनेनुसार थकबाकीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 114751600 | मालमत्तेवर कर्ज | १. शुभम प्रवीण कुलकर्णी<br>२. प्रवीण कृष्णाजी कुलकर्णी | 06.05.2026 | INR 10,31,802.96/- |

**मालमत्तेचा पत्ता:** वेलापूर सी.टी.सी नंबर ७५१ मधील निवासी मालमत्तेचा संपूर्ण भाग आणि तुकडा, ज्याचे एकूण क्षेत्रफळ १२५.९० चौ. मीटर आहे, त्यापैकी १०४.९१ चौ. मीटर (११२९.२४ चौ. फूट) क्षेत्रफळ. वेलापूर ग्रामपंचायत मिळकत नं. २०० पैकी पूर्व-उत्तर दिशेकडील भाग ज्याचे क्षेत्रफळ २९ चौ. मीटर आहे. ठिकाणः गाव- वेलापूर, तालुका- माळशिरस, जिल्हा- सोलापूर, महाराष्ट्र- ४१३११३, क्षेत्रफळ ३१२.०४ चौ. फूट (२९ चौ. मीटर). चतुःसीमाः पूर्वः सी.टी.एस नं. ७५०, पश्चिमः सी.टी.एस नं. ७५१ पैकी, उत्तरः ग्रामपंचायत रस्ता, दक्षिणः सी.टी.एस नं. ७५१ पैकी.

| अं. क्र. | कर्ज खाते क्र. | कर्जाचा प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) सूचना दिनांक | कलम १३ (२) सूचनेनुसार थकबाकीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 2 | 153154340 | मालमत्तेवर कर्ज | १. दिपक प्रभाकर केसकर<br>२. प्रभाकर महादेव केसकर<br>३. कोमल दिपक केसकर | 06.05.2026 | INR 7,00,459.49/- |

**मालमत्तेचा पत्ता :** मालमत्तेचा पत्ता : पिलीव, ता. माळशिरस, जि. सोलापूर येथील खुल्या जमिनीचा संपूर्ण भाग आणि तुकडा, सी.टी.एस नं. ७५१ मध्ये, ज्याचे एकूण क्षेत्रफळ ९७.७० चौ. मीटर आहे, ज्यापैकी ६०.९५ चौ. मीटर हिस्सा. सोबतच त्यावर बांधलेले निवासी घर ज्याचे क्षेत्रफळ ६५६.६ चौ. फूट आहे, जे वरील सिटी सर्व्हे नंबरवर बांधलेले आहे आणि ग्रामपंचायत पिलीवच्या अभिलेखात मालमत्ता क्रमांक ६९४/१ वर नोंदणीकृत आहे. चतुःसीमाः पूर्वः सामायिक बोळ आणि सी.टी.एस नं. ७६२, पश्चिमः ग्रामपंचायत रस्ता, उत्तरः सी.टी.एस नं. ७५१ मधील उर्वरित जमीन, दक्षिणः सी.टी.एस नं. ७६३.

या प्रकाशनाच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत तुम्हाला वरील तक्त्यात दाखवलेल्या तपशीलांनुसार **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झालेली आणि सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाणारी) कडे रक्कम त्यांच्या संबंधित तारखांपासून आणि इतर खर्च, शुल्क इत्यादींपासून करारबद्ध व्याजदरासह भरण्याचे आवाहन करण्यात येत आहे. असे न केल्यास, खाली स्वाक्षरी करणाऱ्या व्यक्तीला आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी) कडे देय रक्कम वसूल करण्यासाठी वर नमूद केलेल्या गहाण ठेवलेल्या मालमत्तेविरुद्ध कलम १३ (४) आणि कलम १४ अंतर्गत, **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** (पूर्वीची **कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झालेली आणि सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाणारी) देय रक्कम वसूल करण्यासाठी कार्यवाही सुरू करण्यास अधीन असेल. शिवाय, तुम्हाला सदर कायद्याच्या कलम १३ (१३) अंतर्गत सदर सुरक्षित मालमत्ता विक्री/भाडेपट्टा किंवा इतर प्रकारे हस्तांतरित करण्यास मनाई आहे.

**सही/- अधिकृत अधिकारी**
**आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीचे कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये एकत्र केलेले आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँकलिमिटेडम्हणून ओळखले जाते)**

**दिनांक : 21/06/2026**
**स्थळ : सोलापूर, महाराष्ट्र**

# धडाका फुटबॉल विश्वचषकाचा



## महत्त्वाचे

### मोरोक्कोच्या सायबारीचा सर्वांत जलद गोल

**बॉस्टन, २० जून**

इस्माईल सायबारीने फिफा २०२६ विश्वचषक फुटबॉल स्पर्धेतील सर्वात जलद गोल नोंदविला.



सायबरीने नोंदविलेल्या या महत्त्वपूर्ण गोलच्या बळावर मोरोक्कोने स्कॉटलंडवर १-० ने विजय नोंदविला आणि बाद फेरीत स्थान मिळवण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल टाकले. या सामन्यात इस्माईल सायबारीने अवघ्या ७१ सेकंदात गोल करत २०२६ विश्वचषकातील आतापर्यंतचा सर्वात जलद गोल नोंदविला. गत आठवड्यात ब्राझीलविरुद्धच्या १-१ अशा बरोबरीत सुटलेल्या सामन्यातही सायबारीने गोल केला होता. शुक्रवारी बोस्टन स्टेडियमवर झालेल्या या चुरशीच्या आणि शारीरिक ताकद पणाला लावणाऱ्या सामन्यात, खेळाच्या सुरुवातीच्या मिनिटांतच त्याने केलेल्या अचूक गोलने सामन्याचा निकाल निश्चित केला. स्पेनमध्ये जन्मलेला आणि बेल्जियममध्ये लहानाचा मोठा झालेला हा २५ वर्षीय खेळाडू सायबारी याने गोलरक्षक अंगस गनला हुलकावणी देत उत्कृष्ट फटका मारला व गोल केला. दोन सामन्यांतून चार गुण मिळवल्यानंतर, मोरोक्को आता 'अंतिम ३२' संघांच्या फेरीत प्रवेश करण्यासाठी सज्ज झाला आहे.

# ऑस्ट्रेलियाला २-0 ने नमवून अमेरिका बाद फेरीत

**सिएटल, २० जून**

सिएटल स्टेडियमवर 'ग्रुप डी'मधील साखळी सामन्यात ऑस्ट्रेलियावर २-० असा विजय मिळवून सह-यजमान अमेरिका संघाने फिफा विश्वचषक फुटबॉल स्पर्धेत 'ग्रुप डी'मध्ये अव्वल स्थान प्राप्त केले आणि अंतिम ३२ संघांच्या फेरीत स्थान सुनिश्चित केले.

दोन्ही संघांचा हा विश्वचषकातील दुसरा साखळी सामना होता व त्यात अमेरिकेने आपली विजयी घोडदौड कायम राखत आगेकूच केली. सिएटल स्टेडियमवर झालेला हा सामना या दोन्ही देशांच्या फुटबॉल इतिहासातील केवळ पाचवाच सामना ठरणार आहे; यापूर्वीचे चारही सामने मैत्रीपूर्ण स्वरूपाचे होते. परस्पर लढतींच्या आकडेवारीचा विचार करता अमेरिकेचे पारडे जड राहिले आहे; त्यांनी मागील दोन सामन्यांत अनुक्रमे २-१ आणि ३-१ अशा फरकाने विजय मिळवला आहे. ऑस्ट्रेलियाचा एकमेव विजय १९९२ मधील आहे, जेव्हा त्यांनी एका गोलच्या फरकाने सामना जिंकला होता.



विजयाचा आनंद साजरा करताना अमेरिकेचे फुटबॉलपटू

दोन्ही संघांनी आपापल्या सलामीच्या सामन्यात विजय मिळवला असून, त्यांच्या आक्रमक फळीची ताकद दिसून आली आहे. अमेरिकेचा स्ट्रायकर फोलारिन बालोगुन याने पॅराग्वेविरुद्धच्या ४-१ अशा विजयात दोन गोल केले, तर ऑस्ट्रेलियाचा युवा फॉरवर्ड नेस्टोरी इरानकुंडा याने तुर्कीविरुद्धच्या २-० अशा विजयात संघासाठी पहिला गोल नोंदवला. ◂ (वृत्तसंस्था)

## पॅराग्वेच्या गालार्झाचा सर्वांत जलद गोल

### तुर्कीचे आव्हान संपुष्टात

**सॅन फ्रान्सिस्को, २० जून**

सामन्याच्या पूर्वार्धात दहा खेळाडूनिशी खेळणाऱ्या पॅराग्वेने धडाकेबाज बचाव करत तुर्कीला १-० असे पराभूत केले आणि २०२६ च्या विश्वचषकातून बाहेरचा रस्ता दाखवला. या सामन्यात मॅटियास गालार्झा याने केलेला विश्वचषक स्पर्धेतील सर्वात जलद गोल निर्णायक ठरला. गट फेरीतील दोन सामन्यांत दोन पराभव झाल्यामुळे तुर्की संघाचे विश्वचषकातील आव्हान संपुष्टात आले. सामन्याच्या ६४ व्या सेकंदाला मॅटियास गालार्झा याने २५ मीटर (२७ यार्ड) अंतरावरून जमिनीलगत वेगाने मारलेल्या फटक्याने गोल करत संघाला आघाडी मिळवून दिली. याआधी काही तासांपूर्वीच स्कॉटलंडविरुद्धच्या १-० अशा विजयात मोरोक्कोच्या इस्माईल सायबारीने ७१ व्या सेकंदाला गोल केला होता; गालार्झाचा हा गोल त्यापेक्षाही जलद ठरला.



सॅन फ्रान्सिस्को बे एरियामध्ये वाजणाऱ्या ढोल-ताशांच्या गजरात मिळालेल्या प्रोत्साहनामुळे पॅराग्वेच्या खेळाडूंनी तुर्कीच्या आक्रमणाचा खंबीरपणे सामना केला. मिगुएल अल्मिरॉन याला तोंड झाकून मर्ट मुल्डुर यांच्याबद्दल केलेल्या टिप्पणीमुळे लाल कार्ड देऊन मैदानाबाहेर पाठवण्यात आले होते, तरीही पॅराग्वेने उर्वरित सामना १० खेळाडूंसह खेळून विजय मिळविला. ◂ (वृत्तसंस्था)

## आजचे सामने

**स्पेन विरुद्ध सौदी अरब**
**वेळ :** रविवारी रात्री ९:३० वाजतापासून
**स्थळ :** मर्सिडीज-बेन्झ स्टेडियम, अटलांटा

000

**बेल्जियम विरुद्ध इराण**
**वेळ :** रविवारी रात्री १२:३० वाजतापासून
**स्थळ :** सो-फाय स्टेडियम, लॉस एंजेलिस

000

**उरुग्वे विरुद्ध केप वर्दे**
**वेळ :** सोमवारी पहाटे ३:३० वाजतापासून
स्थळ : हार्ड रॉक स्टेडियम, मियामी

000

**न्यूझीलंड विरुद्ध इजिप्त**
**वेळ :** सोमवारी सकाळी ६:३० वाजतापासून
**स्थळ :** बीसी प्लेस, व्हँकुव्हर
**थेट प्रसारण :** युनाईट८ (झी५)

# कुन्हा, व्हिनिसियसच्या गोलमुळे ब्राझील बाद फेरीत

**| ब्राझीलचा ३-० ने विजय; हैती स्पर्धेतून बाहेरकुन्हाचे दोन गोल | विनिसियसचा एक गोल**

**फिलाडेल्फिया, २० जून**

फिफा फुटबॉल विश्वचषक स्पर्धेत ब्राझीलने हैतीला ३-० ने हरवले. मॅथियस कुन्हाने दोन गोल केले आणि व्हिनिसियस ज्युनियरने पूर्वार्धात आणखी एक गोल करून पाच वेळच्या विजेत्या ब्राझील संघाला चार गुणांसह गट 'क' मध्ये अव्वल स्थानी पोहोचवले आणि शुक्रवारी आपल्या प्रतिस्पर्धी संघाला स्पर्धेतून बाहेर केले.

स्कॉटलंडवर १-० ने विजय मिळवल्यानंतर मोरोक्कोने ब्राझीलच्या बरोबरीने गुण मिळविले आहेत. स्कॉटलंडचे तीन गुण आहेत, तर हैती एकही गुण न मिळवता तळाशी आहे आणि स्पर्धेच्या बाद फेरीच्या शर्यतीतून बाहेर पडणारा पहिला संघ ठरला आहे.



ब्राझीलने फिफा २०२६ विश्वचषक स्पर्धेत सी गटात अव्वल स्थान मिळवून अंतिम ३२ च्या फेरीत प्रवेश केला.

कार्लो अँसेलोटी यांच्या मार्गदर्शनाखालील या ब्राझील संघाने संपूर्ण सामन्यात हैती संघावर वर्चस्व गाजविले. कुन्हाने २३ व्या मिनिटाला पहिला गोल केल्यानंतर ३६ व्या मिनिटाला कुन्हाने ब्राझीलची आघाडी दुप्पट केली. मध्यंतरापूर्वी ४५+३ व्या मिनिटाला विनिसियस ज्युनियरने तिसरा गोल करून ब्राझीलचा विजय सुनिश्चित केला व हैती संघाला स्पर्धेच्या बाहेर केले.

रेफ्रींनी अंतिम शिट्टी वाजवून गोलरहित ठरलेल्या उत्तरार्धाची सांगता केली; मात्र पहिल्या ४५ मिनिटांत केलेल्या कामगिरीच्या जोरावर ब्राझीलने तीन गुण मिळवले. तरीही, उर्वरित स्पर्धेपूर्वी ब्राझील संघाला काही गोष्टींवर काम करणे किंवा प्रश्नांची उत्तरे शोधणे आवश्यक आहे. उत्तम खेळ करूनही, फिफा विश्वचषक २०२६ मधून बाहेर पडणारा हैती हा पहिला संघ ठरला आहे. ◂ (वृत्तसंस्था)

## व्हिनिसियस दिग्गजांच्या यादीत

**फिलाडेल्फिया, २० जून**

ब्राझीलचा आक्रमक खेळाडू व्हिनिसियस ज्युनियर हा फिफा विश्वचषकाच्या दोन वेगवेगळ्या आवृत्त्यांमध्ये गोल आणि गोलसाठी मदत करणारा आपल्या देशातील तिसरा खेळाडू ठरला आहे. यासह तो जैरझिनो आणि रिव्हाल्डो यांसारख्या दिग्गजांच्या प्रतिष्ठित यादीत सहभागी झाला आहे.

सध्या सुरू असलेल्या विश्वचषक स्पर्धेत व्हिनिसियसने आतापर्यंत दोन गोल केले आहेत आणि एक सहाय्य केले आहे. मोरोक्कोविरुद्ध १-१ अशा बरोबरीत सुटलेल्या सामन्यात ब्राझीलसाठी एकमेव गोल केल्यानंतर, या हैतीविरुद्धच्या सामन्यातही त्याने पूर्वार्धात एक गोल केला आणि ३६ व्या मिनिटाला सहकारी मॅथियस कुन्हाने केलेल्या गोलसाठी साहाय्य केले.



यापूर्वी, कतारमध्ये झालेल्या फिफा विश्वचषक २०२२ मध्ये दक्षिण कोरियाविरुद्ध त्याने एक गोल केला होता. फिफा विश्वचषकाच्या दोन वेगवेगळ्या आवृत्त्यांमध्ये गोल आणि गोलसाठी साहाय्य करणारा तो आता जैरझिनो (२- १९७० व १९७४) आणि रिव्हाल्डो (२- १९९८ व २००२) यांच्या पंक्तीत सहभागी होऊन तिसरा ब्राझिलियन खेळाडू ठरला आहे. ◂ (वृत्तसंस्था)

# भारताचा अफगाणिस्तानवर ९ गड्यांनी विजय

**| वन-डे मालिका ३-० ने जिंकली | सामनावीर प्रसिध कृष्णाचे ५ बळी | सलामवीर यशस्वी जयस्वालचे नाबाद शतक**

**चेन्नई, २० जून,**

येथे खेळल्या गेलेल्या तिसऱ्या व अंतिम एकदिवसीय आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामन्यात प्रसिध कृष्णाची भेदक गोलंदाजी आणि सलामीवीर यशस्वी जयस्वालने झळकावलेल्या शतकाच्या बळावर भारताने अफगाणिस्तावर १२८ चेंडू शिल्लक ठेवित ९ गड्यांनी दणदणीत विजय नोंदविला आणि तीन सामन्यांची वन-डे मालिका निर्विवादपणे ३-० ने जिंकली. २३ धावांत ५ बळी टिपणारा प्रसिध कृष्णा सामनावीर पुरस्काराचा मानकरी ठरला.

प्रसिध कृष्णाने भारतीय संघाकडून खेळताना पहिल्यांदाच एका डावात पाच बळी घेण्याची कामगिरी केली आणि अफगाणिस्तानला २१८ धावांवर रोखले. सलामीवीर यशस्वी जयस्वालचे शतक आणि रोहित शर्माच्या अर्धशतकाच्या बळावर भारताने अवघ्या २८.४ षटकांत १ गडी गमावित २२४ धावा काढून आपला विजय साकार केला व वन-डे मालिका खिशात घातली.





प्रसिध कृष्णाने पॉवरप्लेमधील आपल्या पाच षटकांत केवळ ६ धावा देऊन ४ बळी घेतल्यामुळे अफगाणिस्तानची धावसंख्या यापेक्षाही खूपच कमी राहिली असती, परंतु शतकवीर हशमतुल्ला शाहिदी व अर्धशतकवीर अजमतुल्ला ओमरझाईने १०५ धावांची भागीदारी करून अफगाणिस्तानचा डाव सावरला. मात्र, भारताला आपल्या डावाची सुरुवात ५ धावांनी (कोणताही बळी न गमावता) होईल; कारण शाहिदीने खेळपट्टीच्या 'डेंजर एरिया'मध्ये (सुरक्षित नसलेल्या भागात) तीनदा धाव घेतल्यामुळे संघाला ५ धावांचा दंड बसला.

अफगाणिस्तानचे किमान सात बळी ठराविक अंतराने एकापाठोपाठ एक पडले आणि दोन खेळाडू धावबाद झाले; हे दोन्ही धावबाद कर्णधार शुभमन गिलने केले.

भारताच्या अष्टपैलू खेळाडूंनी भरलेल्या संघात नितीश कुमार रेड्डी, वॉशिंग्टन सुंदर आणि हर्ष दुबेने मिळून २१ षटके गोलंदाजी केली. त्यांनी एकत्रितपणे १०३ धावा दिल्या आणि एक बळी मिळविला.

विजयासाठी धावांचा पाठलाग करताना यशस्वी जयस्वाल व रोहित शर्माने १३७ चेंडूंत १७० धावांची सलामी भागीदारी केली व भारताच्या विजयाचा पाया रचला. मोहम्मद नबीच्या गोलंदाजीला बळी पडण्यापूर्वी रोहितने ६९ चेंडूंत ९ चौकार व ३ षट्कारांसह ७९ धावांची दिमाखदार खेळी केली. त्यानंतर जयस्वालने श्रेयस अय्यरच्या साथीने नाबाद खेळी करत भारताच्या विजयावर शिक्कामोर्तब केला. यशस्वी जयस्वालने ८६ चेंडूंचा सामना करत नाबाद ११० धावांची शतकी खेळी केली, यात त्याने १४ चौकार व ३ षटकार खेचलेत. श्रेयस अय्यरने १९ चेंडूंत २ षट्कारांसह नाबाद २० धावांची खेळी केली.

◂ (वृत्तसंस्था)





# दक्षिण आफ्रिकेविरुद्ध वर्चस्व गाजवण्याचे भारतीय महिला संघाचे लक्ष्य

**मॅन्चेस्टर, २० जून**

आयसीसी महिला टी-२० विश्वचषकात रविवारी येथील ओल्ड ट्रॅफर्ड येथे होणाऱ्या 'गट १' मधील सामन्यात धोकादायक दक्षिण आफ्रिकन संघाचा सामना करताना, भारतीय संघ आपल्या उत्कृष्ट सुरुवातीचा फायदा घेत आगेकूच करण्याचा प्रयत्न करेल.

या सामन्यात भारताची दमदार फलंदाजी आणि दक्षिण आफ्रिकेची वैविध्यपूर्ण गोलंदाजी यांच्यात मुख्य लढत पाहायला मिळेल. दक्षिण आफ्रिकेविरुद्ध आपली विजयी घोडदौड कायम राखण्याचे भारतीय महिला संघाचे लक्ष्य आहे.



लॉरा वॉल्व्हार्ड



हरमनप्रीत कौर

भारताच्या फलंदाजीसाठी स्मृती मंधाना, हरमनप्रीत कौर आणि ऋचा घोष या खेळाडू अत्यंत महत्त्वाच्या आहेत.

स्पर्धेतील संमिश्र सुरुवातीनंतर, लॉरा वोल्वार्डच्या नेतृत्वाखालील दक्षिण आफ्रिकन संघ सातत्यपूर्ण कामगिरी करण्याच्या प्रयत्नात आहे. मॅन्चेस्टरमधील खेळपट्टीच्या परिस्थितीत फिरकी गोलंदाज महत्त्वाची भूमिका बजावण्याची शक्यता आहे, तसेच दोन्ही संघ क्षेत्ररक्षणातील सुधारणेवर भर देत आहेत. हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखालील संघाने पाकिस्तानवर ६४ धावांनी दणदणीत विजय मिळवून आपल्या मोहिमेची सुरुवात केली. या सामन्यात सलामीवीर स्मृती मंधाना व यष्टिरक्षक-फलंदाज ऋचा घोषने फलंदाजीची धुरा सांभाळली, तर दीप्ती शर्माने पाच बळी घेत सामना जिंकून देणारी गोलंदाजी केली.

◂ (वृत्तसंस्था)

## आजचे सामने

**श्रीलंका वि. वेस्ट इंडीज**
**स्थळ :** ब्रिस्टल
**वेळ :** दुपारी ३.०० वाजतापासून

**भारत वि. दक्षिण आफ्रिका**
**स्थळ :** मॅन्चेस्टर
**वेळ :** सायंकाळी ७.०० वाजतापासून
**थेट प्रसारण स्टार स्पोर्टसवर**

# दुखापतीमुळे हार्दिक इंग्लंड विरुद्धच्या मालिकेतून बाहेर


### भारतीय संघाला मोठा धक्का

**नवी दिल्ली, २० जून**

दुखापतीमुळे स्टार अष्टपैलू खेळाडू हार्दिक पांड्या इंग्लंडविरुद्धच्या महत्त्वपूर्ण मालिकेतून बाहेर झाला, त्यामुळे भारतीय क्रिकेट संघाला मोठा धक्का बसला आहे; त्याचबरोबर विराट कोहलीही अजूनही संघाबाहेर असल्याने संघाच्या रचनेवर परिणाम झाला आहे.

या मालिकेची सुरुवात १ जुलै रोजी पाच टी-२० सामन्यांपैकी पहिल्या सामन्याने होणार आहे व त्यानंतर तीन सामन्यांची एकदिवसीय मालिका खेळली जाईल व ही मालिका जुलै महिन्याच्या अखेरीस संपेल.

दरम्यान, स्टार फलंदाज विराट कोहली पायाच्या दुखापतीमुळे अजूनही संघाबाहेर आहे. ही दुखापत त्याला इंडियन प्रीमियर लीग २०२६ च्या अंतिम सामन्यादरम्यान झाली होती, यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने (आरसीबी) आपले विजेतेपद यशस्वीपणे राखले होते.



हार्दिक पांड्या

इंग्लंडविरुद्धच्या मालिकेपूर्वी २६ जून रोजी कोहलीची फिटनेस चाचणी होण्याची शक्यता आहे.

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने भारताचा टी-२० संघ जाहीर केला आहे आणि लवकरच एकदिवसीय संघाची घोषणा होण्याची अपेक्षा आहे.

**आयपीएलमधील कामगिरी व खेळाडूंच्या तंदुरुस्तीबाबत चिंता**

पांड्याला पायाच्या स्नायूंची दुखापत झाली आहे. याआधी पाठीच्या स्नायूंच्या कडकपणाच्या समस्येमुळे त्याला मुंबई इंडियन्सच्या १४ पैकी चार सामन्यांना मुकावे लागले होते.

आयपीएल दरम्यान, हार्दिकची फलंदाजी, गोलंदाजी आणि कर्णधारपद या कशातही आत्मविश्वास दिसून आला नाही. मुंबई इंडियन्स गुणतालिकेत तळाच्या भागात राहिली आणि पांड्याला १० डावांमध्ये केवळ २०६ धावा करता आल्या (सरासरी २२.८८ आणि स्ट्राईक रेट १३८.२५); तसेच त्याला केवळ चार बळी घेता आले.

◂ (वृत्तसंस्था)

## तिरंगी मालिकेचा अंतिम सामना आज

**डाम्बुला, २० जून**

येथील रंगिरी डाम्बुला आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर रविवारी तिरंगी क्रिकेट मालिकेत भारत 'अ' आणि श्रीलंका 'अ' यांच्यादरम्यान अंतिम सामना खेळला जाणार आहे. या मालिकेतील तिसरा संघ अफगाणिस्तान 'अ' संघाचे आव्हान संपुष्टात आले आहे.

तिलक वर्माच्या नेतृत्वाखालील भारतीय संघ ही मालिका जिंकण्यास उत्सुक असून त्यांना श्रीलंका 'अ'विरुद्ध कडवी झुंज द्यावी लागणार आहे. रविवारी सकाळी १०:०० वाजतापासून या अंतिम सामन्याला सुरुवात होणार आहे. सामन्याचे थेट प्रसारण स्टार स्पोर्ट्सवर होणार आहे.

◂ (वृत्तसंस्था)

# नीरज चोप्राला चौथे स्थान

**दोहा, २० जून**

दुखापतीमुळे हंगामाची सुरुवात उशिरा करावी लागलेल्या भारताच्या अव्वल भालाफेकपटू नीरज चोप्राने येथील दोहा डायमंड लीग स्पर्धेत चौथ्या स्थानावर समाधानकारक कामगिरी केली. २८ वर्षीय चोप्राने शुक्रवारी रात्री झालेल्या हंगामातील या पहिल्या स्पर्धेत आपल्या तिसऱ्या प्रयत्नात ८५.६९ मीटरची सर्वोत्तम कामगिरी नोंदविली, त्यामुळे तो अखेरीस चौथ्या स्थानावर राहिला.

त्याने आगामी राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेसाठी भारतीय ॲथ्लेटिक्स महासंघाने निश्चित केलेले ८२.६१ मीटरचे पात्रता अंतर पार केले. याआधीच त्याची ग्लासगो राष्ट्रकुल स्पर्धेसाठीच्या (२३ जुलै ते २ ऑगस्ट) ३२ सदस्यीय भारतीय संघात निवड झाली होती. सप्टेंबर २०२५ मध्ये टोकियो येथे झालेल्या जागतिक अजिंक्यपद स्पर्धेपूर्वी झालेल्या पाठीच्या दुखापतीचा चोप्राला त्रास होत होता. ◂ (वृत्तसंस्था)

# ऑस्ट्रेलियाचा नेदरलँड्सवर विजय



सामनावीर बेथ मूनी

**साऊदम्पटन, २० जून**

आयसीसी महिला टी-२० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत येथे खेळल्या गेलेल्या साखळी सामन्यात नेदरलँड्सविरुद्ध ९८ धावांनी सहज विजय मिळवताना ऑस्ट्रेलियाने महिला टी-२० विश्वचषकाच्या इतिहासातील संयुक्तरीत्या सर्वोच्च धावसंख्येची बरोबरी केली; मात्र, या विजयावर दुखापतीच्या एका नवीन समस्येचे सावट पडले, कारण सामना जिंकून देणारी खेळी खेळताना बेथ मूनीला पाठीच्या स्नायूंमध्ये त्रास जाणवला. या विजयाबरोबरच ऑस्ट्रेलियाने गट एकमध्ये ६ गुणांसह अव्वल स्थान मिळविले, तर भारत ४ गुणांसह दुसऱ्या स्थानावर आहे. बेथ मूनीला सामनावीर पुरस्कार देण्यात आला.

नेदरलँड्सने नाणेफेक जिंकून ऑस्ट्रेलियाला प्रथम फलंदाजीसाठी पाचारण केले. ऑस्ट्रेलियाने ६ बाद २१९ धावा केल्या. ही धावसंख्या या स्पर्धेच्या सलामीच्या सामन्यात इंग्लंडने प्रस्थापित केलेल्या विक्रमाशी बरोबरी साधणारी होती. प्रत्युत्तर देताना नेदरलँड्सला २० षटकांत ३ बाद १२१ धावांपर्यंतच मजल मारता आली.

ऑस्ट्रेलियाच्या बेथ मूनीने ४२ चेंडूंत ७४ धावा केल्या, पण त्यानंतर दुखापतीमुळे तिला मैदान सोडावे लागले (जखमी निवृत्त). दुखापतीतून सावरून परतलेल्या ॲशली गार्डनरने ३२ चेंडूंत ५८ धावा केल्या, तर जॉर्जिया वेअरहॅमने १८ चेंडूंत ४१ धावांची धडाकेबाज खेळी केली. मूनीची समस्या गंभीर नसल्याचे समजते.

नेदरलँड्सकडून कर्णधार बाबेट डी लीडने एकाकी झुंज देत नाबाद ५६ धावांची, तर स्टेर कॅलिसने ४४ धावांची खेळी केली, परंतु ती संघाला विजय मिळवून देण्यास पुरेशी ठरली नाही.

◂ (वृत्तसंस्था)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# करमाळ्यात वनविभागाचा ‘बुलडोझर’

## प्रशासकीय पथकावर दगडफेकीचा प्रयत्न; आंदोलकांवर गुन्हे दाखल

## आळजापूर येथे कोट्यावधींची वनजमीन अतिक्रमणमुक्त

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. २० जून-**

तालुक्यातील आळजापूर शिवारात वनविभागाच्या राखीव जमिनीवर गेल्या अनेक वर्षांपासून असलेले बेकायदेशीर अतिक्रमण प्रशासनाने शुक्रवारी एका धडक मोहिमेद्वारे जमीनदोस्त केले. कारवाईवेळी अतिक्रमणधारकांनी तीव्र विरोध करत दगडफेकीचा प्रयत्न केला, मात्र पोलिसांनी सौम्य लाठीमार करत परिस्थिती नियंत्रणात आणली. विरोध करणाऱ्यांवर शासकीय कामात अडथळा आणल्याप्रकरणी गुन्हे दाखल केले आहेत.

आळजापूर येथील वनविभागाच्या जमिनीवर अतिक्रमण करुन मोठ्या प्रमाणावर पक्की व कच्ची बांधकामे केली होती. वनविभागाने या संदर्भात संबंधितांना कायदेशीर नोटिसा बजावल्या होत्या, मात्र अतिक्रमण हटवले नाही. अखेर शुक्रवारी पहाटे ५ वाजताच वनविभाग, महसूल प्रशासन आणि पोलिसांच्या संयुक्त पथकाने जेसीबी आणि बुलडोझरसह आळजापूर गाठले. कारवाई सुरू होताच काही राजकीय कार्यकर्ते आणि अतिक्रमणधारकांनी जेसीबीसमोर झोपून काम थांबवण्याचा प्रयत्न केला. पोलिसांनी तात्काळ आंदोलकांना ताब्यात घेण्यास सुरुवात केली. काही समाजकंटकांनी पोलिसांच्या दिशेने दगडफेक केली, मात्र पोलिसांनी लाठीचा धाक दाखवत गर्दी पांगवली.

आळजापूर येथील शासकीय वनजमिनीवर पुन्हा अतिक्रमण करण्याचा प्रयत्न केल्यास थेट मोक्का अंतर्गत किंवा कडक कायदेशीर कारवाई केली जाईल. तालुक्यातील इतर भागांतील वनजमिनींचे सर्वेक्षणही सुरू आहे. पुढील काळात ही मोहीम अशीच सुरू राहील, असे करमाळा विभागाच्या वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांनी सांगितले आहे.

### कोट्यावधींची जमीन शासकीय ताब्यात

दिवसभर चाललेल्या या मोठ्या मोहिमेत वनविभागाने तब्बल एकर क्षेत्र अतिक्रमणमुक्त केले. जमिनीची बाजारपेठीय किंमत कोट्यवधी रुपयांच्या घरात आहे. जागेवर आता वनविभागाकडून तातडीने कुंपण घालून वृक्षारोपण केले जाणार असल्याचे सांगण्यात आले. अतिक्रमण पाठीशी घालणाऱ्या काही स्थानिक पुढाऱ्यांची नावेही समोर येत असून पोलिस त्यांची चौकशी करत आहेत.

# आषाढी वारी व मान्सूनच्या अनुषंगाने ‘आपत्ती व्यवस्थापन’चे प्रशिक्षण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० जून-**

आषाढी वारी आणि मान्सूनच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच निवासी उपजिल्हाधिकारी यांच्या सूचनेनुसार अक्कलकोट व परिसरातील पोलिस पाटील, महसूल सेवक, अग्निशमन दलाचे कर्मचारी आणि पोलिस विभागाचे कर्मचारी यांना रेस्क्यू बोट चालवणे, बचाव कार्य करणे तसेच पोहणे व बचाव तंत्रबाबतचे प्रशिक्षण शुक्रवार दि. १९ जून पासून सुरु केले आहे.

जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शक्तिशागर ढोले यांनी ही माहिती दिली. शुक्रवारी अक्कलकोट तालुक्यात करण्यात आली. यावेळी पोलिस पाटील, महसूल सेवक आणि अग्निशमन दलाचे कर्मचारी यांना प्रत्यक्ष प्रशिक्षण देण्यात आले. या कार्यशाळेसाठी आपत्ती व्यवस्थापन अधिकारी प्रशिक्षक, तसेच बजरंग होतकर रेस्क्यू अकॅडमी प्रशिक्षक आणि आपदा मित्र सोलापूर हे प्रशिक्षक म्हणून सहभागी आहेत. प्रशिक्षणास सहाय्य म्हणून अरुणा राठोड आपदा सखी सोलापूर, आशा सेविका होटगी प्राथमिक आरोग्य केंद्र आणि सागर धप्पादुळे आपदा मित्र शुभांगी गवते आपदा सखी सोलापूर सहाय्यक प्रशिक्षण देत आहेत.

## महत्वाचे...

# सह्याद्रीच्या डी.फार्मसी विद्यार्थ्यांचे वार्षिक परीक्षेत यश

**सांगोला, दि. २० जून-**



महाराष्ट्र शासनाच्या एमएसबीटीई, मुंबई यांनी घेतलेल्या उन्हाळी वार्षिक परीक्षेमध्ये सांगोला तालुक्यातील मेथवडे येथील सह्याद्री फार्मसीच्या डी.फार्मसी विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले. यामध्ये द्वितीय वर्ष डी.फार्मसी मधून निकिता चंद्रकांत बाबर व प्रणाली संतोष जाधव-८३.१८, पायल राजेंद्र जाधव-८२.३६, पायल सोमनाथ जाधव-८२.०९ तसेच प्रथम वर्ष डी.फार्मसी मधून मोनिका अतुल ढोले-८०.३०, सानिका प्रशांत पवार-७७.९०, संस्कृती अण्णासाहेब केदार-७७ टक्के गुण मिळवून अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकावला. यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेच्या अध्यक्षा अनिता इंगवले, विश्वस्त विश्वजीत इंगवले, प्राचार्य डॉ.मनोजकुमार पाटील यांनी सन्मान करून अभिनंदन केले. हे यश संपादन करण्यास संस्थेचे उत्कृष्ट नियोजन व व्यवस्थापन, कॉलेजमधील अनुभवी व तज्ञ प्राध्यापक वृंद यांचे मार्गदर्शन याची मोलाची मदत झाली असे मनोगत यशस्वी विद्यार्थ्यांनी व्यक्त केले.



# सहारा वृध्दाश्रमास गरजेच्या वस्तूचे दान

**बार्शी, दि. २० जून -**

उपळे दुमाला येथील सहारा वृद्धाश्रमात उद्योजक रौनक नंदकिशोर पल्लोड, सोनल विकास भुतडा तसेच तृप्ती अर्पितजी राठी यांच्या वतीने अधिकमासा निमित्त अन्नदान, वस्त्रदान, २१ स्टीलचे ताट, २१ प्रकारचे मिठाई बिस्किट फळे यांचे वाटप करण्यात आले. सुषमा भराडिया बार्शी यांच्यावतीने साखर, आंघोळीचे साबण देण्यात आले. प्रमोद मालपाणी यांच्याकडून विविध प्रकारची बिस्कीटे वितरित करण्यात आली. पुरणपोळीचे सुग्रास जेवण देखील देण्यात आले. शोभा नंदकिशोर पलोड या अशा सामाजिक उपक्रमात नेहमीच हिरोरिने भाग घेत आपल्या दिलदार स्वभावाने सढळ हस्ते नेहमीच मदत करण्यात तत्पर असतात. राजस्थानी महिला मंडळ बार्शी अंतर्गत हा दिव्य असा अधिकमास निमित्त दान कार्यक्रम पार पडला बार्शीहून जवळपास २० महिलांची उपस्थित होत्या.



# जि. प. प्राथमिक केंद्र शाळा परिते येथे नवागत विद्यार्थ्यांचे स्वागत

**टेंभुर्णी दि. २० जून -**

शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी जि. प. प्राथमिक केंद्र शाळा, परिते येथे नवागत विद्यार्थ्यांचे उत्साहपूर्ण व आनंददायी वातावरणात स्वागत करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या शाळेतील पहिल्याच दिवसाला विशेष स्वरूप देण्यासाठी गुलाबपुष्प, फुगे, चॉकलेट, पुस्तके, वह्या तसेच लेखन साहित्य वाटप करण्यात आले.या उपक्रमासाठी लागणारे सर्व साहित्य गावचे माजी सरपंच महादेव मोरे यांनी उपलब्ध करून दिले. त्यांच्या उपक्रमामुळे विद्यार्थी, पालक व ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले. कार्यक्रमास माजी सरपंच महादेव मोरे, सरपंच हनुमंत भोसले, उपसरपंच धीरज लामकाने, पोलीस पाटील उज्वला मुसळे, अध्यक्ष दयानंद लांडे, मनोहर शेळके, गणेश गायकवाड, सोपान जगताप, शंकर जाधव, श्रीकृष्ण लांडे, पांडुरंग लांडे, नितीन माळी, गणेश येवले, गोपाळ झांबरे, केशव लामकाने, शिंगटे, बापू माने तसेच केंद्रप्रमुख शंकर थोरात, मुख्याध्यापक राजकुमार क्षीरसागर, अंगणवाडी सेविका व मदतनीस उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन समाधान आवताडे यांनी केले. तर तानाजी ढवळे यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी वसंत मुंडे गुरुजी व बाळू शिंदे गुरुजी यांचे विशेष सहकार्य लाभले.

## निधन वृत्त...

### उमेश सांडू



**सोलापूर, दि. २० जून-**

सांडू फार्मास्युटिकल्स लिमिटेडचे कार्यकारी संचालक उमेश सांडू (वय ५९) यांचे शुक्रवार १९ जून रोजी चेंबूर येथील त्यांच्या घरी आकस्मिक निधन झाले. उमेश सांडू यांनी सांडू फार्मास्युटिकल्स लिमिटेडला राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर विशेष प्रतिष्ठा मिळवून दिली. त्यांच्या पश्चात त्यांच्या दोन मुली, आई, दोन भाऊ असा परिवार आहे.

### केतन शिंदे



**सोलापूर, दि. २० जून-**

डब्ल्यू. आय. टी. कॉलेजसमोरील मोतीवाला प्राईड येथील केतन मुकुंद शिंदे (वय ३२) यांचे शनिवारी निधन झाले. त्यांच्या पश्चात आई, वडील, एक भाऊ, एक बहीण असा परिवार आहे. त्यांच्यावर रविवारी सकाळी ११.३० वाजता शांती चौक येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार होणार आहेत. निवृत्त सहायक फौजदार मुकुंद शिंदे यांचे ते चिरंजीव होत.

# अभियांत्रिकी पदविका उन्हाळी परीक्षेत शुभम माने जिल्ह्यात प्रथम

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि.२० जून-**

महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांनी घेतलेल्या अभियांत्रिकी पदविका उन्हाळी परीक्षेत सांगोल्यातील शिवाजी पॉलिटेक्निक कॉलेजच्या प्रथम वर्षाचा ९०.७३, द्वितीय वर्षाचा ७७.२५, अंतिम वर्षाचा ९८.७३ टक्के निकाल लागला. अंतिम वर्षाच्या शुभम माने याने जिल्ह्यात प्रथम क्रमांक मिळवला.

वैष्णवी भोसले व तनुजा मेटकरी, शाहिद मुजावर यांनीही उत्कृष्ट कामगिरी केली. द्वितीय वर्षाच्या मृदुला पाटील, अमृता मिसाळ, नेहा लेंडवे तसेच प्रथम वर्षाच्या आरती गंगाधरे, सबा इनाम दार, प्रणवी देशमुख यांनी अनुक्रमे पहिले तीन क्रमांक मिळवले. प्रथम वर्षातील धनश्री माने, आदित्य खटकाळे, श्वेता गायकवाड, मोहित शिंदे, मयुरी शिंदे, ज्योती सूर्यवंशी, अक्षरा आहेरकर, शितल साळुंखे, सना इनामदार, गौरी मोरे, आरती सूर्यवंशी, अमृता शिंदे, कशिश खटकाळे, प्रांजली जाधव, द्वितीय वर्षातील सृष्टी काशीद, अंतिम वर्षातील शुभम वलेकर, ऋषिकेश शेंडगे, यशराज देशमुख, मेहुल शिंदे, पूजा राजगे, रंजीत देवकते, समीक्षा यादव, अदिती माने, तहूरा मुल्ला, स्वप्नाली दिवसे, कार्तिक चव्हाण, अविनाश गव्हाणे, वैष्णवी गायकवाड, सर्वज्ञ पांडे, प्रीती घाडगे, रोहित माने, साक्षी मेखले, सुमित शिंदे, प्रणाली पाटील, गणेश कोरे, अर्पिता इंगोले, स्वप्नाली शिंदे, शिवानी येलपले, सानिका साळुंखे, गौरी काटे, शितल सावंत, सविता बिले, शुभम वाघमारे, प्रवीण गायकवाड, प्राजक्ता गव्हाणे, चारुशीला नरळे, समीक्षा लिगाडे, सानिका पवार, यश बोत्रे, अपूर्वा झांबरे यांनी ९० टक्के पेक्षा जास्त गुण मिळवले.

अप्लाइड मॅथेमॅटिक्समध्ये प्रज्वल चव्हाण, अभिजीत दुधाळ, अभिमन्यू भोसले, संस्कार बाबर, आरती गंगाधरे, सबा इनामदार, मयुरी शिंदे, गौरी मोरे, हर्षदा देवकते, साक्षी बुगडे, आरती सूर्यवंशी, प्रणव नलवडे, भारती घाडगे, करीना मुलाणी, अनुष्का शिंदे, मनीष भोसले, पायल माळी, वल्लभी पाटील, ओंकार जाधव, शितल साळुंखे, ज्योती सूर्यवंशी, विराज सोळगे आदींनी यश मिळवले. विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, विश्वस्त, प्राचार्य यांनी अभिनंदन केले.

# ‘टाटा पॉवर’तर्फे वळसंग येथे नाला सरळीकरण

**तभा वृत्तसेवा,**
**वळसंग दि. २० जून-**



दक्षिण सोलापूर तालुक्यातील वळसंग येथील ४ किलोमीटर लांबीच्या नाल्याचे टाटा पॉवर कम्युनिटी ट्रस्टकडून सरळीकरण सीआरएस फंडातून झाले. यशदाचे उपमहासंचालक व माजी जिल्हाधिकारी डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांनी सातत्याने यासाठी पाठपुरावा केला होता.

गावातील गुडंगा विहीर ते माणकोजी शेत या चार किलोमीटर लांबीच्या नाल्याचे सरळीकरण टाटा पॉवर कम्युनिटी ट्रस्टने केले आहे. दुसऱ्या टप्प्याचे उद्घाटन शेतकरी मल्लिनाथ गुमदे यांच्याहस्ते डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी, टाटा वळसंग युनिटचे हेड दत्तात्रय बस्तापुरे, संवाद तज्ञ सचिन जाधव, माजी सरपंच महादेव होटकर, हुतात्मा जलसंवर्धन समितीचे अध्यक्ष दिनकर नारायणकर यांच्या उपस्थितीत झाले. वळसंगचे सरपंच जगदीश अंटद, उपसरपंच समीर कटरे, माजी सरपंच सिद्धाराम कोडले, महादेव होटकर, शिवबसपा खैराटे, अल्ताफ पटेल, अशोक खैराटे, राजकुमार हंजगे, घाळेपा भूसणगी, सादीक पटेल, अशोक तिपरादी, राजकुमार माणकोजी, मल्लिनाथ गुमदे व शेतकऱ्यांनी सहकार्य केले.

ओढ्याच्या दोन्ही बाजूला बांबू व गजगा या झाडांची लागवड केल्याने दोन्ही बाजूची माती परत ओढ्यात येणार नाही. शेतकऱ्यांना या झाडांची रोपे मोफत उपलब्ध करून देऊ असेमल्लिनाथ कलशेट्टी यांनी सांगितले. टाटा सीएसआर विभागाचे अधिकारी विश्वास सोनवले, यशवंत गायकवाड, हुतात्मा जलसंवर्धन समितीचे पदाधिकारी वीरेश बागलकोटी, सादिक पटेल, रवी कलशेट्टी, अजय काळे, परशुराम चौगुले, पार्श्वनाथ खोबरे, प्रतिभा दुधगी, निलव्वा जिड्डीमनी, भागीरथी बिराजदार, कल्पना जाधव यांनी परिश्रम घेतले.

नालासरळीकरणाचे काम सुरू करण्यासाठी पाठपुरावा करण्यात आला. सोलार प्रकल्पाच्या सपाट जमिनीत जलतारासारखे प्रयोग केल्यास वाहून जाणारे पाणी जमिनीत मुरेल.
**दिनकर नारायणकर,** अध्यक्ष, हुतात्मा जलसंवर्धन समिती, वळसंग

### भूजल पातळीत होईल वाढ

टाटा पॉवर कम्युनिटी ट्रस्ट मुंबई यांच्या सीएसआरफंडातून या ओढ्याचे सरळीकरण करत आहे. त्यामुळे वाहून जाणारे पावसाचे पाणी अडवले जाईल. भूजल पातळीत वाढ होईल.
**डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी,**
उपमहासंचालक, यशदा पुणे



# उच्च ध्येय प्राप्त करण्यासाठी अभ्यासच सर्वश्रेष्ठ

**तभा वृत्तसेवा**
**श्रीपूर. दि. २० जून -**

विद्यार्थ्यांनी देशाचे सुजाण नागरिक बनणे व स्वतःचे आत्मसन्माना साठी तसेच उच्च ध्येय प्राप्त करण्यासाठी वाचन, मनन , अभ्यास हे माध्यमच सर्वश्रेष्ठ असल्याचे प्रतिपादन वेळापूरचे पोलिस उपनिरिक्षक प्रणित कांबळे यांनी केले . श्रीपूर येथिल आबासाहेब देशमुख चॅरिटेबल ट्रस्ट तथा चंद्रशेखर विद्यालयातील गुणवंत विद्याथ्यर्थ्यांच्या गुणगौरव समारंभात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी अँड. धिरज पाटील होते.

याप्रसंगी मंचावर महाळुंग-श्रीपूर नगरपंचायतीचे नगरसेवक जगदीश इंगळे, शिक्षणतज्ञ चंद्रकांत भाऊ साळुंखे,शाळा व्यवस्थापन समिती उपाध्यक्ष विजयकुमार चव्हाण, पत्रकार महादेव जाधव, मुख्याध्यापक शंकर यादव, संस्था व्यवस्थापन अधिकारी हनुमंत मोरे उपस्थित होते. या कार्यक्रमात माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा, स्काऊट -गाईड कब चतुर्थ चरण राज्य पुरस्कार, बुलबुल हिरक पंख राज्य पुरस्कार प्राप्त विध्यार्थी, राष्ट्रीय सुवर्ण बाण पुरस्कार, नवी दिल्ली राष्ट्रीय पुरस्कार यशस्वी, माध्यमिक व उच्च माध्यमिक, नीट परीक्षा यामध्ये उज्वल यश संपादन केलेले विध्यार्थी व पालकांचा गुणगौरव करण्यात आला.

याप्रसंगी अँड. धिरज पाटील, महादेव जाधव व विद्यार्थीनी समिक्षा चव्हाण यांनीही आपले मनोगता मध्ये शिक्षणाचे महत्व विशद केले. मुख्याध्यापक शंकरराव यादव यांनी उपस्थितांच स्वागत केले. अमर टकले व सांस्कृतिक विभाग प्रमुख विजयकुमार भाग्यवंत यांनी नियोजन तर सूत्रसंचालन आरती डोळे व आभार उमेश नाझरकर यांनी मानले.

# स्वर्णश्री पाटील पुनर्मूल्यांकनानंतर दहावी बोर्ड परीक्षेत राज्यात प्रथम

**तभा वृत्तसेवा**
**मंगळवेढा दि. २० जून-**



शिक्षण प्रसारक मंडळ,मंगळवेढा संचलित इंग्लिश स्कूल मंगळवेढा या प्रशालेची विद्यार्थिनी स्वर्णश्री धनंजय पाटील हिला दहावी बोर्ड परीक्षेत फेरतपासणीत १००%(५०० पैकी ५००) गुण मिळाले. परिणामी तिने राज्यात प्रथम क्रमांक पटकावला.

परीक्षेचा निकाल ८ मे रोजी जाहीर झाला होता. यामध्ये स्वर्णश्रीने ९९.८०% (४९९)गुण मिळविले होते. मात्र तिच्यासह प्रशालेचे प्राचार्य रवींद्र काशीद व विषय शिक्षकांनी तिच्या समाजशास्त्र या विषयाचे पुनर्मूल्यांकन व्हावे अशी दहावी बोर्डाकडे विनंती केली. त्यानुसार झालेल्या पुनर्मूल्यांकनात तिला समाजशास्त्र या विषयात एक गुण वाढवून मिळाला. परिणामी १०० पैकी १०० गुण प्राप्त झाल्याने राज्यात तिचा प्रथम क्रमांक आल्याचे दहावीच्या बोर्डामार्फत पत्राद्वारे कळवले आहे.

स्वर्णश्री पाटीलच्या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष ॲड.सुजित कदम, उपाध्यक्ष डॉ.सुभाष कदम, अकॅडमिक ॲडमिनिस्ट्रेटर डॉ.मिनाक्षी कदम, सचिवा डॉ.प्रियदर्शिनी महाडीक, संचालिका प्रा. तेजस्विनी कदम, सहसचिव श्रीधर भोसले, संचालिका अजिता भोसले, खजिनदार राम नेहरवे, संचालक यतिराज वाकळे, ॲड.शिवाजी पाटील, प्राचार्य रविंद्र काशिद, उपमुख्याध्यापक सुनिल नागणे, पर्यवेक्षक सुहास माने, अशपाक काझी, पर्यवेक्षिका लता ओमणे आदींसह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.

# बटरफ्लाय स्कूल येथे योग दिन साजरा

**सोलापूर, दि. २० जून-**

बटरफ्लाय इंग्लिश मीडियम स्कूल मध्ये आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी प्रशालेच्या प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका रश्मी पूर्वत उपस्थित होत्या. योगशिक्षिका पतंजली जिल्हा संघटन समितीच्या अश्विनी नंदुरकर व त्यांचे सहकारी यांनी कृतीयुक्त मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांकडून योगासने व प्राणायाम यांची प्रात्यक्षिके करून घेतली. ताडासन, भुजंगासन, पवन मुक्तासन, वज्रासन, शलभासन, आदि आसने व प्राणायामानंतर प्रार्थना घेऊन योग दिनाची सांगता करण्यात आली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व शिक्षिकावृंद, शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# कौशिक आश्रम हे कर्तव्यपूर्तीचे केंद्र : भय्याजी जोशी

**तभा वृत्तसेवा,**
**पुणे, दि. २० जून-**

घरातील ज्येष्ठ मंडळींची विशिष्ट वयानंतर आपण जी सेवा करतो, ती सेवा नसते, तर ते कर्तव्य असते. ‘कौशिक आश्रम’ हे देखील संघाच्या ज्येष्ठ प्रचारकांची सेवा करणारे कर्तव्यपूर्तीचे केंद्र आहे, असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या केंद्रीय कार्यकारिणीचे सदस्य भय्याजी जोशी यांनी शनिवारी केले.

पुण्यातील मित्रमंडळ सोसायटीमध्ये असलेल्या ‘कौशिक आश्रम’ या वास्तूच्या पुनर्निर्माणानिमित्त आयोजित ‘कृतज्ञता सत्कार कार्यक्रमा’त श्री. जोशी बोलत होते. संघाच्या पश्चिम महाराष्ट्र प्रांताचे संघचालक प्रा. नानासाहेब जाधव आणि संस्थेचे विश्वस्त दिवाकर पांडे यांची कार्यक्रमात प्रमुख उपस्थिती होती.

‘कौशिक आश्रम’पुनर्निर्माणाच्या कार्यात मोलाचे योगदान दिलेल्या हितचिंतकांचा प्रातिनिधिक सत्कार जोशी, प्रा. जाधव आणि पांडे यांच्या हस्ते करण्यात आला. ‘कौशिक आश्रम’ हे विश्रांतीस्थान नाही तसेच ते सेवाकेंद्रही नाही. समाधान आत्मीयतेमध्ये असते. असे आत्मीयतेचे, समाधानाचे, आनंदाचे वातावरण ज्या वयात अनुभवायला मिळाले पाहिजे, असे ज्येष्ठ कार्यकर्ते ‘कौशिक आश्रम’ येथे राहणार आहेत. त्यांना येथे तसेच वातावरण अनुभवता येईल, असे जोशी यांनी सांगितले. या इमारतीला ऑफिसचे स्वरूप येणार नाही. हे घर आहे, असे वातावरण जिथे अनुभवायला मिळेल, अशी ही वास्तू आहे. पुढेही येथे समाधानाचे वातावरण राहील याची खात्री देतो, असेही भय्याजी जोशी म्हणाले. डॉ. जगदीश करमळकर यांनी मनोगत व्यक्त केले. नागेश पाटील यांनी सूत्रसंचालन केले.



### मैत्रीचा संदेश देणारे केंद्र

कार्यक्रमापूर्वी मित्रमंडळ सोसायटीच्या पदाधिकाऱ्यांबरोबर भय्याजी जोशी यांनी संवाद साधला. ‘कौशिक आश्रम’ आमच्या सोयायटीमध्ये असल्याचा आम्हालाही आनंद आहे, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. हा धागा पकडून भय्याजी जोशी म्हणाले की, कायम मैत्रीचा संदेश देणारे ‘कौशिक आश्रम’ हे केंद्र आहे आणि हाच संदेश हे केंद्र पुढेही देत राहील.

# 'कॉरिडॉर'बाबत पंढरपूरवासियांत संभ्रमावस्था; अडीच वर्षापासून प्रकल्पाबाबत स्पष्टता नसल्याची भावना

**तभा वृत्तसेवा । महेश भंडारकवठेकर**
**पंढरपूर, दि. २० जून-**

गेल्या दोन ते तीन वर्षापासून रेंगाळत असलेल्या पंढरपूर कॉरिडॉरला अखेर राज्य शासनाकडून अंतिम मंजुरी दिली आहे. शासनाकडून १८ जून रोजी त्याबाबतचा आदेश देखील निर्गमित केला आहे. तरीपण, या 'कॉरिडॉर'बाबत पंढरपूरवासियांत संभ्रम ावस्था असून जिल्हा प्रशासनाकडून याबाबतची माहिती सर्वसामान्य नागरिकांना देण्यात यावी, अशी मागणी येथील शहरवासियांकडून होत आहे.

पंढरपुरात केवळ आषाढी, कार्तिकीसारख्या यात्रांच्यावेळीच केवळ भाविकांची गर्दी होवू नये. भाविकांची गर्दी येथे वर्षभर नियमित रहावी यासाठी उज्जैन, वाराणसीच्या धर्तीवर तीर्थक्षेत्र पंढरपूरचा विकास होण्यासाठी राज्य शासनाकडून पंढरपूर कॉरिडॉरची घोषणा करण्यात आली. मात्र दोन, अडीच वर्षापासून या प्रकल्पाची नुसतीच चर्चा होत होती. प्रत्यक्षात कोणतीही कार्यवाही होत नव्हती. मात्र गेल्या दोन, तीन महिन्यापासून राज्य शासनाने पंढरपूर कॉरिडॉरसाठी हालचाली जलद केल्या.

**बाधित उद्योग, व्यवसायासंबंधी संतप्त प्रतिक्रिया व्यक्त होताहेत**

बाधित होणाऱ्या नागरिकांना भविष्यासंदर्भातील निर्णय घेण्यासाठी किंवा बाधित झालेले उद्योग, व्यवसाय पुनर्स्थापित करण्यासाठी पुरता वेळ तरी मिळावयास हवा की नाही? अशी संतप्त प्रतिक्रिया संभाव्य बाधितांकडून व्यक्त होत आहेत.

शिखर समितीच्या बैठकीनंतर लगेचच २१ जून रोजी या प्रकल्पाला शासनाची अंतिम मंजुरी देवून प्रकल्पाबाबतचा शासन आदेश निर्गमितही केला. परिणामी जिल्हा प्रशासनाकडून आता या प्रकल्पाबाबतची सविस्तर माहिती येथील नागरिकांना देणे गरजेचे बनले आहे. कारण गेल्या दोन, अडीच वर्षापासून येथील नागरिक विशेषत: मंदिर परिसरातील नागरिक संभ्रमावस्थेत आहेत. येथे मागील दोन, अडीच वर्षापासून या प्रकल्पाबाबत नुसता अफवांचा पाऊस पडत आहे.



मध्यंतरी तत्कालीन जिल्हाधिकारी कुमार आर्शीर्वाद यांनी येथे संभाव्य बाधितांच्या बैठका घेऊन त्यांची मते जाणून घेतली. त्यानंतर शासकीय अधिकाऱ्यांकडून काही भागात सर्वेक्षणही करण्यात आले. मात्र या प्रकल्पाबाबत कोणीही ठोस माहिती उपलब्ध करुन दिली नाही. त्यानंतर आशीर्वाद यांची बदली झाली. त्यांच्या जागी एस. कार्तिकेयन यांनी जिल्हाधिकारीपदाची सूत्रे हाती घेतली. त्यांनी देखील पंढरपूर येथे येवून कॉरिडॉर होणार असून यामध्ये कोणाचेही नुकसान शासनाकडून होवू दिले जाणार नाही, असे सांगितले. मात्र त्यांनी देखील या प्रकल्पाबाबतची ठोस माहिती दिली नाही.

एक-दीड महिन्यापूर्वी पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी समाज माध्यमांवर कॉरिडॉरनंतरचे पंढरपूर कसे असणार? याबाबतचे फोटो, व्हिडिओ देखील प्रसिध्द केले होते. त्यामुळे नेमका प्रकल्प काय आहे? तो कसा असणार आहे? यांसारखे प्रश्न अनुत्तरीत आहेत. येथील नागरिक सध्या चिंतित व भयभीत झालेले आहेत. परिणामी, जिल्हा प्रशासनाकडून या संपुर्ण प्रकल्पाबाबतची सविस्तर माहिती सर्वसामान्य पंढरपूरवासियांसाठी खुली करणे गरजेचे बनले आहेफ

**पंढरपूरकरांच्या मनातील प्रश्न**

साधारपणपणे किती नागरिकांच्या मालमत्ता बाधित होणार? मंदिर परिसरात हा कॉरिडॉर कोठून कोठपर्यंत असणार? कोणत्या पुरातन वास्तुंचे जतन, संवर्धन होणार? बाधितांना भरपाई कशा प्रकारे मिळणार? मंदिर परिसरातील रस्ता किती मीटरचा होणार? शहरातील अन्य २१ रस्ते देखील डीपी प्लॅनमध्ये रुंद करण्याचे नियोजन केले आहे; ते रस्ते कोणते असणार? डीपी प्लॅनमध्ये बाधितांना भरपाई कशी मिळणार? कॉरिडॉरमध्ये नगरप्रदक्षिणा मार्गाचा देखील समावेश आहे का? डीपी प्लँन आणि काँरिडोर यामध्ये बाधित होणाऱ्यांना एकसमान न्याय मि ळणार की तो वेगवेगळा असणार? प्रकल्पामध्ये बाधित लोकांना नुसती शासनभरपाई मिळणार की नाही घराच्या बदल्यात घर, दुकानांच्या बदल्यात दुकान मिळणार?

---

## महत्वाचे...



### गरीब व गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप

**सोलापूर, दि. २० जून-**

गोरगरीब, गरजू विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात राहता यावे; यासाठी येथील जागरुक नागरिक आणि विविध क्षेत्रांतील मान्यवरांकडून मनपा मराठी मुलींची केंद्रशाळा क्र.३ मधील पहिली ते पाचवीच्या विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे मोफत वाटप करण्यात आले. शांताराम शिंदे यांच्या संकल्पनेतून आकारास आलेल्या या उपक्रमासाठी शशिकांत सदाफुले, प्रमोद कलशेट्टी, प्रा.दीपक नारायणकर, जीवनदास इंगळे, नागेश खरटमल, संदीप राठोड यांच्यासह अन्य काही जणांनी आर्थिक मदत केली. याप्रसंगी मुख्याध्यापिका नीलम राऊत, शिक्षिका दीपाली निकम, शिपाई गणेश जाधव उपस्थित होते.



### डॉल्बी, डिजिटलला फाटा; शैक्षणिक साहित्याचे वाटप

**विशालनगर गणेशोत्सव मंडळाचा स्तुत्य उपक्रम**

**सोलापूर, दि. २० जून-**

जुळे सोलापुरातील विशालनगर गणेशोत्सव मंडळाच्या वतीने डॉल्बी, डिजिटल व स्क्रीनच्या वायफळ खर्चाला फाटा देत शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. एक रेघी, दुरेघी चार रेघी, चौकटी वही, चित्रकला वही, रंग खडू, कंपास, पाटी, पेन्सिल, खोडरबर व पेन असे वर्षभर पुरेल इतके शैक्षणिक साहित्य देण्यात आले. हा स्तुत्य उपक्रम १४ वर्षांपासून राबविण्यात येत असल्याचे सांगण्यात आले. यंदा उपक्रमाची सुरुवात दक्षिण सोलापूर तालुक्यातील कासेगाव येथील जि.प. शाळा बिरोबा वस्ती येथून करण्यात आली. यावेळी सीए प्रतीक शिरसीकर, सौरभ बुडुख, अंकुर येळीकर, अ‍ॅड.निनाद पाटील, ग्रा. पं.सदस्य सुरेखा चौगुले, तंटामुक्त समितीचे अध्यक्ष संजय पवार, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सुनील आवताडे, शाळा सुधार समितीचे अध्यक्ष तुकाराम जाधव, विश्वजीत चौगुले, मुख्याध्यापक राजशेखर बुरकुले, सुखदेव वाघमारे उपस्थित होते.. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मयूर पानकर, अक्षय कल्याणी, सुमीत कट्टे, महेश जोडमोटे, शैलेश जाधव, समर्थ गौडगाव, अमोल चिट्टे, निपुण कवठेकर, सूरज नदाफ, रोहन मेंगजी, सारंग कुलकर्णी, सुयश बिराजदार, यश उंबरजे, मानस कडगंची, मंदार छत्रे आर्दीनी परिश्रम घेतले.

### आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त योग शिबीर

**अक्कलकोट दि. २० जून -**

आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त विवेकानंद प्रतिष्ठान व पतंजली योग समिती, अक्कलकोट यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार, दि. २१ जून रोजी सकाळी ६.00 वाजता विठ्ठल मंदिर, अक्कलकोट येथे योग शिबिराचे आयोजन केले आहे. शिबिरात योग प्रात्यक्षिके, प्राणायाम, ध्यान तसेच निरोगी जीवनशैलीसाठी मार्गदर्शन करणार आहे. योग हा केवळ व्यायाम नसून निरोगी, संतुलित आणि सकारात्मक जीवन जगण्याचा मार्ग आहे. सर्व नागरिकांनी आपल्या परिवारासह या योग शिबिरात सहभागी होऊन आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा करण्याचे आवाहन विवेकानंद परिवाराच्यावतीने करण्यात आले आहे.

---

## ३८ पोलिस अधिकाऱ्यांच्या अंतर्गत बदल्या

**चंदनशिवे, सावंत, मोरे गुन्हे शाखेत**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० जून-**

शहर पोलिस आयुक्तालयातील सहाय्यक पोलिस निरीक्षक आणि पोलीस उपनिरीक्षक असे एकूण ३८ पोलिस अधिकाऱ्यांच्या अंतर्गत बदल्या करण्यात आल्या. यात सपोनि भरत चंदनशिवे, नानासो सावंत, मनोज मोरे, विजय बनसुडे यांची गुन्हे शाखेत, सारिका जगताप यांची सदर बझार पोलिस ठाण्यात तर सागर काटे यांची एमआयडीसी (विमानतळ सुरक्षा) येथे बदली करण्यात आली.

रमेश कांबळे यांची शहर वाहतूक शाखेतून शहर दक्षिण वाहतूक शाखा, श्रीकांत पाटोळे, राधा जेऊघाले यांची फौजदार चावडी येथून जोडभावी पेठ, जोडभावी पेठचे सागर बामणे





यांची शहर दक्षिण वाहतूक शाखा, संतोष येडे यांची जेलरोड, नागेश येळे, लक्ष्मण पाटील, अशोक तरंगे यांची एमआयडीसी, महेंद्र गाढवे यांची आर्थिक गुन्हे शाखा, नागेश येणपे यांची सदर बझार येथे बदली करण्यात आली.

नागनाथ कानडे यांची नियंत्रण कक्ष, नागेश इंगळे यांची एमआयडीसी, विक्रम रजपूत यांची पोलिस उपायुक्त परिमंडळ यांचे वाचक, धनंजय जाधव यांचे प्रशिक्षण कक्ष, बालाजी मस्के यांची आर्थिक गुन्हे शाखा, मनोज बागल यांची विजापूर नाका येथे बदली करण्यात आली आहे. दरम्यान, सपोनि शितलकुमार गायकवाड, ज्योत्स्ना भांबिष्टे, गणेश इंगळे, सपोनि स्वाती येळे, पोउपनि वर्षाराणी सुतार, सुरज कुतवळ, प्रकाश बनसोडे, नवनाथ साखरे यांना एकवर्ष मुदतवाढ देण्यात आली.

शहरातील ७ पोलीस अधिकाऱ्यांच्या विनंती बदल्या करण्यात आले आहेत. त्यात फौजदार संतोष कुलकर्णी (शवाशा द. ते अर्ज शाखा), सहाय्यक पोलीस निरीक्षक राधिका केंद्रे (एमआयडीसी ते फौजदार चावडी पोलिस ठाणे), सहाय्यक पोलीस निरीक्षक विष्णू गायकवाड (जोडभावी पेठ ते विजापूर नाका पोलिस ठाणे) येथे विनंती बदली करण्यात आली आहे. बदली झालेल्या पोलिस अधिकाऱ्यांना तात्काळ आपला नवीन कार्यभार स्वीकारण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

---

## स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे माळशिरस तालुकाध्यक्ष अजित बोरकर यांच्यावर हल्ला

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. २० जून-**

स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे माळिशरस तालुकाध्यक्ष अजित बोरकर यांच्यावर शुक्रवार दि १९ जून रोजी रात्री ८ वाजण्याच्या सुम ारास अज्ञात पाच ते सहा व्यक्तींनी निमगाव पाटी येथे धारदार शस्त्र व रॉडने मारहाण करून प्राणघातक हल्ला केल्याची घटना घडली.

अजित बोरकर हे आपल्या कार्यालया शेजारी फोनवर बोलत उभे असताना सफारी गाडीतून आलेले चार ते पाच इसमांनी त्यांच्यावर हल्ला केला. त्यांना तात्काळ अकलूज येथील खासगी हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले असून अतिदक्षता विभागात उपचार सुरु आहेत.

स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष तथा माजी खासदार राजू शेट्टी हे रविवारी अकलूज येथे येणार असून अजित बोरकर यांच्यावरील हल्ल्यासंदर्भात संघटेनची भूमिका जाहीर करणार असल्याचे सूत्रांकडून सांगण्यात आले.

दरम्यान, पोलिस प्रशासनाने सतर्कतेची भूमिका स्वीकारली असून अकलूजचे डीवायएसपी वाळके, पोनि उबाळे यांनी हॉस्पिटलला भेट देऊन माहिती घेतली.

मात्र अजित बोरकर यांच्यावर झालेल्या या हल्ल्याचे नेमकं कारण समजू शकले नाही.

---



## सोलापूर जनता बँकेच्या वतीने प्रभाग क्रमांक २१ मध्ये वृक्षारोपण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० जून-**

सोलापूर जनता सहकारी बँकेच्या उजनी नगर शाखेच्या वतीने प्रभाग क्रमांक २१ मध्ये वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी पर्यावरणविषयक जनजागृती करण्यात आली.

नगरसेवकद्वय सात्विक बडवे, शिवाजी वाघमोडे, बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनय दुनाखे, उप-सरव्यवस्थापक मकरंद जोशी, पर्यावरणप्रेमी श्रीराम रामदासी, विभागीय कार्यालय क्रमांक ४ चे जगदाने यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाखा व्यवस्थापिका माधुरी कुलकर्णी, बँकेचे सभासद खातेदार महेश माने, वस्त्रद, बक्षी, गुरुराज कुलकर्णी, मनीष टंकसळी, निशिकांत खेडकर संजय कुचेकर, राज जगताप आदींनी परिश्रम घेतले.

---

## 'कट्यार काळजात घुसली'चे सोलापुरात शुक्रवारी अभिवाचन, नाट्यसंगीत

**कै.सिध्दा पाटील जन्मशताब्दीनिमित्त डॉ. आनंद केळकर यांचा गौरव**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० जून-**

कै.सिध्दा पाटील यांच्या जन्म शताब्दी वर्षानिमित्त पाटील परिवार, कै.सिध्दा पाटील स्मृती समिती, नाट्य आराधना-सोलापूर शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार, दि.२६ जून २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता शिवछत्रपती रंगभवन येथे 'कट्यार काळजात घुसली' या नाटकाचे अभिवाचन, नाट्यसंगीताचे आयोजन करण्यात आले आहे, असे अ‍ॅड.आर.एस.पाटील यांनी सांगितले.

मराठी संगीत नाटकांच्या सुवर्णमयी इतिहासात २४ डिसेंबर १९६७ हा दिवस अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. याचदिवशी 'संगीत कट्यार काळजात







घुसली' हे नाटक रंगभूमीवर आले. या अजरामर कलाकृतीला ५८ वर्षे पूर्ण झाली असली, तरीही रसिकप्रेमींच्या मनावर या नाटकाचे अधिराज्य कायम आहे. सुप्रसिध्द लेखक पुरुषोत्तम दारव्हेकर यांनी लिहिलेल्या या नाटकात हिंदुस्थानी संगीत, संगीतातील विविध घराणी, घराण्यांचा अभिनिवेश आणि दोन भिन्न घराण्यांच्या गायकांमधील संघर्ष अतिशय प्रभावीपणे मांडला आहे.

शुक्रवारी सोलापुरात आयोजित केलेल्या या नाटकाची संहिता, संपादन व दिग्दर्शनाची जबाबदारी शोभा बोल्ली ह्या पेलणार आहेत. मंदार काळे, सुहास मार्डीकर, मम ता बोल्ली, ओंकार कुलकर्णी, प्रांजली म ार्डीकर हे कलावंत अभिवाचन तर प्रतिक सलगर, इंद्रायणी व्यास, शिरीष बोकील हे गायन करणार आहेत. संतोष कुलकर्णी यांनी संवादिनी, जयंत जोशी यांनी व्हायोलियन, गुणेश दाते यांनी तबल्याची साथसंगत तर मंजुषा गाडगीळ ह्या सूत्रसंचालन करणार आहेत.

याप्रसंगी माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांची प्रमुख उपस्थिती लाभणार असून त्यांच्या हस्ते डॉ.आनंद केळकर यांचा गौरव करण्यात येणार आहे. तरी सोलापूरमधील उपस्थित रहावे, असे आवाहनही त्यांनी केले.

---

## रिक्षाचालकाचा खून; मारेकऱ्याला अटक

**५ दिवसांची पोलिस कोठडी**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० जून-**

प्रेयसीचा पती असलेल्या एका रिक्षाचालकाचा कोयत्याने वार करुन निर्घुणपणे खून करण्यात आल्याची घटना अक्कलकोट रोड एम आयडीसी येथील एका कंपनीसमोर शुक्रवार, दि.१९ जून २०२६ रोजी रात्री १०.३० वाजण्याच्या सुमारास घडली. मारेकरी संतोष महादेव पाटील (वय-१९, रा.कलावती नगर, सोलापूर) यास अटक करुन न्यायालयासमोर उभे केले असता ५ दिवसांची पोलिस कोठडी सुनावण्यात आली.

यातील मयत रिक्षाचालकाचे नाव सिध्दाराम कैलास कटप (वय-२०, रा.आकाशवाणी केंद्राजवळ, सोलापूर) असे आहे.



शुक्रवारी रात्री १०.१५ वाजण्याच्या सुमारास आरोपी संतोष पाटील याने सिध्दाराम कटप याला फोन करुन भेटण्यास बोलावले. त्यावेळी त्यांच्यात वाद झाला, हा वाद इतका विकोपाला गेला की, संतोष याने सिध्दाराम यांच्यावर कोयत्याने थेट हल्ला चढवला.

एकापाठोपाठ एक असे वार केल्याने सिध्दाराम कटप हा रक्ताच्या थारोळ्यात कोसळला. त्याचा जागीच मृत्यू झाला. दरम्यान, भांडण सोडविण्यासाठी आलेले सिध्दाराम याचा भावजी प्रमोद पाटील यांनाही आरोपी संतोष पाटील याने वार करुन गंभीर जखमी केले. याप्रकरणी मयत सिध्दारामची पत्नी श्रुती कटप यांनी एमआयडीसी पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली. वपोनि प्रमोद वाघमारे हे पुढील तपास करीत आहेत.

**मयताचा वर्षापूर्वीच झाला होता विवाह**

**यातील मयत सिध्दाराम कटप याचा एक वर्षापूर्वीच विवाह झाला होता. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, दोन बहिणी असा परिवार आहे. त्याचे वडील कैलास कटप यांचा दुचाकीसमोर कुत्रा आडवा आल्याने वर्षभरापूर्वीच मृत्यू झाला होता.**

---

## मुढवी येथील नदीपात्रातून अवैध वाळू वाहतुकीवर कारवाई

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा दि. २० जून -**

मुढवी येथे माण नदीच्या पात्रात बेकायदा वाळू वाहतुक करणारे वाहन महसूल विभागाच्या पथकाने पकडले, कारवाईत वाहनासह एकुण १ लाख ५६ हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे. वाहनचालकावर मंगळवेढा पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

फिर्यादी मंडल अधिकारी धनंजय इंगोले यांना शनिवारी दि.२० जून रोजी तहसिलदार मदन जाधव यांचा कॉल आला. मुढवी येथील माण नदीपात्रातून बेकायदेशीर वाळू उपसा होत असल्याचे त्यांनी सांगितले. नंतर धनंजय इंगोले, कोतवाल वैष्णवी जाधव, ग्रामपंचायत शिपाई शत्रुघ्न जाधव हे तेथे गेल्यावर नदीपात्रात बिगर नंबरचे वाहन वाळू भरत असल्याचे निदर्शनास आले. पथकाला पाहून आरोपी तथा चालक विशाल ठेंगील हा पळून गेला. मात्र त्याच्या साथीदाराला पथकाने पाठलाग करून पकडले. यावेळी १ लाख ५० हजार रुपयांचे बिगर नंबरचे एक टमटम, ६ हजार रुपयांची एक ब्रास वाळू असा १ लाख ५६ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT



# अधिकारीगण करणार आठवड्याला चार शाळांची तपासणी

## अधिकाऱ्यांच्या कामकाजावर येणार नियंत्रण

## शिक्षण क्षेत्रात उडाली एकच खळबळ




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२० जून-**

शालेय शिक्षण विभागाने अधिकाऱ्यांच्या शाळा भेटीचे प्रयोजन आखले आहे. त्यानुसार राज्य, विभाग, जिल्हा आणि तालुका स्तरावरील अधिकाऱ्यांना आठवड्याला किमान चार शाळांची तपासणी करणे अनिवार्य करण्यात आले. अचानकपणे करण्यात येणाऱ्या या शाळा भेटीदरम्यान त्या-त्या शाळेतील शिक्षकवर्ग गैरहजर आढळल्यास त्यांच्यावर बिनपगारी रजा किंवा शिस्तभंगाची कारवाई केली जाणार आहे.

शाळांमधील शिक्षणाची गुणवत्ता उंचावणे, शिक्षकांची नियमित उपस्थिती सुनिश्चित करणे, विद्यार्थ्यांसाठी सुरक्षित व सक्षम शैक्षणिक वातावरण निर्माण करणे यांसारख्या उद्देशाने राज्य शासनाच्या शिक्षण विभागाने ही मोहीम हाती घेतली आहे. गतवर्षी अनेक अधिकाऱ्यांच्या शाळा भेटी अत्यल्प प्रमाणात झाल्याचे निदर्शनास आल्यानंतर शिक्षण आयुक्तालयाने हा निर्णय घेतला असल्याचे सांगण्यात येते.

या नवीन आदेशानुसार राज्यस्तरीय अधिकाऱ्यांना पंधरा दिवसांत किमान दोन, विभागीय आणि जिल्हास्तरीय अधिकाऱ्यांना दर आठवड्याला दोन, गटशिक्षणाधिकारी आणि विस्ताराधिकाऱ्यांना किमान तीन तर केंद्रप्रमुख आणि पोषण आहार अधीक्षकांना आठवड्याला चार शाळा भेटी बंधनकारक करण्यात आल्या आहेत.

या भेटी औपचारिक राहणार नाहीत, याची दक्षता घेणे बंधनकारक करण्यात आले आहे. विशेष म्हणजे, प्रत्येक भेटीचा अहवाल आणि छायाचित्रे 'सरल' पोर्टलवरील विशेष लिंकवर अपलोड करणे अनिवार्य करण्यात आले आहे. या निर्णयामुळे शिक्षण क्षेत्रात एकच खळबळ उडाली आहे. या तपासणीच्या अनुषंगाने पारदर्शकता वाढणार असून अधिकाऱ्यांच्या कामकाजावरही नियंत्रण राहणार असल्याचे सांगण्यात येते.

### विद्यार्थ्यांशी संवाद; शिक्षणाचा दर्जा

शिक्षक व विद्यार्थ्यांची उपस्थिती, अध्यापनाची गुणवत्ता, विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती, शाळेची स्वच्छता, पोषण आहाराची गुणवत्ता, प्रयोगशाळांचा वापर, क्रीडा व स्पर्धा परीक्षांची तयारी, विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी करण्यात आलेल्या उपाययोजनांची सखोल पडताळणी केली जाणार आहे. अधिकाऱ्यांना किमान एका वर्गातील तासिकेचे प्रत्यक्ष निरीक्षण करून विद्यार्थ्यांशी संवाद साधत शिक्षणाचा दर्जाही तपासावा लागणार आहे.

### सोलापूर जिल्ह्यात सुमारे दीड हजार शाळा

सोलापूर जिल्ह्यात जिल्हा परिषदेच्या २ हजार ७६५ शाळांसह खासगी अनुदानित प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक मिळून सुमारे दीड हजार शाळा आहेत. या नव्या व्यवस्थेमुळे शाळांमधील शैक्षणिक शिस्त, शिक्षकांची जबाबदारी आणि विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या शिक्षणाचा दर्जा सुधारण्यास मोठी मदत होईल, अशी अपेक्षा शिक्षण क्षेत्रातून व्यक्त होत आहे.





# 'वीज भारनियमन'च्या विरोधात शेतकऱ्यांनी रखरखत्या उन्हात काढला धडक मोर्चा

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२० जून-**

पंढरपूर विभागातील 'महावितरण'कडून सतत करण्यात येणाऱ्या वीज भारनियमनाच्या विरोधात आमदार अभिजीत पाटील यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांनी शनिवार, दि.२० जून २०२६ रोजी रखरखत्या उन्हात तहसील कार्यालयावर धडक मोर्चा काढून तीव्र संताप व्यक्त केला.

आमदार अभिजीत पाटील याप्रसंगी बोलताना म्हणाले, पाऊस नसल्यामुळे एका बाजूने निसर्गाने शेतकऱ्यांवर घाला घातला आहे, तर दुसऱ्या बाजूला विजेअभावी शेतकरी अक्षरशः हैराण झाला आहे. वादळी वाऱ्यामुळे झालेल्या नुकसानीतून शेतकरी बांधव अजूनही सावरलेला नाही.

ऊस, द्राक्षे, डाळिंब, केळी आदी पिके शेतात उभी असून पाणी वेळेवर मिळत नसल्याने करपू लागली आहेत. संध्याकाळी ६ ते पहाटे ४ वाजेपर्यंत वीजपुरवठा बंद ठेवण्याचे आदेश असल्याचे सांगण्यात येते. उर्वरित वेळेत नियोजन का होत नाही? असा सवालही त्यांनी उपस्थित केला. आज दुष्काळासारखी परिस्थिती असताना नदीतून पाणी उपसा करण्यासाठी केवळ दोन तास वीज देणे हा शेतकऱ्यांवरील अन्याय आहे. आज पिके उभी आहेत, आजच त्यांना पाण्याची गरज आहे. वेळ निघून गेल्यानंतर काहीच उपयोग होणार नाही, असेही ते म्हणाले.

### सौर उर्जेचा पर्याय; अधिकाऱ्यांना निवेदन

सततच्या भारनियमनसंदर्भात तहसीलदार सचिन लंगोटे, 'महावितरण'चे साळी यांच्याकडे निवेदन देण्यात आले. दरम्यान, शेतकऱ्यांनीही सौर ऊर्जेचा पर्याय स्वीकारण्यासाठी पुढाकार घ्यावा. सोलरसाठी अर्ज करावेत. अधिकाधिक सोलर प्रकल्प उभारल्यास डीपीवरील ताण कमी होण्यास मदत होणार आहे, असेही यावेळी सांगण्यात आले.

### पावसाळी अधिवेशनात लक्ष वेधणार

सततचे वीज भारनियमन, पिकांचे होणारे नुकसान आणि शेतकऱ्यांची होणारी अडचण याकडे येत्या पावसाळी अधिवेशनात आपण प्रश्न उपस्थित करत सभागृहाचे लक्ष वेधणार आहे, असेही आमदार अभिजीत पाटील यांनी यावेळी सांगितले.

### यांनीही केली आगपाखड

राष्ट्रवादी काँग्रेस उद्योग व्यापार सेलचे अध्यक्ष नागेश फाटे, शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष तानाजी बागल, जि.प.सदस्य संतोष बागल, पं.स.सदस्य शहाजी मुळे यांच्यासह बाळासाहेब देशमुख, भारत कोरके, अमित साळुंखे, सोमनाथ झांबरे, दीपक पवार, शशिकांत पाटील, अण्णा भुसनर, माऊली जवळेकर, दत्ता बागल, निवास भोसले, तुकाराम मस्के, दिनकर चव्हाण, समाधान गाजरे, धनंजय गुळमे आदींनी आपल्या भाषणातून सततच्या वीज भारनियमनच्या विरोधात आगपाखड केली.

# राजुरी ग्रामदैवत लक्ष्मीदेवीच्या मुर्तीवरील दागिन्यांची चोरी

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.२० जून-**



सांगोला तालुक्यातील राजुरी गावचे ग्रामदैवत माता लक्ष्मीदेवी मंदिर येथील लक्ष्मीदेवीच्या दगडी मुर्तीवरील सोन्याच्या व चांदीच्या दागिन्यांची चोरी झाली असल्याची घटना घडली. दरम्यान, तीन अनोळखी इसम हे दागिने चोरी करुन घेऊन जात असल्याचे मंदिराच्या 'सीसीटीव्ही'त कैद झाल्याचे सांगण्यात येते.

याबाबत मंदिराचे पुजारी रमेश भगवान गुरव यांनी फिर्याद दाखल केली. शुक्रवार, दि.१९ जून २०२६ रोजी सायंकाळची पूजाअर्चा करुन रात्री ८ वाजता मंदिर बंद करुन घरी गेलो होतो. शनिवार, दि.२० जून २०२६ रोजी पहाटे ५ वाजता नेहमीप्रमाणे मंदिर उघडण्यास आलो असता मंदिराचा दरवाजा उघडा असल्याचे दिसले. तेव्हा गावातील लोकांना बोलावून घेत आजूबाजूच्या परिसरात पाहणी केली. देवीच्या गाभाऱ्यात जाऊन पाहिले असता २ लाख १५ हजार रुपये किंमतीचा सोन्याचा मुलामा केलेला चांदीचा मुखवटा व डोळे, २२ हजार रुपये किंमतीचे देवीच्या अंगावरील मणीमंगळसूत्र, ४ हजार रुपये किंमतीचे पंचधातुचा घोडा असे एकूण २ लाख ४१ हजार रुपये किंमतीचे वस्तू चोरुन नेल्याचे स्पष्ट झाले, असेही फिर्यादीत म्हटले आहे.

## 'श्री.शारदेय गुरुकुल'मध्ये योग दिन साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि. २० जून-**

श्री शारदेय गुरुकुल पब्लिक स्कूलमध्ये १२ वा आंतरराष्ट्रीय योग दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. आबासाहेब राऊत व रोहित काळे यांनी योगाभ्यास शिकवला. सूर्यनमस्कार, वृक्षासन, ध्यान, वज्रासन, अनुलोम-विलोम, कपालभाती आदींचे प्रात्यक्षिक करुन दाखविण्यात आले. प्राचार्य प्रशांत होमकर यांनी योगाचे महत्त्व पटवून दिले. उपप्राचार्य शरद दादर यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते. याकामी श्री शारदेय गुरुकुल पब्लिक स्कूलचे चेअरमन बाळासाहेब देशमुख, सचिव हर्षवर्धन देशमुख, संचालक सूरज देशमुख, कार्यकारी संचालिका प्रियंका देशमुख यांचे मार्गदर्शन लाभले.

# केंद्रप्रमुख पदोन्नती परीक्षा न्यायालयीन कक्षेत

## सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांनुसार भरती प्रक्रिया

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० जून-**

जिल्हा परिषद शाळांमधील केंद्रप्रमुख पदोन्नतीसाठी राज्य परीक्षा परिषदेच्या माध्यमातून फ ेब्रुवारी महिन्यात घेण्यात आलेली विभागीय मर्यादित स्पर्धा परीक्षा पुन्हा एकदा चर्चेच्या केंद्रस्थानी आली आहे. या परीक्षेला मुंबई आणि नागपूर उच्च न्यायालयात आव्हान देण्यात आल्याने नियुक्ती प्रक्रियेबाबत शिक्षकांसह शिक्षण विभागाचे लक्ष लागले आहे.

केंद्रप्रमुख पदोन्नतीसाठी ३ आणि ४ फेब्रुवारी रोजी ऑनलाइन पद्धतीने परीक्षा घेण्यात आली होती. मात्र ही परीक्षा प्रक्रियेत पारदर्शकतेचा अभाव असल्याचा आरोप करत काही परीक्षार्थींनी न्यायालयात याचिका दाखल केली आहे. परीक्षेनंतर प्रश्नपत्रिका उपलब्ध करून न देणे, उत्तरतालिकेवर आक्षेप नोंदविण्याची संधी न देणे, विविध शिफ्टमध्ये परीक्षा घेण्यात आल्याने समानतेचा प्रश्न निर्माण झाल्याचा दावा याचिकाकर्त्यांनी केला आहे.

दुसरीकडे, शिक्षण विभागाकडून ही प्रक्रिया सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांनुसार राबविण्यात येत असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. शासन स्तरावर भरती व पदोन्नती प्रक्रिया कायदेशीर चौकटीत आणि पारदर्शक पद्धतीने पूर्ण करण्यासाठी आवश्यक कार्यवाही सुरु असल्याचे सांगितले जात आहे.

न्यायालयाच्या अंतिम निर्णयाच्या अधीन राहूनच पुढील प्रशासकीय प्रक्रिया राबविली जाणार असल्याचेही संबंधित सूत्रांकडून स्पष्ट करण्यात आले. केंद्रप्रमुख पदोन्नती प्रक्रिया ही केवळ प्रशासकीय बाब नसून शालेय शिक्षण व्यवस्थेच्या नेतृत्वाशी निगडित असल्याने न्यायालयीन निर्णयानंतर या प्रक्रियेची दिशा आणि परिणाम अधिक स्पष्ट होणार आहेत.

### न्यायालयीन सुनावणी, नियुक्तीची प्रक्रिया

काही जिल्हा परिषदांमध्ये विभागीय परीक्षेत यशस्वी ठरलेल्या शिक्षकांना केंद्रप्रमुख पदाचे नियुक्ती आदेश देण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. त्यामुळे न्यायालयीन सुनावणी आणि नियुक्ती प्रक्रिया यांचा समांतर प्रवास सुरु असल्याने या विषयाकडे शिक्षकांचे लक्ष लागले आहे.

### खोडसाळ परीक्षार्थींना न्यायालयाने फटकारले

सर्वोच्च न्यायालयाच्या अधिन राहून शासन स्तरावर सदर भरती प्रक्रिया पारदर्शकपणे पार पाडण्यात येत आहे. मात्र, काही खोडसाळ परीक्षार्थी यात खोडा घालण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यांना न्यायालयाने फटकारले आहे. हा विषय न्यायप्रविष्ठ असल्याचे मत केंद्रप्रमुख विभागीय स्पर्धा परीक्षेतील उत्तीर्ण उमेदवारांनी व्यक्त केले आहे.





# संजय राऊत यांच्या 'दहाव्या-अकराव्या' साठीचा खर्च आम्ही करु

## शिवसेनेचे जिल्हाप्रमुख काळजे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२० जून-**

शिवसेना उबाठाच्या कार्यकर्त्यांनी माजी खासदार संजय राऊत यांचा दहावा-अकरावा घालावा, त्या विधीसाठी काँग्रेसचे नेते राहुल गांधी व सोनिया गांधी यांना निमंत्रित करावे, त्यासाठीचा सर्व खर्च आम्ही शिवसैनिक करु, असा उपरोधिक सल्ला शिवसेनेचे जिल्हाप्रमुख मनिष काळजे यांनी दिला.

शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांशी प्रामाणिक राहून कार्य करणाऱ्या आणि गांधी परिवारासमोर कधीही न झुकलेल्या खऱ्या शिवसेनेच्या पाठीशी हे सहा खासदार आणि लाखो शिवसैनिक ठामपणे उभे आहेत. त्यामुळे त्यांच्या विरोधात अशा प्रकारचे आंदोलन करणे हे शिवसैनिकांच्या भावनांचा अपमान करणारे आहे.

स्वतःच्या राजकीय स्वार्थासाठी निष्ठेच्या नावाखाली राजकारण करणाऱ्यांनी इतरांना निष्ठा शिकवू नये. शिवसेनेच्या नावावर राजकारण करणाऱ्यांनी अशा प्रकारचे वेडे चाळे बंद करावेत. अशा आंदोलनांमुळे पक्षातील कार्यकर्त्यांमध्ये संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न होत असला तरी शिवसैनिक त्याला बळी पडणार नाहीत, असेही ते म्हणाले.

# एका दिवसात ३७ अधिकारी-कर्मचाऱ्यांना तब्बल १ लाख ३ हजारांचा दंड



## -तक्रारींच्या निपटाऱ्यात दिरंगाईचा जोरदार फटका

## -१५ लाख ५४ हजार ९३७ रुपयांची वसुली

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० जून-**

'आपली तक्रार' पोर्टल, 'माय सोलापूर' ॲप तसेच लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत अधिसूचित १३६ सेवांशी संबंधित अर्ज आणि तक्रारी प्रलंबित ठेवल्याप्रकरणी महापालिका आयुक्त डॉ.सचिन ओम्बासे यांच्या आदेशानुसार दंडात्मक कारवाईचा बडगा उगारण्यात आला आहे. याअंतर्गत एकाच दिवशी तब्बल ३७ कर्मचारी आणि अधिकाऱ्यांना एकूण १ लाख ३ हजार ६५० रुपयांचा दंड ठोठावण्यात आला. महापालिकेच्या इतिहासातील ही सर्वाधिक दंडात्मक कारवाई ठरली आहे. एकूण १५ लाख ५४ हजार ९३७ रुपयांचा दंड आकारण्यात आला आहे.

नागरिकांच्या समस्या तातडीने सोडविण्यासाठी महापालिकेकडून 'आपली तक्रार' पोर्टल आणि 'माय सोलापूर' ॲपची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. तसेच शासन निर्णयानुसार म हापालिकेच्या एकूण १३६ सेवा अधिसूचित करण्यात आल्या आहेत. या सेवांसाठी नागरिकांकडून मोठ्या प्रमाणावर ऑनलाइन अर्ज आणि तक्रारी दाखल होत आहेत.

या तक्रारी आणि अर्जांचे संबंधित विभागांनी विहित मुदतीत निराकरण करून त्याबाबतची अद्ययावत माहिती पोर्टलवर नोंदविण्याच्या सूचना आयुक्त डॉ.सचिन ओम्बासे यांनी वेळोवेळी दिल्या आहेत. मात्र, 'आपली तक्रार' पोर्टल, 'माय सोलापूर' ॲप तसेच लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत अनेक अर्ज आणि तक्रारी प्रलंबित असल्याचे आढावा बैठकीत निदर्शनास आले.

तक्रारी आणि अर्जांचा वेळेत निपटारा न करणे ही अत्यंत गंभीर बाब असून, त्यामुळे नागरिकांना विनाकारण मनस्ताप सहन करावा लागत असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. तसेच ही परिस्थिती कार्यालयीन शिस्तीला बाधा पोहोचविणारी आहे. याच पार्श्वभूमीवर मुदतीत तक्रारींचे निराकरण न करणाऱ्या संबंधित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांविरोधात दंडात्म क कारवाईचे आदेश आयुक्त डॉ. ओम्बासे यांनी दिले. उपायुक्त आशिष लोकरे यांच्या नियंत्रणाखाली ही कारवाई करण्यात आली असून, अधीक्षक रजाक पेंढारी यांच्या माध्यमातून सामान्य प्रशासन विभागाने प्रलंबित तक्रारींची माहिती संकलित केली. उपायुक्त आशिष लोकरे यांनी वेळोवेळी कारवाईचे आदेश काढले होते. दरम्यान, यापुढे नागरिकांनी नोंदविलेल्या तक्रारी आणि सेवांशी संबंधित अर्ज प्रलंबित राहिल्यास संबंधित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनाच जबाबदार धरले जाईल, असा स्पष्ट इशारा प्रशासनाने दिला आहे.

### ३७ कर्मचारी, अधिकारी यांना दंडाचा फटका

दि.२६ मे २०२६ रोजी ११ कर्मचारी आणि अधिकाऱ्यांना एकूण ४ हजार २०० रुपयांचा दंड ठोठावण्यात आला. तसेच लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत अर्जांचा वेळेत निपटारा न केल्याने २६ कर्मचारी आणि अधिकाऱ्यांना तब्बल ९९ हजार ४५० रुपयांचा दंड ठोठावण्यात आला. या दोन्ही कारवायांमधून एकाच दिवशी ३७ कर्मचाऱ्यांना दंडाचा फटका बसला आहे. त्यांच्याकडून एकूण १ लाख ३ हजार ६५० रुपये दंड वसूल करण्यात आला.

### असा आहे एकूण कारवाईचा तपशील

महापालिकेने तक्रारी प्रलंबित ठेवल्यास दंडात्मक कारवाईचा नियम कडकपणे लागू केला आहे. त्यानुसार आतापर्यंत करण्यात आलेल्या कारवाईचा तपशील याप्रमाणे, 'आपली तक्रार' अंतर्गत : ४ लाख ६९ हजार ४०० रुपये, लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत : ४ लाख ७७ हजार ५० रुपये, गैरवर्तन प्रकरणांत : ६ लाख ८ हजार ४८७ रुपये अशा प्रकारे अधिकारी आणि कर्मचाऱ्यांकडून एकूण १५ लाख ५४ हजार ९३७ रुपयांचा दंड आकारण्यात आला.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## ज्ञानामृत आनंदलहरी - १४७८

**व्याधितें दावी। सर्वेंचि हरवी।।**
**आप पृथ्वी कालवी। एकवाट।।**

योगाभ्यासकाची स्थिति योगाभ्यास अवस्थेत कशी होते, याचे वर्णन अदयापही भगवंत अर्जुनासमोर करीत आहेत. मुळबंध, जालंधर बंध, ओढियाणाबंध, अशा बंधमुद्रांनी शरीराच्या बाहयांगावर योगाभ्यासाची छाया पडते व आतल्या बाजुस चंचल मनोवृत्तीचा जोर कमी होऊ लागतो. मन शरीरभाव जाणण्याचे सोडते, कल्पना नाहीसी होते, प्रवृत्ती शीत होते. तहान, भूक राहत जाते. अपानवायू मुळबंधामुळे कोंडला जातो व तो माघारी फिरुन विस्तार पावतो. वर येत नसल्याने तो कोंडलेल्या जागी गुरगुरतो आणि मणिपूर चक्राला धडका देतो. अपानवायुची खवळलेली वावटळ देहरुपी घर ढवळून टाकते आणि बालपणापासून साठलेली घाण शरीराबाहेर घालवून देते. वात, पित्त, कफाचा ठावठिकाणा शिल्लक ठेवत नाही. हा उसळलेला अपानवायु रस, शुक्र, मांस, रक्त अशा सप्तधातूंना उलथून टाकतो. हाडांच्या गाभ्यातील मज्जासुध्दा बाहेर काढतो. वायुमार्गाची नाडी मोकळी होते. गात्रे शिथिल होतात.



नवशिक्या माणसाला मरणाची, रोगाची भिती वाटू लागते. पण भिण्याचे कांही कारण नाही. हे सांगतांना भगवंत म्हणाले, **व्याधितें दावी। सर्वेंचि हरवी।। आप पृथ्वी कालवी। एकवाट।।**. अर्थात, हा अपान वायु एखादेवेळी शरीरात व्याधी प्रकट करतो आणि लगेच नष्टही करतो. शरीरात असलेले कफपित्ताचे जलअंश आणि मांसमज्जादि पृथ्वीचे अंश कालवून एकवटतो. त्यावेळी दुसरीकडे वज्रासनाच्या उष्णतेने कुंडलिनी शक्ती जागृत होते.

नाभीच्या द्रोणात जखडलेली ही कुंडलिनी शक्ती वज्रासनाच्या चिमटयामुळे जागी होते. ही साडेतीन वेटोळे घातलेली कुंडलिनी वेटोळे सोडीत, नाभीकंदावर उभी राहते व आवेशाने तोंड सरते व सरळ वर येते. हदयकमलाच्या खालच्या बाजुस येऊन ठेपलेला अपानवायु कुंडलिनी शक्तीच्या तावडीत सापडतो. या वायुला ती मिठी घालुन पोटात घालते. शरीरातील प्रत्येक भाग ही कुंडलिनी पिंजुन काढते. नाकपुड्यातून वाहणाऱ्या वाऱ्याला आतल्या बाजुला वळवते. हा वायु वरुन खाली व खालचा अपानवायु खालून वर दाबला जातो. दोन्ही वायुच्या भेटीआड षटचक्राचे नुसते पदर उरतात. यानंतर ही कुंडलिनी शक्ती सुषुम्नानाडीजवळ राहते. प्राणवायू अग्नीतून बाहेर पडतो. पण शरीराच्या आंत बाहेर शीतलला करतो आणि पुर्वी हरवलेले गात्रातील सामर्थ्य पुन्हा भरु लागते. वर वर असणारा त्वचेचा कोरडा पापुद्रा धान्य कणातील तूसाप्रमाणे झडून जातो. शुध्द स्फटिकाच्या स्वयंभू लिंगाप्रमाणे योग्याच्या कांतीची शोभा दिसू लागते. योग्याचे शरीर म्हणजे मूर्तीमंत शांतीच आहे असे वाटू लागते. मुंगीचे मनोगत जाणण्याची, दूर दृष्टीने पाहण्याची ताकद त्या योग्याला प्राप्त होते. या योगसाधनेत देहातील पंचमहाभूतांचा नाश करण्याची ताकद असते. कुंडलिनी शक्तीचे स्वरुप ऐकल्यानंतर याचा अनुभव घ्यावा असे आपणाला वाटत असेल. हा अनुभव येण्यासाठी मानसिक तयारी बरोबर सदगुरु कृपाही असावी लागते हे विसरता कामा नये. हा विषय कठीण व गहन असला तरीही अत्यंत महत्वाचा आहे. हे आपल्या लक्षात येत असेलच. हा विषय समजून घेण्यासाठी मनाची एकाग्रता अत्यंत आवश्यक आहे. सदगुरुंच्या मार्गदर्शनाशिवाय हा योग साध्य होणे कठीण असते. म्हणून सदगुरुंकडून मार्गदर्शन व आशिर्वाद घेऊन या योगाभ्यासाला प्रारंभ करावा.

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

वार : रविवार,
दि. २१ जून २०२६
विक्रम संवत् २०८३ ।
शके -१९४८
संवत्सर - पराभव
मास - ज्येष्ठ शु. सप्तमी
ऋतु - ग्रीष्म ।
नक्षत्र- पू. फाल्गुनी(९.३०)
योग - सिद्धी (११.२०)
करण - विष्टी (२७.२४)
राहू काल : रविवार
सायं. ०४.३० ते ०६.००

दिनविशेष : * आंतरराष्ट्रीय योग दिन. * वर्षातील सर्वात मोठा दिवस.

१९४०: राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे (RSS) संस्थापक आणि पहिले सरसंघचालक डॉ. केशव बळीराम हेडगेवार यांचे निधन.

१९५८: प्रसिद्ध भारतीय हिंदी-मराठी अभिनेत्री रीमा लागू यांचा जन्म.

१९८४: प्रसिद्ध मराठी चित्रपट व नाट्य अभिनेते अरुण सरनाईक यांचे विमान अपघातात निधन.

# वारीतील सुविधांना गती

# ८१ ग्रामपंचायतींसाठी साडेचार कोटींचा निधी

### वारकऱ्यांच्या सेवेसाठी गावागावांत तयारीला वेग; पाणी, स्वच्छता, शौचालये व प्रकाश व्यवस्थेवर भर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२० जून-**

आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर लाखो वारकऱ्यांना अधिक चांगल्या आणि सुरक्षित सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी जिल्ह्यातील पालखी मार्गावरील ८१ ग्राम पंचायतींना साडेचार कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. या निधीच्या माध्यमातून ग्रामपंचायतींना पिण्याचे पाणी, स्वच्छता, तात्पुरती शौचालये, प्रकाश व्यवस्था, कचरा व्यवस्थापन आणि आरोग्य सुविधा उभारण्यास मोठा हातभार लागणार आहे.



यंदाच्या आषाढी वारीत वारकऱ्यांची संख्या वाढण्याची शक्यता लक्षात घेऊन प्रशासनाने पूर्वतयारीला वेग दिला आहे. जिल्हा परिषद ग्रामपंचायत विभागामार्फत मंजूर झालेला निधी लवकरच संबंधित ग्राम पंचायतींना वितरित केला जाणार असून, निधी मिळताच आवश्यक कामांना तातडीने सुरुवात करण्यात येणार आहे.

संत ज्ञानेश्वर महाराज, संत तुकाराम महाराज यांच्यासह विविध मानाच्या पालख्या जिल्ह्यातील अनेक गावांमधून मार्गक्रमण करतात. या काळात गावांमध्ये वारकऱ्यांची मोठी गर्दी होत असल्याने मूलभूत सुविधांवर मोठा ताण येतो. त्यामुळे प्रत्येक ग्रामपंचायतीला गरजेनुसार पाच लाखांपासून दहा लाख रुपयांपर्यंत निधी देण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

या निधीच्या माध्यमातून पालखी मार्गावरील गावांमध्ये स्वच्छ आणि सुरक्षित वातावरण निर्माण करण्यावर भर दिला जाणार आहे.

विशेषतः पिण्याच्या पाण्याची उपलब्धता, स्वच्छतागृहांची उभारणी, रस्त्यांवरील प्रकाश व्यवस्था, कचरा संकलन व विल्हेवाट आणि प्राथमिक आरोग्य सुविधा सक्षम करण्यासाठी निधीचा वापर होणार आहे.

जिल्हा परिषद प्रशासनाच्या मते, वारकऱ्यांना कोणतीही गैरसोय होऊ नये आणि वारीचा अनुभव अधिक सुसज्ज व सुविधायुक्त व्हावा, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांच्या मार्गदर्शनाखाली निधी वाटपाची प्रक्रिया पूर्ण केली जाणार असून, ग्रामपंचायतींना वेळेत निधी मिळाल्यानंतर वारीपूर्वी बहुतांश सुविधा कार्यान्वित करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. यंदाची आषाढी वारी केवळ भक्तीची नव्हे तर सुयोग्य नियोजन आणि सक्षम ग्रामव्यवस्थापनाचीही ठरणार असल्याचे चित्र दिसत आहे.

# 'उंदरगाव'मध्ये उभारली शाश्वत विकासाची गुढी

**तभा वृत्तसेवा,**
**जेऊर, दि. २० जून-**

उंदरगाव (ता.करमाळा) हे पुनर्वसित विभागातील गाव असून हे गाव पूर्वी शासनाच्या विविध योजना पासून वंचित राहिलेले होते परंतु मागील वर्षी करमाळा येथील विद्या विकास मंडळाचे यशवंतराव चव्हाण महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजना +२ स्तर व करमाळा तहसील कार्यातील कर्तव्यदक्ष तहसीलदार शिल्पा ठोकडे तसेच करमाळा येथील डीवायएसपी अंजना कृष्णा तसेच करमाळा पोलीस स्टेशनचे पीआय रणजीत माने व करमाळा येथील गटविकास अधिकारी डॉ. अमित कदम, गटशिक्षण अधिकारी नितिन कदम, बालविकास अधिकारी किरण सूर्यवंशी आणि ग्रामपंचायत उंदरगाव यांच्या संयुक्त विद्यमाने युवकाचा ध्यास ग्राम व शहर विकास हे ब्रीद वाक्य घेऊन शिबिराचे आयोजन करण्यात आलेले होते आणि या कालावधीमध्ये या गावांमध्ये स्वच्छता अभियान, वृक्षलागवड, प्लास्टिक मुक्तगाव, मतदान जनजागृती, आरोग्य शिबिर, घनकचरा व्यवस्थापन यासारख्या उपक्रमाचा शुभारंभ केलेला होता.



मुख्यमंत्री समृद्ध अभियानाच्या माध्यमातून सोलापूर जिल्ह्याचे ग्रामीण विभागाचे पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांच्या माध्यमातून CSR फंडाच्या माध्यमातून या गावाचा चेहरा मोहरा बदलला गेला कारण या गावांमध्ये असणारी जिल्हा परिषदेची शाळा या शाळेसाठी असणाऱ्या भौतिक सुविधा सोलर सीसीटीव्ही कॅमेरे याबरोबरच या गावांमध्ये आवश्यक असणाऱ्या इतर शासकीय कार्यालयामध्ये सुद्धा सौरशक्तीचा वापर करण्यात आलेला आहे व सोलापूर जिल्हा ग्रामीण पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांच्या सहकार्यातून या गावांमध्ये अमुलाग्र अशा प्रकारचे बदल झाले. पोलिस अधीक्षक कुलकर्णी यांच्या सहकार्यातून गावामध्ये ४ हजारांपेक्षा अधिक वृक्ष लागवड करण्यात आली.

गावातील तरुण आणि आबाल वृद्धांना व्यायामाची आवड निर्माण व्हावी यासाठी ओपन जिमची व्यवस्था ही गावांमध्ये निर्माण करण्यात आलेली आहे तसेच कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली ४०० पेक्षा अधिक महिला व पुरुषाचे अशा प्रकारचा आरोग्य शिबिराचे आयोजन करून त्या व्यक्तींना मोठ्या प्रमाणामध्ये या आरोग्य शिबिराचा फायदाही झालेला आहे अशा प्रकारचे अनेक नाविन्यपूर्ण उपक्रम मुख्यमंत्री समृद्ध अभियानाच्या माध्यमातून उंदरगाव मध्ये राबवले गेले आणि या संपूर्ण अभियानामध्ये लोक सहभाग मोठ्या प्रमाणामध्ये निर्माण झाला लोकसभागाच्या माध्यमातून गावामध्ये नाविन्यपूर्ण अशा प्रकारचे उपक्रम राबवले गेले आणि त्यामुळे आज उंदरगाव आदर्श ग्राम म्हणून महाराष्ट्रातील अनेक गावे उंदरगावकडे पाहत आहेत.

अशी उंदरगावचे ग्रामविकास अधिकारी यशवंत कुदळे उंदरगावचे सरपंच उपसरपंच व सर्व ग्रामपंचायत सदस्य यांनी दिली.

## मावा मागण्याच्या कारणावरून डोक्यात फरशी घालून केले जखमी

**सोलापूर, दि. २० जून-**

मावा मागण्याच्या किरकोळ कारणावरून वाद घालून तरुणाच्या डोक्यात फरशी मारून गंभीर जखमी केल्याची आणि इतरांना विटा-पाईपने मारहाण केल्याची घटना कल्याण नगर भाग-१ (जुळे सोलापूर) येथे १८ जून रोजी रात्री ७:३०च्या सुमारास घडली.दरम्यान याप्रकरणी विजापूर नाका पोलीस ठाण्यात दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शुभम नडगिरी आणि आदित्य सावंत (दोघे रा. सोलापूर) अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपींची नावे असून याबाबत संतोषी सिद्धाराम भासगीकर (वय ३६) यांनी फिर्याद दिली आहे. यातील फिर्यादीचे पती कल्याण नगर येथे बसले असताना आरोपींनी मावा मागण्याच्या कारणावरून वाद उकरून काढला आणि त्यांच्या डोक्यात फरशी मारून गंभीर जखमी केले. मध्यस्थी करणाऱ्या किसन यांना पाईपने मारहाण केली, मधुमती यांना हाताने ढकलून दिले, तर पवन आणि समर्थ यांना विटांनी मारहाण केली. आरोपीने समर्थ यांच्या डोळ्याच्या वरच्या बाजूला चावा घेतला. तसेच "पोलीसांत तक्रार दिली तर तुमच्याविरुद्ध ॲट्रॉसिटीचा गुन्हा दाखल करेन" अशी आरोपींनी धमकीही दिल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक मोरे-पाटील हे गुन्ह्याचा पुढील तपास करत आहेत.



# ऑर्किड महाविद्यालयात योग दिन साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० जून-**

तळे हिप्परगा येथील ऑर्किड अभियांत्रिकी महाविद्यालयात भारत सरकारच्या उच्च शिक्षण मंत्रालय आणि आयुष मंत्रालयाच्या निर्देशानुसार 'आंतरराष्ट्रीय योग दिन' उत्साहात साजरा करण्यात आला. या पार्श्वभूमीवर महाविद्यालयात विशेष योग सत्राचे (धेसर डर्शीोळेप) आयोजन करण्यात आले होते.

या सत्राला योगशिक्षक प्रा. अजित कलागते आणि क्रीडा मार्गदर्शक प्रा. सचिन गायकवाड यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. मार्गदर्शन करताना प्रा. कलागते यांनी बदलती जीवनशैली, ताणतणावाचे व्यवस्थापन आणि योगाचे महत्त्व यावर प्रकाश टाकला. याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. एस. एस. मेहता आणि उपप्राचार्य डॉ. विनायक पत्की यांच्या हस्ते योग मार्गदर्शक प्रा. अजित कलागते यांचा सन्मान करण्यात आला. प्रास्ताविक प्रा. एस. आर. निरंतर यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी क्रीडा समन्वयक प्रा. एस. जमादार, प्रा. ऋचा श्रीराम, वामन पवार, प्रमोद लिगाडे आणि दादा पांगळे यांनी परिश्रम घेतले.



# श्री स्वामी समर्थ संस्थेतर्फे शैक्षणिक साहित्याचे वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.२० जून-**

श्री स्वामी समर्थ बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, बार्शी यांच्यावतीने गरजू शालेय विद्यार्थ्यांना वही, पुस्तके व दप्तर वाटप कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी आणि शिक्षणाला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाला मान्यवर, पालक, शिक्षक व स्वामीभक्तांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाची सुरुवात श्री स्वामी समर्थ महाराजांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करुन करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पी. टी. पाटील हे होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून प्रतापराव जगदाळे तसेच ढाळे पिंपळगाव येथील दत्त महाराज उपस्थित होते. संस्थेचे सचिव शिंदे प्रास्ताविक केले. अध्यक्षीय भाषण पी. टी. पाटील यांनी संस्थेच्या सामाजिक कार्याचे कौतुक करत अशा उपक्रमांमुळे गरजू विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रेरणा मिळत असल्याचे सांगितले. तसेच समाजातील सक्षम घटकांनीही अशा कार्यात योगदान देण्याचे आवाहन केले.

# राज्यस्तरीय कृषी पुरस्कारांमध्ये जिल्ह्यातील चार शेतकऱ्यांची निवड

## कृषी क्षेत्रात सोलापूरचा झेंडा

### मंद्रूपच्या शिवानंद शिंगडगाव यांना कृषीभूषण पुरस्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२० जून-**

राज्य शासनाने जाहीर केलेल्या सन २०२३ च्या प्रतिष्ठेच्या कृषी पुरस्कारांमध्ये सोलापूर जिल्ह्याने मानाचा तुरा रोवला आहे. माढा तालुक्यातील बैरागवाडी, पंढरपूर तालुक्यातील बार्डी, दक्षिण सोलापूर तालुक्यातील मंद्रूप आणि निम्बर्गी येथील शेतकऱ्यांची विविध राज्यस्तरीय कृषी पुरस्कारांसाठी निवड झाली असून, त्यांच्या कार्याची राज्यस्तरावर दखल घेण्यात आली आहे.

प्रणव बिराजदार निम्बर्गी ता. दक्षिण सोलापूर सोलापूर वसंतराव नाईक शेतीनिष्ठ पुरस्कार, प्रवीण माने माढा, वसंतराव नाईक शेती मित्र पुरस्कार, युवा शेतकरी पुरस्कार राहुल बनकर पंढरपूर, उद्यान पंडित पुरस्कार सदाशिव चौगुले सांगोला, वसंतराव नाईक कृषिभूषण पुरस्कार सदाशिव शिंगडगाव मंद्रूप ता. दक्षिण सोलापूर यांना पुरस्कार जाहीर झाले आहेत. विशेष म्हणजे, दक्षिण सोलापूर तालुक्यातील मंद्रूप येथील प्रगतशील शेतकरी शिवानंद शिंगडगाव यांना राज्यातील प्रतिष्ठेचा कृषिभूषण पुरस्कार जाहीर झाला आहे. आधुनिक शेती तंत्रज्ञानाचा वापर, उत्पादनवाढीसाठी केलेले प्रयोग आणि इतर शेतकऱ्यांसाठी प्रेरणादायी ठरलेले कार्य यामुळे त्यांची या पुरस्कारासाठी निवड झाल्याचे सांगितले जात आहे.

कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाने नुकताच शासन निर्णय जारी करून सन २०२३ च्या विविध कृषी पुरस्कारांना मंजुरी दिली आहे. राज्यातील कृषी, फलोत्पादन आणि कृषी संलग्न क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या शेतकरी, व्यक्ती, गट आणि संस्थांचा या पुरस्कारांद्वारे गौरव करण्यात येणार आहे.

सोलापूर जिल्ह्यातील चार शेतकऱ्यांना मिळालेल्या या सन्मानामुळे जिल्ह्याच्या कृषी क्षेत्राला नवी ओळख मिळाली आहे. कमी पर्जन्यमान आणि दुष्काळी परिस्थितीवर मात करत आधुनिक शेती, जलव्यवस्थापन आणि पीकपद्धतीतील नवकल्पना राबविणाऱ्या शेतकऱ्यांच्या यशाची राज्य शासनाने घेतलेली दखल इतर शेतकऱ्यांसाठीही प्रेरणादायी ठरणार आहे.

# ...अन्यथा पाणी टंचाई संकटाचा धोका

पावसाची वाट पाहत आकाशाकडे डोळे लावून बसलेला शेतकरी आणि नळाला पाणी कधी येणार याची चिंता करणारा सामान्य नागरिक, हे चित्र महाराष्ट्रासाठी काही नवीन नाही. दरवर्षी उन्हाळा आला की पाण्याचा प्रश्न ऐरणीवर येतो. मात्र यंदा परिस्थिती थोडी वेगळी आहे. हवामान तज्ज्ञांनी एल निनोच्या प्रभावामुळे मान्सूनला विलंब होण्याची शक्यता वर्तवली आहे. त्यामुळे पावसाचा लहरीपणा वाढू शकतो आणि ग्रामीण भागात पाणीटंचाईचे संकट अधिक गडद होऊ शकते.

याच पार्श्वभूमीवर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांनी ग्रामपंचायती आणि नागरिकांना वेळेवर सावध राहण्याचे आवाहन केले आहे. खरं तर पाणीटंचाईचा प्रश्न निर्माण झाल्यानंतर धावपळ करण्यापेक्षा आधीच नियोजन करणे अधिक शहाणपणाचे ठरते. कारण पाण्याची कमतरता ही फक्त तहान भागवण्यापुरती मर्यादित नसते. तिचा परिणाम शेती, पशुधन, आरोग्य, शिक्षण आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेवरही होतो.



आपल्या गावात एखादी विहीर कोरडी पडली की तिची किंमत समजते. नळाला दोन दिवस पाणी आले नाही की पाण्याचे महत्त्व लक्षात येते. पण जेव्हा जलसाठा भरलेला असतो, तेव्हा आपण नकळत पाण्याचा अपव्यय करत असतो. कुणी वाहन धुण्यासाठी पिण्याचे पाणी वापरतो, कुणी अंगण धुतो, तर कुणी नळ सुरू ठेवून इतर कामात गुंततो. हा अपव्यय दिसायला छोटा वाटत असला तरी हजारो लोक असेच वागले तर लाखो लिटर पाणी वाया जाते.

पाणीटंचाई टाळण्यासाठी प्रशासनाने अनेक सूचना दिल्या आहेत. ग्रामपंचायतींनी गावातील जलस्रोतांची नियमित पाहणी करावी, विहिरी, बोअरवेल आणि पाणीपुरवठा योजना कार्यान्वित ठेवाव्यात, गळती तात्काळ दुरुस्त करावी, पाणी चोरी रोखावी आणि जनजागृतीवर भर द्यावा, असे स्पष्ट करण्यात आले आहे. या सूचना केवळ सरकारी कागदावर राहू नयेत, तर त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. आजही अनेक गावांमध्ये पाणीपुरवठा योजनांमधून मोठ्या प्रमाणावर पाणी गळतीमुळे वाया जाते. एखादी पाईपलाईन फुटलेली असते, नळ खराब असतो किंवा अनधिकृत जोडण्या घेतलेल्या असतात. ही समस्या केवळ प्रशासनाची नाही, तर गावकऱ्यांचीही आहे. कारण सार्वजनिक मालमत्तेचे रक्षण करण्याची जबाबदारी सर्वांची असते. गावातील प्रत्येक नागरिकाने पाणी वाचवण्याची मानसिकता तयार केली, तर टंचाईची तीव्रता मोठ्या प्रमाणावर कमी होऊ शकते.

दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे पावसाच्या पाण्याचे संवर्धन. आपल्याकडे पाऊस कमी पडतो असे नाही, पण पडणारे पाणी साठवण्याची आणि जमिनीत मुरवण्याची व्यवस्था अपुरी आहे. पावसाचे पाणी वाहून जाऊ न देता ते अडवणे, शेततळी, बंधारे, जलसंधारणाची कामे आणि रेन वॉटर हार्वेस्टिंग यासारख्या उपाययोजना आता पर्याय नसून गरज बनल्या आहेत. भविष्यातील पाण्याची सुरक्षितता याच उपायांवर अवलंबून असणार आहे. गावांमध्ये दवंडी देऊन किंवा ग्रामसभांमधून पाणी बचतीचे महत्त्व पटवून देण्याच्या सूचनाही प्रशासनाने दिल्या आहेत. 'पाणी आहे तितकेच वापरा, पाणी वाचवा' हा संदेश प्रत्येक घरापर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. शाळा, अंगणवाडी, महाविद्यालये आणि शासकीय कार्यालयांनीही यात पुढाकार घेतला पाहिजे. कारण पाणी वाचवण्याची सवय बालपणापासून लागली तरच भविष्यात सकारात्मक बदल घडू शकतो.

**जिल्हा परिषदेतून**
**यशवंत गुरव**
**मो. ८८८८६५०७५५**

खरं तर पाणी हा विषय केवळ शासनाचा किंवा ग्रामपंचायतींचा नाही. तो प्रत्येक घराशी आणि प्रत्येक व्यक्तीशी संबंधित आहे. घरातील एखादा नळ गळत असेल तर तो तात्काळ दुरुस्त करणे, आवश्यक तेवढेच पाणी वापरणे, वापरलेले पाणी पुन्हा उपयोगात आणणे आणि पाण्याचा अपव्यय करणाऱ्यांना समज देणे, ही प्रत्येकाची जबाबदारी आहे.आज आपण सावध राहिलो तर उद्याचे संकट टाळू शकतो. अन्यथा पाण्याच्या एका टँकरसाठी रांगा, विहिरीच्या तळाशी उतरलेली माणसे आणि पाण्यासाठी होणारे वाद ही दृश्ये पुन्हा पाहावी लागू शकतात. म्हणूनच वेळ अजून गेलेली नाही. पाण्याचा प्रत्येक थेंब अमूल्य आहे, हे लक्षात घेऊन त्याचा जपून वापर करणे हीच खरी काळाची गरज आहे. कारण शेवटी एक गोष्ट कायम लक्षात ठेवावी लागेल. पाणी वाचवणे म्हणजे फक्त पाणी वाचवणे नाही, तर भविष्यातील जीवन वाचवणे आहे.

## महत्वाचे...



### प्रवेश प्रक्रिया सुलभ करण्यासाठी 'सिंहगड'चे मार्गदर्शन केंद्र विद्यार्थ्यांच्या सेवेत

**सोलापूर, दि. २० जून-**

विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण संस्थांची माहिती, प्रवेश प्रक्रिया, शैक्षणिक अभ्यासक्रम तसेच करिअरविषयक मार्गदर्शन एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालय आणि सिंहगड पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू करण्यात आलेल्या प्रवेश मार्गदर्शन केंद्राचे उद्घाटन आज, शुक्रवार दि. १९ जून रोजी सिंहगड इन्स्टिटयूटच्या सीआरटीडीचे संशोधन संचालक तथा माजी कुलगुरू प्रा. एस. एच. पवार यांच्या हस्ते करण्यात आले. सोलापूर शहरातील मध्यवर्ती ठिकाणी रेल्वे स्टेशन लाईन डीआरएम कार्यालयाजवळ, दंडवते महाराज मठाशेजारी व बँक ऑफ इंडिया समोर हे प्रवेश मार्गदर्शन केंद्र सुरू करण्यात आले आहे. यावेळी सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शंकर नवले, उपप्राचार्य डॉ. आर. टी. व्यवहारे, सिंहगड पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजच्या प्राचार्या शाहीन शेख, उपप्राचार्य प्रकाश नवले, डॉ. किरण पाटील, डॉ. विजय बिरादार, डॉ. एस. एस. शिरगण, प्रा. फरीद वळसंगकर, प्रा. एच. टी. गुरमे, प्रा. रुपाली चव्हाण, प्रा. अलीम शेख, प्रा. सुवर्णा क्षीरसागर, प्रा. श्रीकांत जगताप तसेच जनसंपर्क अधिकारी रामकृष्ण लांबतुरे उपस्थित होते.



### 'ए. जी. पाटील'च्या विद्यार्थ्यांकडून 'सोलर पॉवर ऑडिट प्रणाली' विकसित

**सोलापूर, दि. २० जून-**

सौरऊर्जा निर्मितीवर परिणाम करणाऱ्या विविध घटकांचे रिअल-टाइम निरीक्षण आणि कार्यक्षम ऊर्जा लेखापरीक्षण करण्यासाठी ए. जी. पाटील इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजीच्या इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन विभागातील अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांनी AWS क्लाउड-आधारित अत्याधुनिक सोलर पॉवर ऑडिट प्रणाली' विकसित केली आहे. संस्थेच्या संशोधन व विकास विभागाच्या मार्गदर्शनाखाली प्रशांत बशेट्टी, समर्थ बेत्रीसूर आणि अभिषेक खैराते या विद्यार्थ्यांनी हा प्रकल्प यशस्वीपणे पूर्ण केला आहे. आधुनिक IoT तंत्रज्ञान, क्लाउड कंप्युटिंग आणि डेटा ॲनॅलिटिक्सचा वापर करून ही स्मार्ट प्रणाली तयार करण्यात आली आहे. या प्रणालीमध्ये ESP३२ मायक्रोकंट्रोलर आणि विविध सेन्सर्सचा वापर करून व्होल्टेज, करंट, तापमान व आर्द्रता यांसारख्या घटकांचे रिअल-टाइम निरीक्षण केले जाते. हा सर्व डेटा क्लाउडवर पाठवून त्याचे विश्लेषण व व्हिज्युअलायझेशन केले जाते. यामुळे सौर पॅनेलची कार्यक्षमता, ऊर्जेतील बदल आणि तांत्रिक बिघाड यांची अचूक माहिती वेळेत उपलब्ध होते, ज्यामुळे देखभालीचा खर्च कमी होऊन ऊर्जा उत्पादकता वाढण्यास मदत होते. हा प्रकल्प विभागाचे प्रमुख डॉ. आर. व्ही. दरेकर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि डॉ. एस. आर. साखरे यांच्या सहकार्याने पूर्ण झाला आहे. विद्यार्थ्यांच्या या अभिनव संशोधनाबद्दल संस्थेचे अध्यक्ष एस. ए. पाटील, सचिव एस. एस. पाटील, सचिव एस. एस. पाटील, कॅम्पस डायरेक्टर डॉ. एम. ए. चौगुले आणि प्राचार्य डॉ. व्ही. व्ही. पोतदार यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.



### एमएचटी-सीईटी परीक्षेत नीरज डोंगरे यांचे यश

**पंढरपूर, दि.२० जून-**

नुकत्याच जाहीर झालेल्या एमएचटी-सीईटी परीक्षेच्या निकाल जाहीर झाला. या मध्ये नीरज दिपक डोंगरे याने ८७ पर्सेंटाइल गुण मिळवत घवघवीत यश संपादन केले आहे. नीरजच्या या यशाबद्दल त्याचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.नीरजच्या या यशाबद्दल त्याचा सत्कार येथील राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते नागेश फाटे यांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी ताऊ डोंगरे, दिपक डोंगरे, भास्कर गायकवाड, कांचेश्वर बचूटे, नवनाथ फाटे, निवृत्ती पाटील आणि विनय शिंदे उपस्थित होते.

### कर्मयोगी विद्यानिकेतनमध्ये योग दिन साजरा

**पंढरपूर, दि. २० जून-**

येथील नामांकित शिक्षण संस्था 'कर्मयोगी विद्यानिकेतन' मध्ये आंतरराष्ट्रीय योग दिन अत्यंत उत्साहात आणि चैतन्यमय वातावरणात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये आणि कर्मचाऱ्यांमध्ये आरोग्याविषयी जनजागृती निर्माण करणे आणि योगाचे महत्त्व पटवून देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.

या विशेष कार्यक्रमासाठी लायन्स क्लबचे प्रसिद्ध योगाचार्य वसंतराव कुलकर्णी उपस्थित होते. त्यांच्यासोबत योगतज्ज्ञ योगी शिक्षिका खिस्ते आणि कोळवले यांनीही उपस्थित राहून सर्वांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाची सुरुवात योगाचार्यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाली. श्री पांडुरंग प्रतिष्ठानचे विश्वस्त रोहन परिचारक यांनी सर्वांना योग दिनाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी शाळेच्या माननीय प्राचार्या प्रियदर्शिनी सरदेसाई उपस्थित होते.

# जि.प. शाळेची दुरवस्था; संतप्त महिलांकडून ग्रामपंचायतीला टाळे

### एकाच शिक्षकावर ६० विद्यार्थ्यांचा पडतोय भार

### ग्रामसेवकाच्या अरेरावीमुळे महिला आक्रमक

## तडवळे येथील घटना; पिण्याच्या पाण्यासाठी चिमुरड्यांची भटकंती



**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. २० जून-**

बार्शी तालुक्यातील तडवळे येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील मूलभूत सुविधांचा प्रश्न आता ऐरणीवर आला आहे. शाळेमध्ये पिण्याच्या पाण्याची सोय नसणे, शिक्षकांची तीव्र कमतरता आणि विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेकडे प्रशासनाकडून सातत्याने होणारे दुर्लक्ष यामुळे स्थानिक ग्रामस्थांचा संयम सुटला आहे. वारंवार पाठपुरावा करूनही कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याने, अखेर गुरुवारी गावातील संतप्त महिलांनी थेट तडवळे ग्रामपंचायत कार्यालयाला टाळे ठोकून प्रशासकीय उदासीनतेचा तीव्र निषेध केला.

तडवळे येथील या शाळेत सध्या सुमारे ६० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. मात्र, धक्कादायक बाब म्हणजे संपूर्ण शाळेचा डोलारा केवळ एकाच शिक्षकावर अवलंबून आहे. यामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेवर आणि भवितव्यावर अत्यंत वाईट परिणाम होत असल्याची तीव्र तक्रार पालकांनी केली आहे. शाळेत विद्यार्थ्यांना पिण्यासाठी साधे स्वच्छ पाणीही उपलब्ध नाही. त्यामुळे लहान मुलांना भर उन्हात पाण्यासाठी शाळेबाहेर भटकावे लागते. शाळेला संरक्षक भिंत नाही. शाळा परिसरात जागोजागी धोकादायक खड्डे पडले आहेत. मूलभूत सुविधांअभावी विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर बनत चालला आहे.

#### गटविकास अधिकाऱ्यांची मध्यस्थी; प्राथमिक उपाययोजना सुरू

ग्रामपंचायतीला टाळे ठोकल्यानंतर आंदोलक महिलांनी थेट गटविकास अधिकाऱ्यांशी दूरध्वनीवरून संपर्क साधला. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून गटविकास अधिकाऱ्यांनी तातडीने ग्रामसेवक यशवंत तळेकर यांना तडवळे येथे जाण्याचे निर्देश दिले. ग्रामसेवकांनी घटनास्थळी पोहोचून शाळेची पाहणी केली असून, सध्या प्राथमिक स्तरावर पिण्याच्या पाण्यासह इतर अत्यंत आवश्यक सुविधांच्या कामाला सुरुवात केली आहे. मात्र, जोपर्यंत शाळेच्या सर्व समस्यांवर कायमस्वरूपी तोडगा निघत नाही, तोपर्यंत आमचा लढा सुरूच राहील,'असा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

#### अधिकाऱ्यांची उद्धट भाषा अन आंदोलनाचा भडका

गंभीर समस्यांबाबत गावातील महिलांनी संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांकडे अनेकदा लेखी व तोंडी पाठपुरावा केला होता. मात्र, प्रशासनाने याची साधी दखलही घेतली नाही. उलट, ग्रामसेवकांनी महिलांशी बोलताना अत्यंत उद्धटपणाची आणि अरेरावीची भाषा वापरल्याचा आरोप महिलांनी केला आहे. अधिकाऱ्यांच्या या बेजबाबदार आणि अपमानास्पद वागणुकीमुळे महिलांचा संताप अनावर झाला आणि त्यांनी थेट ग्रामपंचायत कार्यालय गाठून त्याला टाळे ठोकले.

## सांगोल्यातील रस्त्यांसाठी सात कोटींचा निधी

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. २० जून-**



सांगोला विधानसभा मतदारसंघातील रस्त्यांच्या विकासासाठी आ.डॉ.बाबासाहेब देशमुख यांच्या सातत्याने केलेल्या पाठपुराव्यामुळे ७ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. हा निधी तालुक्यातील विविध गावांमधील मुख्य रस्ते, उपरस्ते आणि खेड्यांतील जोड रस्त्यांच्या सुधारणेसाठी वापरला जाणार आहे. ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांच्याकडे आ.डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी सदरचा निधी उपलब्ध करून द्यावा ही मागणी अर्थसंकल्पीय अधिवेशनापूर्वी केली होती.

शिरभावी-मांजरी-सावे-इमडेवाडी रस्ता, भोपसेवाडी-मानेवाडी रस्ता, घेरडी येथील मानेवस्ती ते ग्रामा १९० रस्ता, ढोलेमळा रस्ता ते संगेवाडी, इजिमा ५५ ते मेडशिंगी रस्ता, सोनंद येथील मासाळवस्ती ते आगलावेवाडी रस्ता, गौडवाडी-जुजारपूर-गुणाप्पाचीवाडी-वाळेखिंडी ते जि.हद्द रस्ता, हतीद ते ह.मंगेवाडी रस्ता, पाचेगांव बु. ते किडबिसरी रस्ता, कोळे ते बाणुरगड रस्ता, महुद ते हलदहीवडी येथील इजिमा ९१ रस्ता, रामा १२४ ते शिवणे म्हसोबा देवस्थान येथील प्र.१८२ रस्ता, शिवणे येथील घाडगेवस्ती ते हलदहिवडी रस्ता, वाकी घेरडी येथील निमग्रेवाडी ते कडलास रस्ता या कामांना प्रत्येकी ५० लाख असे एकूण ७ कोटींचा निधी मंजूर करण्यात आला आहे. सदरचा निधी मंजूर केल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, पालकमंत्री जयकुमार गोरे यांचे आ.डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी आभार मानले.

## 'महावितरण'च्या आश्वासनानंतर मोडनिंबचे आंदोलन तात्पुरते स्थगित

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि. १९ जून-**

मोडनिंब व परिसरातील प्रलंबित वीजप्रश्नांबाबत महावितरण कंपनीने सकारात्मक भूमिका घेतल्याने २० जून रोजी राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६५ वर प्रस्तावित रस्तारोको आंदोलन तात्पुरते स्थगित केले आहे. या संदर्भात जिल्हा परिषद सदस्या वंदना शिवाजी कांबळे यांनी महावितरण प्रशासनाकडे पाठपुरावा केला होता.

महावितरण कंपनीने अरण, भेंड, वरवडे आणि सोलंकरवाडी या उपकेंद्रांमध्ये नवीन ५ एमव्हीए क्षमतेचे वाढीव ट्रान्सफॉर्मर बसविले आहेत. परिते उपकेंद्रात १० एमव्हीए क्षमतेचा पॉवर ट्रान्सफॉर्मर बसवून उपकेंद्राची क्षमता वाढवली आहे. तसेच वाढीव क्षमतेसाठी आवश्यक लिंक लाईनची कामे प्रस्तावित केली आहे. त्यास लवकरच मंजुरी मिळून निविदा निघतील अशी माहिती महावितरणकडून देण्यात आली. सध्या सांघिक कार्यालयांच्या वेळापत्रकानुसार शेतीपंप वाहिन्यांवर ६ तास तीन फेज वीजपुरवठा सुरू असून शेतकऱ्यांना सुरळीत वीजपुरवठा मिळावा यासाठी महावितरणचे अधिकारी व कर्मचारी प्रयत्नशील आहेत.

शेटफळ उपकेंद्रावरील वाढता भार कमी करण्यासाठी मोडनिंब शहरातील काही भागाचा वीजपुरवठा सोलंकरवाडी उपकेंद्राशी जोडला आहे. दरम्यान, पालकमंत्री जयकुमार गोरे, जिल्हाधिकारी तसेच महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसमवेत येत्या तीन ते चार दिवसांत बैठक घेणार आहे. बैठकीत प्रलंबित प्रश्नांवर चर्चा होऊन कामांना गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली आहे.परिणामी प्रस्तावित आंदोलन तात्पुरते स्थगित केले असले, तरी निश्चित कालावधीत संबंधित कामे पूर्ण न झाल्यास पुन्हा आंदोलन करण्यात येईल, असा इशारा कांबळे यांनी दिला आहे.



## सरस्वती मंदिर प्रशालेत योग पुस्तिकेचे प्रकाशन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० जून-**

१२ व्या आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त 'इंटरनॅशनल नॅचरोपॅथी ऑर्गनायझेशन'च्या वतीने आणि 'नाकोडा व स्वामित्व ग्रुप'चे चेअरमन बाबु मेहता यांच्या सौजन्याने तयार करण्यात आलेल्या योग पुस्तिकेचे आज सरस्वती मंदिर स.हि.ने. प्रशाला येथे प्रकाशन करण्यात आले.

मुख्याध्यापिका निता येरमाकर, पर्यवेक्षक मुकुंद गिरी, क्रीडा शिक्षक वीरेश अंगडी, योग व संमोहनतज्ञ क्रांतीवीर महिंद्रकर, जैन सोशल ग्रुपच्या बंम व विद्यार्थ्यांच्या हस्ते या पुस्तिकेचे विमोचन झाले.

या पुस्तिकेत योग मुद्रा, सूर्यनमस्कार व प्रोटोकॉलनुसार योगासनांची सचित्र माहिती देण्यात आली आहे. याप्रसंगी क्रांतीवीर महिंद्रकर यांनी विद्यार्थ्यांना योग मुद्रेचे महत्त्व समजावून सांगितले.



## वैरागमध्ये बुधवारी नोकर भरती मेळावा

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २० जून-**

दुष्काळसदृश्य परिस्थितीत तरुणांना मल्टी ब्रँड कंपनीमध्ये आकर्षक पगाराची नोकरी मिळण्यासाठी वैराग येथे भव्य नोकरी भरती मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. आरक्षणाचे जनक राजश्री शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त तरुणांच्या हाताला काम मिळावे यासाठी वैराग येथे शहाजीराव पाटील सांस्कृतिक भवन येथे बुधवार दि. २४ जून रोजी सकाळी दहा वाजता नोकरी भरती मेळाव्याचे आयोजन संभाजी ब्रिगेडच्यावतीने करण्यात आलेले आहे. नोकरी भरती मेळाव्याचे आयोजन संभाजी ब्रिगेड सोलापूरचे जिल्हाध्यक्ष आनंद काशीद यांनी केले आहे. या सुवर्णसंधीचा फायदा वैराग व बार्शी तालुक्यातील तरुणांनी घ्यावा असे आवाहन वैराग शहराध्यक्ष धनंजय गरड यांनी केले.



## कासारवाडी जि.प. शाळेत प्रवेशोत्सव

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २० जून-**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कासारवाडी येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ विद्यार्थी प्रवेशोत्सव लेझीम पारंपरिक वाद्यांच्या गजरात सजवलेल्या ट्रॅक्टरमधून भव्य प्रभात प्रभातफेरी काढून नवागत विद्यार्थ्यांचे शाळेच्या प्रवेशद्वारावर औक्षण करुन स्वागत करण्यात आले. मान्यवरांचे मार्गदर्शन तसेच नवागत विद्यार्थी व मान्यवरांच्या हस्ते आंबा, फणस, चिक्कू फळझाडांचे वृक्षारोपण करण्यात आले.

त्यावेळी विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमास शिक्षण विस्तार अधिकारी बालाजी नेटके, सरपंच आश्विनी मंडलिक, उपसरपंच सुधीर गायकवाड, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष सिध्देश्वर जगताप, उपाध्यक्ष सुधीर माने, नितीन मंडलिक, माजी मुख्याध्यापक सुधाकर बडे, माजी सरपंच राकेश मंडलिक, तंटामुक्ती अध्यक्ष शरद गुंड, ग्रामविकास अधिकारी सोनवणे तसेच मुख्याध्यापिका वीणा कदम उपस्थित होते. बाळासाहेब मुंढे यांनी सूत्रसंचालन केले तर शिक्षक बिनादेवी दरेकर, अभयकुमार कसबे, मनिषा भोसले, रेणुका मुंढे, विद्युत लहाने यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले.

## शाहू महाराज साहित्य पुरस्काराचे शुक्रवारी वितरण

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. २० जून-**

महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे शाखा बार्शी यांचेवतीने आणि मा.प्राचार्य व.न.इंगळे पुरस्कृत श्री शाहू महाराज साहित्य पुरस्कार सोहळा दरवर्षीप्रमाणे याही वर्षी शुक्रवार दि.२६ जून रोजी मातृमंदिर, ढगे मळा बार्शी येथे सायंकाळी ५.३० वाजता आयोजित करण्यात आला आहे.

या पुरस्कार सोहळा कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान बार्शी न.पा.च्या अध्यक्षा तेजस्विनी कथले या भूषविणार आहेत, तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. स्वाती महाळंक , प्रसिद्ध निवेदिका आणि प्रमुख कार्यवाह, अखिल भारतीय साहित्य महामंडळ, पुणे या उपस्थित राहणार आहेत. या पुरस्कार सोहळा कार्यक्रमात माजी नगराध्यक्ष, रमेश पाटील आणि दत्त शिक्षण प्रसारक व बहुदेशीय मंडळ बार्शीचे संस्थापक अध्यक्ष ॲड. सतीश सातपुते हे प्रमुख उपस्थितीत आहेत. हा मानाचा शाहू साहित्य पुरस्कार जेष्ठ साहित्यिक आणि प्रसिद्ध निवेदक मुकुंदराज कुलकर्णी यांना आणि जेष्ठ साहित्यिका डॉ. स्मिता पाटील (मोहोळ) यांना सन्मानपूर्वक प्रदान करण्यात येणार आहे. तसेच बार्शी येथील जेष्ठ साहित्यिक हरिभाऊ कोळेकर व जेष्ठ साहित्यिका सुमन चंद्रशेखर यांना साहित्यिक सेवेबद्दल कार्यक्रमात गौरव करण्यात येणार आहे. जास्तीत जास्त साहित्य प्रेमीनी कार्यक्रमास उपस्थित राहून कार्यक्रमांची शोभा वाढवावी, असे आवाहन मसाप बार्शी शाखेचे अध्यक्ष पां.न. निपाणीकर आणि कार्याध्यक्ष डॉ. रविराज फुरडे, प्रमुख कार्यवाह प्रकाश गव्हाणे, उपाध्यक्ष प्रा. प्रमिला देशमुख, सहकार्यवाह प्रकाश महामुनी आणि कोषाध्यक्ष बी.आर. देशमुख यांनी केले आहे.

## शिष्यवृत्ती घोटाळाप्रकरणी ७ हजार ५४८ पानांचे २४५ साक्षीदार असलेले दोषारोपपत्र कोर्टात दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० जून-**

शासनाला खोटी कागदपत्रे दाखल करून बांधकाम कामगार पाल्य शिष्यवृत्ती मधील ३ कोटी ६३ लाख २० हजारांच्या घोटाळा प्रकरणी सोलापूर गुन्हे शाखा पोलिसांनी तपास करून तब्बल ७५४८ पानांचे २४५ साक्षीदार असलेले दोषारोपपत्र सोलापूर येथील मुख्य न्यायदंडाधिकारी पयांचे कोर्टात दाखल केलेले असून सदर प्रकरणाची प्राथमिक सुनावणी दि.२३/०६/२०२६ रोजी होणार आहे. सदर प्रकरणात आरोपीतर्फे ॲड. शशी कुलकर्णी ॲड. गुरुदत्त बोरगावकर, यांनी जामीन अर्ज दाखल केले होते तथापि ते मे न्यायलयाने फेटाळले.

याची थोडक्यात हकीकत की, बांधकाम कामगार पाल्य शिष्यवृत्तीमधील ३ कोटी ६३ लाख २० हजारांच्या घोटाळा प्रकरणी सहाय्यक कामगार आयक्त एम. आर.झोले (वय ४०) यांनी दि.४ मार्च २०२६ रोजी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली होती.

त्यावरून आरोपी नोंदणी अधिकारी ए. आर.पवार (रा. कृष्णा कॉलनी, जुळे सोलापूर), एस. डी.राजपूत (रा. अंबेजोगाई 'जि. बीड), यू. सी.सुर्यवंशी (रा. दक्षिण सदर बझार, सोलापूर), कंत्राटी कर्मचार एस बी. पटेल, ए. बी. कोळी, बी. टी.कारडे, एस. एन.मगर, एस. बी.सुरवसे आर. सी.पाटील,ए. सी. कटारे, सी. वी डिगगे , ए. आर.पाटील, एस. एस.परदेशी, एस. एस.हळके तसेच एजंट बी. वी. शिंदे (वय ४३ रा. पंढरपूर ), ए. एच.पाडमुखे (वय ४६ रा. कुंभारी नाका, सोलापूर), टी. एम.यादगिरी (रा. मुमताज नगर, सोलापूर), ए.संगा (रा. सोलापूर), आर. एस.मुसळे (रा. देगांव रोड, सोलापूर). ए. आर.बुगडे (रा. शेळगी अशा २० जणांविरूध्द फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. सदर प्रकरणात पोलिसांनी सात आरोपीना अटक केली आहे ते सर्वजण न्यायालयीन कोठडीत आहेत.

सदर प्रकरणात पोलिसांनी तपास करुन कागदपत्रे जप्त करून वरील प्रमाणे साक्षीदारांचे जबाब घेऊन न्यायालयात दोषारोपत्र दाखल केले आहे. सदर प्रकरणात आरोपीतर्फे ॲड. शशी कुलकर्णी, ॲड. गुरूदत्त बोरगांवकर, ॲड.एच. आर. मुसळे, ॲड. देवदत्त बोरगांवकर हे काम पहात आहेत.

## २७ व २८ जून रोजी १९ वर्षांखालील मुलांची क्रिकेट संघ निवड चाचणी

**सोलापूर, दि.२० जून-**

सोलापूर जिल्हा क्रिकेट असोसिएशनतर्फे १९ वर्षांखालील मुलांच्या जिल्हा क्रिकेट संघाची निवड चाचणी शनिवार, २७ आणि रविवार, दिनांक २८ जून रोजी इंदिरा गांधी पार्क स्टेडियम येथे सकाळी ९ ते संध्याकाळी ५ या वेळेत पार पडणार आहे. या निवड चाचणीत सहभागी होण्यासाठी खेळाडूची जन्मतारीख १ सप्टेंबर २००८ नंतरची असणे बंधनकारक आहे. ज्या खेळाडूंनी सोलापूर जिल्हा क्रिकेट असोसिएशनकडे आधीच नोंदणी केली आहे, त्यांनाच या चाचणीत भाग घेता येईल. ज्या खेळाडूंनी अद्याप नोंदणी केलेली नाही, त्यांनी २६ जून २०२६ पर्यंत असोसिएशनच्या कार्यालयात स्वतःची नोंदणी करून घ्यावी. निवड चाचणीसाठी ५०० रुपये फी असोसिएशनच्या कार्यालयात टठ कोडवर जमा करायची आहे. चाचणीसाठी येताना या फीची पावती सोबत आणणे व त्याची एक प्रत तिथे जमा करणे आवश्यक आहे. चाचणीच्या दिवशी सकाळी ९:०० ते ११:०० या वेळेत रिपोर्टिंग करणाऱ्या खेळाडूंनाच चाचणीत उतरता येईल, त्यानंतर येणाऱ्या खेळाडूंना प्रवेश दिला जाणार नाही. खेळाडूंनी पांढऱ्या गणवेशात उपस्थित राहावे. या संघाची निवड करण्यासाठी श्री. सुनील मालप (चेअरमन, निवड समिती), उदय डोके, शिवानंद अकलूजकर, किशोर बोरामणी आणि अनिल जाधव यांची निवड समिती काम पाहणार आहे. पात्र खेळाडूंनी या निवड चाचणीस उपस्थित रहावे, असे आवाहन जिल्हा क्रिकेट संघटनेचे संयुक्त सचिव चंद्रकांत रेबर्सो यांनी केले आहे.

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## स्वामी समर्थ मंदिर परिसरात ड्रोन उड्डाणावर बंदी



**अक्कलकोट दि. २० जून-**

आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर आणि श्री स्वामी समर्थ मंदिर परिसरात वाढती भाविकांची गर्दी लक्षात घेऊन जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालयाने मंदिर परिसरात ड्रोन उड्डाणावर बंदी घालण्याचा आदेश जारी केला आहे. भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ च्या कलम १६३ अन्वये हा आदेश काढला असल्याचे तहसीलदार विनायक मगर यांनी सांगितले.

श्री स्वामी समर्थांच्या दर्शनासाठी राज्यासह परराज्यातूनही दररोज हजारो भाविक अक्कलकोटमध्ये येत असतात. गर्दीच्या काळात ड्रोनचा अनियंत्रित वापर झाल्यास गोंधळ निर्माण होण्याची, सुरक्षा व्यवस्थेवर ताण येण्याची तसेच कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता असल्याने मंदिर परिसरात कोणत्याही प्रकारचे अनधिकृत ड्रोन उड्डाण प्रतिबंधित केले आहे.

प्रशासनाने धार्मिक स्थळांच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य दिले असून, दहशतवादी कारवाया, गैरप्रकार, चोरी, लूटमार तसेच अन्य अनधिकृत हालचाली रोखण्यासाठी ही बंदी आवश्यक असल्याचे स्पष्ट केले आहे. सदर आदेश ८ जूनपासून पुढील ६० दिवस लागू राहणार आहे. या कालावधीत प्रशासनाच्या पूर्वपरवानगीशिवाय श्री स्वामी समर्थ मंदिर परिसर आणि संबंधित भागात ड्रोन उडविता येणार नाही, असेही मगर यांनी सांगितले.



## महत्त्वाचे...

### गाव माझा प्रतिष्ठानतर्फे शेलगाव क येथे विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप

**जेऊर दि.२० जून-**

करमाळा तालुक्यातील शेलगाव क येथील पायघन वस्ती शाळा तसेच गावातील जिल्हा परिषद शाळेतील एकूण ५३ विद्यार्थ्यांना गाव माझा प्रतिष्ठानतर्फे शालेय साहित्याचे उत्साहात वाटप करण्यात आले. यामध्ये स्कूल बॅग, वह्या, पेन, पेन्सिल, खोडरबर, शार्पनर आदींचा सम ावेश होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कर्मवीर अण्णासाहेब जगताप विद्यालयाचे माजी मुख्याध्यापक पांडुरंग वीर होते. व्यासपीठावर सरपंच प्रतिनिधी राहुल कुकडे, माजी उपसरपंच सचिन वीर, माजी ग्रामपंचायत सदस्य आजिनाथ वीर, वैभव वीर, गणेश माने, डॉ. विकास वीर, मयूर वीर, बाबुराव माने, केशव दास, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष किरण वीर, सचिन जगताप, मुख्याध्यापक दत्तात्रय जाधव, मुख्याध्यापक भीमराव बनसोडे, नरसाळे उपस्थित होते. डॉ. विकास वीर यांनी सांगितले की, गाव माझा प्रतिष्ठान ही अनौपचारिक व नोंदणीकृत नसलेली संस्था आहे. विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप, अंगणवाडी विद्यार्थ्यांना गणवेश वाटप, आरोग्य तपासणी शिबिरे, बांधकाम काम गारांना शासकीय योजनांचा लाभ, संजय गांधी निराधार योजनेचा लाभ ज्येष्ठ नागरिकांना मिळवून देणे, तसेच हरित शेलगावसाठी वृक्षसंवर्धन, जलसंवर्धन आणि स्वच्छता अभियान असे विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. निवृत्त मुख्याध्यापक पांडुरंग वीर यांनी शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी ११ हजारांची देणगी जाहीर केली. तसेच ह.भ.प. हरिहर महाराज यांनी ५,५५१ रुपयांची देणगी जाहीर करून उपक्रमास पाठबळ दिले. कार्यक्रमाचे औचित्य साधून गावातील युवा कार्यकर्ते धोंडीराम वीर यांनी शाळेला इन्व्हर्टर व बॅटरी संच भेट दिला. शाळेकडून उपस्थित मान्यवरांचे सत्कार करण्यात आले.



### राजमाता जिजाऊ यांच्या स्मृतिदिनानिमित्त अंत्रोळी शाळेत अभिवादन

**सोलापूर, दि. २० जून -**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा अंत्रोळी येथे छत्रपती शिवाजी महाराज यांना स्वराज्य निर्माण करण्याची प्रेरणा देणाऱ्या राजमाता जिजाऊ यांच्या स्मृतिदिनानिमित्त अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी मुख्याध्यापक युवराज राठोड, नागनाथ म्हमाने, कीर्ती जाधव, मीनाक्षी राठोड, पुष्पा बनसोडे आदी उपस्थित होते. जिजाऊंच्या कार्याचा इतिहास याप्रसंगी विद्यार्थ्यांना सांगण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीरंग बनसोडे यांनी केले. पुष्पा बनसोडे यांनी आभार मानले.

### गौडगावच्या विहिरीत आढळला तुळजापूरच्या तरुणाचा मृतदेह

**वैराग, दि. २० जून -**

गौडगाव (ता. बार्शी) येथील एका शेतातील विहिरीत तुळजापूर येथील एका ३२ वर्षीय तरुणाचा मृतदेह आढळला. किरण राजेंद्र रोकडे (वय ३२, रा. वेताळ नगर, तुळजापूर) असे मृत तरूणाचे नाव आहे. पोलिसांनी घटनास्थळावरून मिळालेल्या सिम कार्डच्या साहाय्याने तपास चक्रे फिरवून या तरुणाची ओळख पटवली आहे.

गौडगाव येथील रामचंद्र भड यांच्या शेतातील एका बांधलेल्या विहिरीम ध्ये शनिवारी दुपारी चार वाजेच्या सुमारास हा मृतदेह तरंगताना आढळून आला. विहिरीच्या शेजारीच राहणाऱ्या एका महिलेने ते पाहिल्यावर गावातील युवकांनी तातडीने वैराग पोलीसांना माहिती दिली. वैराग पोलीस स्टेशनचे कॉन्स्टेबल संदेश पवार आणि उमेश उमाटे यांनी घटनास्थळी भेट देत नागरिकांच्या मदतीने मृतदेह बाहेर काढला. पोलीस निरीक्षक कुंदन गावडे यांनी मृतदेह शवविच्छेदनासाठी बार्शी येथील शासकीय रुग्णालयात पाठवला आहे. पोलीस पुढील तपास करत आहेत.

# आषाढी यात्रेसाठी एसटीच्या ५ हजार ५०० बसेस

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० जून-**

'ज्ञानोबा-तुकाराम'च्या जयघोषात आणि 'विठ्ठल... विठ्ठल'...च्या अखंड नामस्मरणात पंढरपूरच्या दिशेने निघालेल्या लाखो वारकऱ्यांच्या सेवेसाठी महाराष्ट्राची जीवनवाहिनी असलेली एसटी यंदाही सज्ज झाली आहे. आषाढी एकादशी यात्रेनिमित्त राज्यभरातून श्रीक्षेत्र पंढरपूरकडे जाणाऱ्या भाविकांच्या सुरक्षित, सुलभ आणि सुखकर प्रवासासाठी ५ हजार ५०० विशेष बसेस सोडण्याचे नियोजन करण्यात आले असून राज्यातील कोणत्याही गावातून ४० किंवा त्यापेक्षा अधिक भाविकांनी एकत्रित मागणी केल्यास त्या गावातून थेट पंढरपूरसाठी विशेष एसटी बस उपलब्ध करून दिली जाणार आहे, अशी माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.




आषाढी यात्रेदरम्यान लाखो वारकरी पालख्यांसह पायी, रेल्वेने, खासगी वाहनांनी आणि एसटीने पंढरपूरकडे प्रस्थान करतात. या भाविकांच्या सेवेला सर्वोच्च प्राधान्य देत एसटी महामंडळाने व्यापक नियोजन केले आहे. भाविकांनी आपल्या जवळच्या एसटी आगाराशी संपर्क साधून विशेष बसची नोंदणी करावी, असे आवाहनही करण्यात आले आहे. विशेष म्हणजे या विशेष बस सेवेतही शासनाच्या सर्व प्रवासी सवलती कायम राहणार आहेत. ७५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना अमृत ज्येष्ठ नागरिक योजना अंतर्गत मोफत प्रवास, तर महिलांना महिला सन्मान योजना अंतर्गत तिकीट दरात ५० टक्के सवलत दिली जाणार आहे.

#### वाहतूक कोंडी टाळण्यासाठी पोलिसांना एसटीची साथ

एकादशीच्या दिवशी लाखो भाविक परतीच्या प्रवासाला निघत असल्याने वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी एसटीचे ३६ हून अधिक वाहतूक नियंत्रक आणि सुरक्षा रक्षक स्थानिक पोलीस प्रशासनासोबत खांद्याला खांदा लावून कार्यरत राहणार आहेत. त्यामुळे वाहतूक नियोजन अधिक प्रभावी होऊन भाविकांचा प्रवास सुलभ होणार आहे.

त्यामुळे विठुरायाच्या दर्शनाचा प्रवास अधिक किफायतशीर आणि सुलभ होणार आहे.मागील वर्षी आषाढी यात्रेसाठी एसटीने ५,२०० विशेष बसेस चालवून २१ लाख ९५ हजार भाविकांची सुरक्षित ने-आण केली होती. यंदा त्याहून अधिक सक्षम नियोजन करण्यात आले आहे.

#### वारकऱ्यांच्या सेवेसाठी झटणाऱ्या कर्मचाऱ्यांचीही विशेष काळजी

वारीदरम्यान रात्रंदिवस सेवा बजावणारे चालक, वाहक, यांत्रिक कर्मचारी, पर्यवेक्षक आणि अधिकारी यांच्यासाठी मंत्री प्रताप सरनाईक यांनी स्वखर्चाने चहा, नाश्ता आणि भोजनाची व्यवस्था केली आहे. सुमारे १३ हजार कर्मचारी या सुविधेचा लाभ घेणार असून, सेवाभावाने कार्य करणाऱ्या कर्मचाऱ्यांप्रती मंत्री सरनाईक यांनी कृतज्ञतेची भावना व्यक्त केली आहे.

#### पंढरपुरात चार तात्पुरती बसस्थानके

भाविकांची गर्दी लक्षात घेऊन पंढरपूर येथे चंद्रभागा, भीमा (देगाव), विठ्ठल कारखाना आणि पांडुरंग (आयटीआय महाविद्यालय) अशी चार तात्पुरती बस स्थानके उभारण्यात येणार आहेत. या स्थानकांवर पिण्याचे पाणी, सुलभ शौचालय, संगणकीय आरक्षण केंद्र, चौकशी कक्ष, मार्गदर्शन फलक आणि इतर आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

# माळशिरस तालुक्यातील विकासाच्या वाटा रुंदावल्या

## रस्त्यांसाठी १०.५० कोटींची तरतूद; दुर्गम वस्त्यांपर्यंत होणार सुलभ दळणवळण

### रस्ते बांधकाम व दुरुस्तीमुळे ग्रामविकासाला चालना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२० जून**

ग्रामीण भागातील पायाभूत सुविधांच्या विकासाला गती देण्यासाठी माळशिरस तालुक्यातील विविध रस्ते बांधकाम व दुरुस्तीच्या कामांसाठी १० कोटी ५० लाख रुपयांच्या निधीला मंजुरी मिळाली आहे. पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या पुढाकारातून तसेच जिल्हा परिषद समाजकल्याण सभापती संस्कृती सातपुते यांच्या पाठपुराव्यामुळे हा निधी उपलब्ध झाला आहे. तालुक्यातील अनेक गावांना याचा थेट लाभ मिळणार आहे.

माळशिरस तालुक्यातील ग्रामीण भागात अनेक वर्षांपासून काही रस्त्यांची अवस्था दयनीय झाली होती. पावसाळ्यात चिखल, खड्डे आणि खराब झालेल्या रस्त्यांमुळे ग्रामस्थ, विद्यार्थी, शेतकरी तसेच रुग्णवाहिका सेवांनाही अडचणींचा सामना करावा लागत होता. या पार्श्वभूम ीवर ग्रामीण भागातील रस्ते नेटवर्क मजबूत



करण्यासाठी विविध गावांतील नवीन रस्ते बांधकाम आणि रस्ते दुरुस्तीची कामे मंजूर केली आहेत.

ग्रामीण भागातील विकासात रस्त्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची मानली जाते. रस्ते चांगले असल्यास शेतकऱ्यांना शेतम ाल बाजारात नेणे सोपे होते. विद्यार्थ्यांचा शाळा-कॉलेजपर्यंतचा प्रवास सुलभ होतो. तसेच आरोग्य व आपत्कालीन सेवांचा लाभ वेळेत मिळू शकतो. त्यामुळे या निधीमुळे केवळ रस्तेच नव्हे तर संपूर्ण ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळ मिळणार असल्याचे मत स्थानिक नागरिक व्यक्त करत आहेत.

तालुक्यातील विविध गावांतील नागरिकांनी या मंजुरीचे स्वागत केले आहे. अनेक वर्षांपासून प्रलंबित मागण्यांना अखेर न्याय मिळाल्याची भावना व्यक्त केली आहे. ग्रामीण भागातील दळणवळण अधिक सक्षम करण्यासाठी राज्य सरकार कटिबद्ध असल्याचे या निर्णयातून स्पष्ट होत आहे. तर पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या माध्यमातून जिल्ह्यात म ोठ्या प्रमाणात विकासकामे मंजूर होत आहेत. समाजकल्याण सभापती संस्कृती सातपुते यांच्या पाठपुराव्यामुळे माळशिरस तालुक्यातील अनेक गावांच्या विकासाला नवी दिशा मिळत असल्याचेही ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

रस्ते विकास कामे वेळेत पूर्ण झाल्यास ग्रामीण भागातील वाहतूक, संपर्क आणि आर्थिक व्यवहारांना मोठी चालना मिळणार आहे. माळशिरस तालुक्याच्या सर्वांगीण विकासात हा निधी महत्त्वाची भूमिका बजावणार आहे.

**-संस्कृती सातपुते,**
सभापती समाजकल्याण विभाग, जिल्हा परिषद, सोलापूर.

#### महत्त्वाच्या ग्रामीण मार्गांचा समावेश

पहिल्या टप्प्यात मोरोची-साळुंखेवस्ती, किर्दकवस्ती-दहिगाव, धर्मपुरी-कर्चेवाडी, मोरोची-सोनपेट, इस्लामपूर-भंडोबा देवस्थान, दहिगाव-सावंतवस्ती, अलंकापुरी, पुरबावी, शिदेवाडी, बाभुळगाव, नातेपुते, फडतरी यांसारख्या भागांतील महत्त्वाच्या ग्रामीण मार्गांचा समावेश आहे. प्रत्येक कामासाठी सरासरी ५० लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून त्यामुळे ग्रामीण रस्त्यांची गुणवत्ता सुधारण्यास मदत होणार आहे.

#### दुसऱ्या टप्प्यात १० गावांतील रस्तेविकास

दुसऱ्या टप्प्यात रेडे, गुरसाळे, मुंजवडी, कचरेवाडी, डोंबाळवाडी, कराळवस्ती, पिलीव, हिंगणी, तांदुळवाडी, लोंढेवाडी, विरपुरी आदी भागांतील रस्त्यांच्या दुरुस्तीची कामेही मंजूर करण्यात आली आहेत. खराब झालेल्या रस्त्यांमुळे वाहतुकीवर होणारा परिणाम कमी करण्यासाठी या कामांना विशेष महत्त्व दिले जात आहे.

### आज सोलापुरात रोजगार मेळावा, करिअर मार्गदर्शन शिबिर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२० जून**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्टुडंट्स/युथ असोसिएशन, सोलापूरतर्फे रविवार, २१ जून रोजी सायंकाळी ५.०० ते ७.०० या वेळेत फॉरेस्ट बुद्ध विहार, सोलापूर येथे भव्य रोजगार मेळावा व करिअर मार्गदर्शन शिबिर होत आहे. दहावी, बारावी, आयटीआय, डिप्लोमा व पदवीधर युवक-युवतींना टाटा मोटर्स, फियाट मोटर्स, व्हर्लपूल, क्रॉम्प्टन यांसारख्या नामांकित कंपन्यांमधील रोजगार संधींबाबत मार्गदर्शन करण्यात येईल. तसेच बँकिंग, फायनान्स, मार्केटिंग व इतर सेवा क्षेत्रांतील रोजगार संधींची माहितीही देणार आहे. महिला बचत गट सदस्यांच्या मुला-मुलींचा, दहावी व बारावी परीक्षेतील उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात येणार आहे.

उद्घाटन तबस्सुम बेदर (अध्यक्ष, सोनिया मित्र मंडळ, सोलापूर) यांच्या हस्ते होईल. अध्यक्षस्थानी उज्ज्वला गणेश (शहर अभियंता, सोलापूर महापालिका) राहणार आहेत. प्रमुख उपस्थिती म्हणून माजी महापौर वसीम शेख, ॲड. आकाश बंगाळे यांची असणार आहे. नोकरी व व्यवसाय मार्गदर्शक म्हणून उत्तम कुमार नवघरे, संस्थापक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्टुडंट्स / युथ असोसिएशन हे मार्गदर्शन करणार आहेत. प्रवेश विनामूल्य असून इच्छुकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

# कर्तव्यचुकार डॉक्टरांना कारणे दाखवा नोटीस

## दोन दिवसांचा अंतिम अल्टिमेटम; पानगाव प्राथमिक आरोग्य केंद्र कुलूपबंद प्रकरण


- गंभीर रुग्णाला उपचार न मिळाल्याने आरोग्य यंत्रणा हादरली
- दोन्ही वैद्यकीय अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई प्रस्तावित
- थेट मंत्रालय स्तरावर पाठवला प्रस्ताव

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. २० जून-**

बार्शी तालुक्यातील पानगाव प्राथमिक आरोग्य केंद्रात अपघातातील एक गंभीर जखमी तरुण रक्ताच्या थारोळ्यात असताना, रुग्णालय बंद ठेवून गायब राहणाऱ्या दोन वैद्यकीय अधिकाऱ्यांवर प्रशासनाने कडक कारवाईचा बडगा उगारला आहे. तालुका आरोग्य अधिकाऱ्यांनी दोषी डॉक्टरांना कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. दोन दिवसांत खुलासा करण्याचा अल्टिमेटम दिला आहे. एवढेच नव्हे तर दोन्ही डॉक्टरांच्या निलंबनाचा प्रस्ताव अंतिम निर्णयासाठी थेट मंत्रालय स्तरावर पाठवला आहे.

तालुका आरोग्य अधिकाऱ्यांच्या धडक कारवाईमुळे शासकीय सेवेत हलगर्जीपणा करणाऱ्या कर्मचाऱ्यांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे. संपूर्ण प्रकरणाची चौकशी अत्यंत पारदर्शकपणे सुरू झाली आहे.

गुरुवारी दि. १८ जून रोजी सायंकाळी ७ वाजण्याच्या सुमारास जवळगाव येथील रहिवासी राहुल कापसे हा तरुण सोलापूर रस्त्यावर कारच्या धडकेत गंभीर जखमी झाला होता. त्याचा उजवा खांदा आणि हात पूर्णपणे रक्ताने माखलेला होता. स्थानिक नागरिक अरुण मस्तुद, पिंटू नाईकवाडी आणि प्रशांत गायकवाड यांनी त्याला तातडीने उपचारासाठी पानगाव प्राथमिक आरोग्य केंद्रात आणले. परंतु, रुग्णालयात पोहोचताच नागरिकांना मोठा धक्का बसला. आरोग्य केंद्राच्या मुख्य जाळीच्या गेटला मोठे कुलूप ठोकलेले होते. आवारात रुग्णवाहिका उभी होती पण चालक गायब होता. उपस्थित महिला कर्मचारी पंचमाल यांच्याकडे मुख्य गेटच्या कुलुपाची चावी नव्हती आणि डॉक्टर




गायब असल्याचे समोर आले. प्राथमिक उपचारही न मिळाल्यामुळे जखमी राहुलला अत्यंत वेदनेने विव्हळत बार्शी येथील खाजगी रुग्णालयात हलवावे लागले. या संवेदनशील प्रकरणानंतर तालुक्यातून तीव्र संताप व्यक्त होत होता.

तालुका आरोग्य अधिकारी डॉ. बांगर यांनी सांगितले की, 'पानगाव प्राथमिक आरोग्य केंद्रात घडलेली घटना अत्यंत गंभीर आणि शासकीय सेवेला काळीमा फासणारी आहे. याच विषयाच्या अनुषंगाने आम्ही गुरुवारी सकाळी ११:३० वाजता तालुक्यातील सर्व वैद्यकीय अधिकाऱ्यांची तातडीची व्हिडिओ कॉन्फरन्स घेतली. आगामी काळात आरोग्य मंत्र्यांची संवाद यात्रा सुरू होणार आहे, त्या पार्श्वभूमीवर तालुक्यातील कोणतेही प्राथमिक आरोग्य केंद्र बंद राहता कामा नये, अशा कडक आणि स्पष्ट सूचना मी स्वतः सकाळी सर्व डॉक्टरांना दिल्या होत्या. एक वैद्यकीय अधिकारी शासकीय कामासाठी बाहेर असेल, तर दुसऱ्या अधिकाऱ्याने केंद्रावर उपस्थित राहून रुग्णालय सुरू ठेवणे गरजेचे आहे. ग्राम स्थांची किंवा रुग्णांची कोणतीही तक्रार येणार नाही, याची संपूर्ण दक्षता घेण्याचे आदेश दिले होते. असे असतानाही संध्याकाळी ७ वाजता घडलेला हा प्रकार अतिशय अशोभनीय आहे. सकाळी स्पष्ट आदेश देऊनही नियमांचे उल्लंघन करणाऱ्या पानगाव 'पीएचसी'च्या दोन्ही वैद्यकीय अधिकाऱ्यांवर डॉ. बांगर यांनी तात्काळ तात्काळ कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. त्यांना खुलासा सादर करण्यासाठी २ दिवसांचा अंतिम अल्टिमेटम दिला आहे.'

#### निलंबनाचा प्रस्ताव जिल्हा व मंत्रालय पातळीवर रवाना

प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन पुढील कडक शिस्तभंगविषयक कारवाइ आणि निलंबनासाठीचा प्रस्ताव सोलापूर जिल्हा परिषदेकडे पाठवला आहे. जिल्हा पातळीवरून यावर अंतिम कडक कारवाई केली जाईल. तसेच पुढील मंजुरीसाठी हा प्रस्ताव मंत्रालय पातळीवर पाठवला आहे.

#### दोषींवर कारवाई निश्चित होणार

'प्राथमिक आरोग्य केंद्र बंद असण्याच्या किंवा रुग्णांची गैरसोय होण्याच्या अशा घटना आपल्या बार्शी तालुक्यात पुन्हा होणार नाहीत, याची आमच्या स्तरावरून आम्ही व्यवस्थित आणि कडक काळजी घेऊ. दोषींवर वरिष्ठ पातळीवरून योग्य ती कारवाई निश्चित केली जाईल.

**-डॉ.अनिता बांगर,** तालुका आरोग्य अधिकारी, बार्शी.